सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यात रासायनिक खतांच्या किंमतीतील दरवाढीमुळे खरीप हंगामातील पेरणीच्या खर्चात झालेली वाढ

(1) * 31099 **श्री.केशवराव मानकर , श्री.विनोद तावडे , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.विजय सावंत , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.चंद्रकांत पाटील , डॉ.रणजित पाटील , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , ॲड उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात रासायनिक खतांच्या किंमतीतील दरवाढीमुळे खरीप हंगामातील पेरणीच्या खर्चात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच खताचा काळाबाजार होत असल्याने खताच्या किंमतीत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, रासायनिक खतांच्या किंमती कमी करण्यासाठी केंद्र शासनामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाला विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, केंद्र शासनाने अनुदानात किती वाढ केली आहे,

(5) असल्यास, खताच्या किंमती कमी करण्याबाबत तसेच खताचा काळाबाजार करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता: (1) रासायनिक खतांच्या किंमती वाढल्यामुळे पीक उत्पादन खर्चात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) हे खरे नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्र शासनाने प्रामुख्याने मुलद्रव्याधारित अनुदान धोरण लागू करुन रासायनिक खतांच्या किंमती विनियंत्रित केल्याने तसेच अन्य कारणांमुळे खतांच्या किंमतीत वाढ झालेली आहे.

(3) रायायनिक खतांच्या किंमती कमी करण्यासाठी केंद्र शासनाला विनंती करण्यात येत आहे.

(4) केंद्र शासनाने अनुदानात वाढ केलेली नाही.

(5) खताच्या किंमती कमी करण्याबाबत केंद्र शासनाला विनंती करण्यात येत आहे. खतांचा काळाबाजार करणाऱ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरातील अनुक्रमांक 1 मध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो.

रासायनीक खतांच्या किंमती वाढल्यामुळे पीक उत्पादन खर्चात वाढ झाली आहे हे खरे आहे "काय" असे उत्तरात नमूद करण्यात आले आहे. " या ओळीतील "काय" हा शब्द वगळण्यात यावा. उर्वरित उत्तर छापल्याप्रमाणे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, हा प्रश्न शेतकऱ्यांशी निगडीत असा आहे. राज्यातील शेतकऱ्यांना काळाबाजारात खतांची खरेदी करावी लागते. काळयाबाजारात खते विक्री करणाऱ्या व्यक्तींना दोषी धरले जाते आणि त्या अनुषंगाने त्यांचे विरुध्द कारवाई केली जाते. ज्यावेळी युरिया खताचा भाव प्रति क्विंटल 72 रुपये होता आता तो भाव प्रति क्विंटल 282 रुपये आहे. खत खरेदी आणि विक्री यातील नफा अतिशय कमी आहे. खताची विक्री करताना खत विक्रेत्यांना होणारा नफा कमी व खत मागविण्यासाठी लागणारा खर्च जास्त असल्यामुळे खताचा काळाबाजार होत आहे. त्यामुळे हा काळाबाजार थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे असा माझा प्रश्न विचारण्यामागचा खरा उद्देश होता. शासनाकडून जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे, त्या उत्तराने माझे समाधान झालेले नाही. ते समाधानकारक नाही. आज युरिया खताचा भाव प्रति टन 5780 रुपये एवढा आहे आणि विक्रीचा भाव प्रति टन 5914 रुपये एवढा आहे. खत विक्रेत्या व्यापाऱ्यास फक्त 134 रुपये एवढा नफा होतो. प्रति बॅग 8 रुपये 50 पैसे एवढा नफा त्यांना होतो. या 8 रुपये 50 पैशांमध्ये होलसेल विक्रेत्याचा नफा, रिटेलरचा नफा, होलसेलर पासून रिटेलरपर्यंत खत वाहतुकीचा खर्च, गोडाऊन खर्च, इलेक्ट्रीक खर्च, दुकान खर्च,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोकरदाराचा पगार या सर्व गोष्टी या नफ्यामध्ये येतात. आयकराच्या नियमानुसार कमीत कमी 5 टक्के तरी नफा खत विक्रेता यांना झाला पाहिजे. महाराष्ट्रातील खत विक्रेत्यांना किमात 4 ते 5 टक्के नफा मिळेल या दृष्टीने शासन काही प्रयत्न करील काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : खताच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. या विषयी सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या ती वस्तुस्थिती आहे.केंद्र शासनाने गेल्या दोन वर्षापासून नवीन धोरण ठरविले आहे, त्यामुळे खताच्या किंमती डि-कंट्रोल झालेल्या आहेत. खताच्या किंमती ठरविण्याचे अधिकार खत उत्पादक कंपन्यांकडे गेलेले आहेत. केंद्र शासनाकडून खताच्या बाबतीत सबसिडी दिली जात होती, ती सबसिडी फर्ल्टीलायझरच्या युटरेशन ग्रेडच्या प्रमाणामध्ये केंद्र सरकार खत उत्पादक कंपन्यांकडे जमा करीत असते. यामध्ये एक मोठे चेन आहे. खत उत्पादक कंपन्या खत निर्मिती करतात, त्या कंपन्यांकडून होलसेल खत विक्रेते खत खरेदी करतात आणि ते खत रिटेलरला विकतात, त्यानंतर ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचते. प्रत्येक खताच्या बॅगेज्वर एम.आर.पी.छापलेली असते. त्या छापील एम.आर.पी.मध्ये सबसिडीचा अंतर्भाव केलेला आहे. या सदनाला नम्रपणे सांगू इच्छितो की, आज शेतकऱ्यांना वाढीव दराने खत खरेदी करावे लागत नाही. सन्माननीय सदस्यांनी व्यापाऱ्यांशी संबंधित मुद्दा उपस्थित केला आहे. खत कंपनी, होलसेलर आणि रिटेलर यांनी एकत्र येऊन त्यांनी किती कमिशन घ्यावे, त्यांना किती टक्के परतावा मिळावा या बाबतीत चर्चा करुन ते ठरविले पाहिजे. तो त्यांचा अंतर्गत मुद्दा आहे.

श्री.विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, राज्यात खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन खताची किंमत वाढवून घेतली जाते काय, खताची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांना खत विक्री करताना किंमत वाढवून दिली जाते. परंतु ते खत शेतकऱ्यांना देत असताना त्यांना सांगितले जाते की, खता बरोबर दुसरी एखादी वस्तू विकत घ्यावी. 26:26:10 चे खत घ्यावयाचे असेल तर अमुक कंपनीचे बियाणे खरेदी करा असे शेतकऱ्यांना सांगितले जाते. अशा प्रकारची सक्ती करुन खतांची विक्री केली जाते ही गोष्ट खरी आहे काय ? असल्यास, या बाबतीत नियंत्रण करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करीत आहे ?

यानंतर श्री. कानडे....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

ता.प्र.क्र.31099.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याप्रमाणे गेल्या काही वर्षात ही कीड लागली होती. यापूर्वी विशिष्ट प्रकारच्या खताबरोबर इतर खतांचे लिकिंग केले जात होते. परंतु गेले दोन वर्षे शासनाने ज्या पध्दतीने कारवाई केलेली आहे ती लक्षात घेता ही प्रक्रियाच आता जवळजवळ बंद झालेली आहे. यावर्षी कोणाच्याही तक्रारी आलेल्या दिसत नाहीत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीमुळे किंवा खतांचा उठाव कमी असल्यामुळे लिंकिंग बंद झालेले आहे. शासनाकडे 158 टक्के खतांची उपलब्धता वेगवेगळया जिल्हयांच्या मागणीप्रमाणे केलेली आहे. 6 लाख क्विंटल बफर्स स्टॉक आहे. शासनाने शेतकऱ्यांना बांधावर खते देण्याचा उपक्रम सुरु केला असल्यामुळे एम.आर.पी. पेक्षा सुध्दा कमी किंमतीमध्ये व्यापाऱ्यांनी खते देण्यास सुरुवात केलेली आहे. म्हणूनच खताबरोबर लिंकिंग करण्याची परिस्थिती आलेली नाही. खतांची कृत्रिम टंचाईदेखील निर्माण करण्याचा प्रश्न राहिलेला नाही.मुबलक स्वरूपामध्ये खताचा पुरवठा होत आहे.वाढीव किंमतीने घरे विकण्याचा प्रश्न शिल्लक राहिला नाही. गेल्या दोन वर्षात सरकारने जी कारवाई केली त्याची आकडेवारीसुध्दा मी देण्यास तयार आहे. त्यावरुन हे स्पष्ट होते की,जी कारवाई केलेली आहे त्यावरुन व्यापारी सुध्दा आता फारसे धाडस करणार नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खतांवर मोठया प्रमाणात सबसिडी दिल्यामुळे खते केवळ कागदावर येत असत आणि नंतर एक्सपोर्ट होत असत आणि तशा प्रकारचे रॅकेट बरीच वर्षे चालू होते. गेल्या दोन वर्षामध्ये म्हणजे सबसिडी कमी केल्यामुळे खतांच्या किंमती वाढल्या. डीअेपी 485 रुपये होते ते 1234 रुपये झाले, युरियापोटॅश 250 रुपयांवरुन 835 रुपये झाले. सुपरफॉस्पेट 200 रुपयांवरुन 400 रुपये बॅग इतके झाले. थोडक्यात सबसिडी कमी केल्यामुळे किंमती वाढल्या. किंमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांना खते महाग दराने घ्यावी लागत आहेत. खतांच्या किंमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांना शासन हमी भाव वाढवून देण्यासाठी काही उपाययोजना करणार आहे काय ? खतांच्या किंमती वाढल्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. म्हणून शेतकऱ्यांना हमीभाव वाढवून मिळेपर्यंत त्यांना वाचविण्यासाठी शासन अनुदान देणार आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाने एमआरपी किंमत ठरवून देताना सबसिडीचा अंतर्भाव केलेला आहे. पुढील दोन वर्षामध्ये रिटेलरकडून शेतकऱ्यांपर्यंत खते दिली जाणार आहेत त्याच्यानुसार आधार कार्ड देण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या बँकेतील खात्यामध्ये रक्कम थेट पध्दतीने जाणार आहे. अंमलबजावणीला सुरुवात देखील झालेली आहे. हमी भावाबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी उल्लेख केला. राज्यामध्ये शेतीला हमी भाव ठरविण्यासाठी समितीचे पुर्नगठन केले. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे त्या समितीचे सदस्य नसताना देखील त्यांनी याबाबत अतिशय उत्तम असे काम केलेले आहे. यावर्षी राज्यामध्ये शेतीमालाचे भाव काय असावेत याबाबत शिफारशी केलेल्या आहेत त्यामध्ये केंद्र शासनाने 30 ते 40 टक्के वाढ केलेली आहे. गतवर्षी हमीभावामध्ये केंद्र शासनाने 30-40टक्के वाढ केलेली आहे. माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि हमीभाव समितीच्या माध्यमातून शेतीमालाचे हमीभाव कसे वाढविता येतील यादृष्टीने जे प्रयत्न करावे लागतील ते शासनाने सुरु केलेले आहेत.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31099.....

श्री. अरुण गुजराथी : महोदय, मागील वर्षीपर्यंत केंद्र सरकार खतासाठी 1 लाख 40 हजार कोटीचे अनुदान देत होते पण आता हे अनुदान बंद केल्यामुळे सहाजिकच खतांच्या किंमतींमध्ये वाढ झालेली आहे. याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे, तसेच मंत्री महोदयांनी सांगितल्यानुसार खतांच्या किंमती कमी करण्यासाठी केंद्र सरकारला विनंती केली आहे, म्हणजेच कोणत्या प्रकारचे प्रयत्न आपल्या सरकारने केले आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, केंद्र सरकारकडून खतावर 1 लाख 40 हजार कोटी रुपये एवढी सबसिडीची रक्कम मिळत होती. माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांनी लोकसभेत भाषण करताना सांगितले होते की सबसिडी जीडीपीवर आधारित दिली जात नव्हती तर आंतरराष्ट्रीय बाजारात होणारे चढ-उतार लक्षात घेऊन दिली जात होती. ज्याप्रमाणे पेट्रोलियम कंपन्यांना आता त्यांचे अधिकार प्रदान केले त्याप्रमाणे त्या कंपन्याच अशा दरवाढीचा निर्णय घेतात तशीच परिस्थिती डीएपी, एमओपी, सुपर फॉस्पेट सारख्या खतांच्या बाबतीत आहे. तसेच आपल्या देशात रुपयाची तुलना डॉलरशी होत आहे पण हा व्यापक स्वरुपाचा विषय आहे.

सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मी स्पष्ट करु इच्छितो की, खतांच्या किंमती केंद्रशासनाच्या नियंत्रणाखाली असल्याने त्यासंबंधीचा निर्णय केंद्रानेच घ्यावयाचा आहे. पण राज्य शासनाच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्री जेव्हा जेव्हा दिल्लीला जातात तेव्हा ते संबंधित मंत्र्यांची भेट घेतच असतात. तसेच आमच्या विभागाच्या वतीने मी व्यक्तिशः देखील केंद्रातील संबंधित मंत्री महोदयांना भेटून खतांच्या किंमतीत सतत वाढ होत असल्याने याबाबतचे धोरण बदलले पाहिजे अशी विनंती करीत असतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे या किंमती वाढल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वाढत चालला व ही बाब शेतकऱ्यांना परवडणारी नाही. ही बाब वेळोवेळी केंद्र शासनाच्या लक्षात आणून दिली आहे. केंद्र शासनाने देखील वेळोवेळी जे बदल करावयाचे असतात ते करण्याचा प्रयत्न केला आहे. पण दिवसेदिवस डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन होत चालले व जागतिक बाजारपेठेचा या सर्व बाबींशी संबंध येत असल्याने केंद्र सरकार त्या दृष्टीने प्रयत्न करीतच असले पाहिजे. तसेच आपल्या राज्याकडूनही त्याचा सतत पाठपुरावा सुरु आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31099.....

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना केंद्र सरकारला याबाबतीत विनंती करण्यात आली असे सांगितले. ही विनंती केव्हा करण्यात आली आणि त्याचा पाठपुरावा कशा प्रकारे करण्यात आला ? तसेच शासनाने आजपर्यंत खताच्या काळ्या बाजारामध्ये किती एजंटांविरुध्द कारवाई केली, किती लोकांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल केले आहेत, तसेच अशाच प्रकारे पाऊस पडत गेला आणि पुन्हा पेरण्या कराव्या लागल्या तर दुबार पेरण्यानंतर जी खते आवश्यक आहेत त्यांचा पुरवठा अपुरा होण्याची शक्यता आहे, याचा शासनाने विचार केला आहे काय ? त्याचबरोबर गेल्या दोन महिन्यात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्याने आचारसंहिता होती. याच काळात खरिपाच्या बैठका होतात. अशा बैठकांना लोक प्रतिनिधींना बोलाविले गेले नसून अधिकाऱ्यांच्याच पातळीवर अशा बैठका पार पडल्या आहेत. मी या निमित्ताने अशी विनंती करतो की, या अधिवेशनाच्याच काळात लोक प्रतिनिधींना बोलावून पावसाची परिस्थिती बघून खतांचे वितरण कसे होईल आणि त्यात काळा बाजार होणार नाही याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, राज्य सरकारच्या वतीने केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा चालूच आहे. माननीय मुख्यमंत्री दिल्लीला गेल्यानंतर संबंधितांना भेटून आपली अडचण त्यांच्या लक्षात आणून देत असतात, यावरुन समजते की, शासनाची या बाबतीतील भूमिका सकारात्मक आहे. तसेच सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी स्वत: सहमत आहे, कारण शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन सतत प्रयत्नशील आहे. केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार हे सुध्दा याबाबत प्रयत्नशील आहेत. आम्हीही सतत केंद्राच्या संपर्कात आहोत. तसेच खताच्या काळ्या बाजाराच्या बाबतीत शासनाने सन 2012 या वर्षात खत कंपन्यांविरुध्द 76 पोलीस केसेस रजिस्टर्ड केल्या आहेत. 409 कंपन्यांचे परवाने निलंबित केले व 671 कंपन्यांचे परवाने रद्द केले आहेत. जप्त केलेल्या खताचे मूल्य 4 कोटी एवढे असून अशी कारवाई केल्यामुळे ही परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 31099 .....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

सभापती महोदय, खरीप हंगामाच्या बैठका घेणे हा नित्याचा विषय आहे परंतु त्यावेळेस आचार संहिता असल्यामुळे खरीप हंगामाच्या बैठका घेता आल्या नव्हत्या, खरीप हंगामाच्या बैठका घेण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी आचार संहितेच्या नावाखाली या बैठकांना मान्यता दिली नव्हती. आता आचार संहिता संपल्यामुळे ज्या ठिकाणी खरीप हंगामाच्या बैठका होऊ शकल्या नाहीत त्या ठिकाणी खरीप हंगामाच्या बैठका घेतल्या जाव्यात यासंबंधी संबंधित जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांना विनंती करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील दहिसर, मुलुंड, शिवडी व वाशी या चार प्रमुख जकात नाक्यावर बनावट पावत्या व बेकायदेशीर व्यवहार होत असल्याबाबत

(२) * ३०३८२ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती अलका देसाई , श्री.उल्हास पवार , श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मुंबईतील दहिसर, मुलुंड, शिवडी व वाशी या चार प्रमुख जकात नाक्यावर बनावट पावत्या व बेकायदेशीर व्यवहार होत असल्याची घटना दि.१५ मे, २०१२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकून उघडकीस आणली, हे खरे आहे काय,

२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेचे कोट्यवधीचे नुकसान झाले हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, संबंधित प्रकरणांमध्ये मुंबई पोलिसांनी १० दलालांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

४) असल्यास, संबंधितांना मदत करणाऱ्या महापालिकेतील जकात अधिकारी व कर्मचाऱ्यांना अटक केली आहे काय,

५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्याअनुषंगाने या प्रकरणात दोषी दलाल व अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

६) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आतापर्यंत केलेल्या तपासामध्ये रूपये १६,३७,८०३/- इतकी जकात बुडविलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३), (४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १३/२०१२, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८, कलम १३(१) (अ)(ड), १३(२) सह भादंवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १०९, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांनी या प्रकरणात दोन इसमांना अटक केली असून, अद्यापपर्यंत महानगर पालिकेतील जकात अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना अटक केलेली नाही. मुंबई महानगरपालिकेच्या जकात विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गुन्ह्यातील सहभागाबाबत खात्री करण्यात येत आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरू आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मुंबई महानगर पालिकेला जकात वसुलीमधून सर्वात जास्त उत्पन्न मिळत असते. मुंबई महानगर पालिकेतील जकात नाक्यावर बेकायदेशीर व्यवहार व बनावट पावत्या छापल्या गेलेल्या असून त्यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे काय ? असा मी पहिला प्रश्न विचारला होता व त्याला "हे खरे आहे" असे उत्तर देण्यात आलेले आहे.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३०३८२ .....

श्री. जयप्रकाश छाजेड ...

सभापती महोदय, या सर्व व्यवहारात कटकारस्थान आहे. मुंबई तसेच नाशिक महानगर पालिकेमध्ये सुध्दा जकात चोरीच्या बाबतीत अशाच प्रकारचा गैरव्यवहार झालेला आहे, दोन्ही ठिकाणी मोडस ऑपरेन्डी सारखीच आहे. बनावट जकातीच्या पावत्या तसेच एजन्टच्या सुळसुळाटामुळेच हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणात १३ लाख रुपये जकात बुडविणाऱ्या एका माणसाला अटक करण्यात आलेली आहे. परंतु बनावट पावत्या कोणी छापल्या, कोणत्या छापखान्यातून छापल्या याची माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही. नाशिक येथे ज्या बनावट पावत्या छापल्या होत्या त्या कोणत्या प्रेसमध्ये छापल्या होत्या याचे उत्तरही आजपर्यंत मिळालेले नाही. त्यामुळे या पावत्या कोठे छापल्या गेल्या होत्या त्याचा शोध घेतला जाणार आहे की नाही ? जकात चोरीच्या संदर्भात सरकार स्वत: लक्ष घालून वेगळी यंत्रणा उभी करुन सखोल चौकशी करणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, जकातीचा विषय हा महापालिकेचा आहे. जकात चोरी होत असल्याची माहिती ॲन्टी करप्शन विभागाकडून आल्यामुळे पोलिसांनी स्वत: जकात चोरीच्या संदर्भात कारवाई केलेली आहे. आमच्याकडे जकात चोरीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नसतानाही ही कारवाई करण्यात आलेली असून मुंबईमध्ये ३ जकात नाके, ६ गोदामे तसेच ४४ वाहनांवर कारवाई करुन त्यामधून जवळ जवळ १३ लाख रुपयांची जकात चुकवली गेल्याचे सिध्द झालेले आहे.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी सभागृहास सांगू इच्छितो की, ॲन्टी करप्शनची कारवाई झाल्यानंतर जवळ जवळ १.२५ ते १.५ कोटी रुपयांनी मुंबई महानगर पालिकेचे रोजचे उत्पन्न वाढलेले आहे. ज्यांनी जकात चुकवली त्या मालकालाही अटक करण्यात आलेली असून जे अवती भवती जकात एजंट म्हणून फिरतात त्यांना सुध्दा अटक करण्यात आलेली आहे. बनावट पावत्याच्या संदर्भातही तपासही सुरु आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

ता.प्र.क्र. : ३०३८२ .....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, जकात चोरीच्या संदर्भात लाचलुचपत खात्याने स्वत:हून कारवाई केल्याबद्दल मी माननीय गृह राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करते. परंतु अभिनंदन करतांना काही प्रश्न अनुत्तरित राहतात. उत्तरामध्ये एजंटवर कारवाई करण्यात आलेली आहे अशी माहिती देण्यात आलेली आहे. परंतु अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. अधिकाऱ्यांच्या संगनमताने जकात नाक्यावर चोऱ्या केल्या जातात. मुंबई शहर जागतीक कीर्तीचे शहर असतांना त्या ठिकाणी जर जकात नाक्यावर चोरी होत असेल तर ते योग्य नाही. ज्या दिवशी हा प्रकार झाला त्या दिवशी जे अधिकारी ड्यूटीवर होते त्यांच्यावर कारवाई करुन जकात चोरीला आळा घातला जाणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, आपल्या इन्टेलिजन्सने जकात चोरीच्या संदर्भात कारवाई केलेली आहे. जे जे अधिकारी दोषी सापडतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्याचे निर्देश महापालिकेला दिले जातील.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30382.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील...

जकात नाक्यावर होत असलेल्या बेकायदेशीर व्यवहाराला आळा घालण्यासाठी महापालिका स्तरावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. आमच्या विभागाने कारवाई केल्यानंतर महापालिकेच्या जकातीच्या दर दिवशीच्या उत्पन्नात सव्वा ते दीड कोटी रूपयाने वाढ झालेली आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये दोन इसमांना अटक केली आहे असे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी ॲन्टी करप्शन बुरो, मुंबई यांनी सुमोटो कारवाई केली आहे. अशा प्रकरणांमध्ये महापालिका कोणत्याही परिस्थितीत इनिशिएटीव्ह घेताना दिसत नाही. तेव्हा यात महापालिकेचे अधिकारी आणि दलाल यांची साखळी आहे काय, याबाबत आपण काही तपास करीत आहात काय, असल्यास, तो तपास कोठ पर्यंत आला आहे व त्या अनुषंगाने आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यामधील वेगवेगळ्या विभागात भ्रष्टाचाराच्या घटना घडत आहेत. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ॲन्टी करप्शन बुरो गठित करण्यात आले आहे. एकंदर राज्यातील प्रशासन पाहता ॲन्टी करप्शन ब्युरोची व्याप्ती खूप छोटी आहे. त्यामुळे आपण ॲक्ट मध्येच तरतूद केली आहे की, प्रत्येक महसुली विभागाने आपला कारभार चांगला करण्याच्या दृष्टीने, महसुलाची तूट होऊ नये म्हणून दक्षता पथके विभागांतर्गत स्थापन करावी. काही विभागांमध्ये अशी पथके निर्माण करण्यात आली आहेत तर काही विभागात नेमण्यात आलेली नाहीत. ॲन्टी करप्शन ब्युरोला माहिती मिळाली की, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, दलाल आणि माल शहरात आणणारे लोक संगनमत करून जकातीची मोठ्या प्रमाणावर चोरी करीत आहेत. या साखळीची माहिती मिळाल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोने सुमोटो धाडी टाकल्या आहेत. त्यानंतर महापालिकेचे उत्पन्न देखील खूप चांगल्या पद्धतीने वाढले आहे. अजून सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने राज्यातील महापालिकेचे उत्पन्न वाढू शकते. आज स्थानिक संस्थांकडे विकास कामाला पैसे नाहीत. पण दलाल, कर्मचारी मधल्यामध्ये कोट्यवधी रूपये लाटत आहेत. त्यामुळे दक्षता पथके नेमण्याची सूचना आम्ही महापालिकेला करणार आहोत. या केसचा तपास अजून सुरू आहे. जकात चुकविणाऱ्या मालकाला आम्ही अटक केलेली आहे. दलालाला अटक केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

या केसमध्ये कर्मचारी, दलाल व लोकप्रतिनिधी देखील असू शकतात. मी एकही गोष्ट लपवून ठेवत नाही. मी गृह मंत्री असलो तरी या प्रकरणामध्ये पोलिसांचा कुठे काना डोळा झाला आहे काय, हे देखील पाहतो आहे. ही एक ट्रायल केस आहे. या केसचा सर्व बाजूने तपास केला जाईल आणि जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, येथे नाशिकचा प्रश्न देखील उपस्थित करण्यात आला आहे. या केसचा तपास पूर्ण झाल्यानंतर मोडस ऑपरेंडी बघून महाराष्ट्रातील अन्य महापालिकांमध्ये लक्ष ठेवण्याची भूमिका घेतली जाईल व माहितीच्या आधारावर अशा प्रकारच्या धाडी घालण्यात येतील.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये सुद्धा हा प्रश्न आला होता. महापालिकेतील कर्मचारी, अधिकारी आणि बाहेरचे दलाल यांचे संगनमत असल्याशिवाय असे घडू शकत नाही. आता आपण जकात विभागाचे अधिकारी,कर्मचारी यांच्या सहभागाबाबत खात्री करून घेण्यात येत आहे, असे सांगत आहात. मागच्या अधिवेशनात हा प्रश्न आला होता व आता देखील आला आहे. तेव्हा शासनाची खात्री करून घेण्याची प्रक्रिया किती दिवस चालणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे सर्व संगनमताने होते आहे हे फक्त वरवरच्या माहितीवर अवलंबून असणे आवश्यक नसते. पोलिसांना कोर्टामध्ये जाताना पुरावे गोळा करावे लागतात. त्यामुळे सर्व पेपर बघूनच तपास केला जातो. तज्ज्ञांच्या, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण केसचा तपास सुरू आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी "अँटी करप्शन ब्यूरोने कारवाई केल्यानंतर प्रति दिवशी एक ते दीड कोटी रुपयांचे उत्पन्न वाढले आहे" असे उत्तर देतांना सांगितले. दुसऱ्या उत्तरामध्ये " सदर प्रकरणी आतापर्यंत केलेल्या तपासामध्ये रुपये 16 लक्ष 37 हजार 803 इतकी जकात बुडविलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे" असे म्हटले आहे. तर मग हे आकडे कशावरुन काढण्यात आले? मागील काळात किती तरी कोटी रुपयांची जकात बुडविली गेली आहे, त्या संदर्भात आपले म्हणणे काय आहे?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, कारवाई केल्यानंतर 44 वाहने सापडली त्यानुसार 16 लाख 37 हजार 803 कोटी रुपये जकात बुडविली असल्याचे निष्पन्न झाले. मी सांगितल्याप्रमाणे प्रति दिवशी एक ते दीड कोटी रुपयांची जकात वसुली होत असल्याचे सांगितले. ही कारवाई होण्यापूर्वी 9 कोटी, 8 कोटी 45 लाख, 9 कोटी 57 लाख, 9 कोटी 83 लाख इतके जकातीचे उत्पन्न होते. कारवाई झाल्यानंतर 10 कोटी, 10 कोटी 58 लाख, 10 कोटी 39 लाख, 10 कोटी 48 लाख, 10 कोटी 54 लाख, 11 कोटी 44 लाख एवढा फरक प्रत्येक दिवसाच्या जकातीच्या उत्पन्नामध्ये पडलेला आहे.

श्री. अपूर्व हिरे : सभापती महोदय, मी स्वत: नाशिक महानगरपालिकेचा नगरसेवक म्हणून काम करीत आहे. हा प्रश्न राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये निर्माण झाला आहे. नाशिक महानगरपालिकेमध्ये अंदाजे 30 ते 40 टक्के जकात चोरी होत असते. या बाबत आपण राज्यातील सर्व महानगरपालिकांना आदेश देणार काय, हे जकात चोरीचे प्रकार थांबविण्यासाठी आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, नगर विकास विभागाने दक्षता पथक विभागांतर्गत तयार करावीत. त्यांनी जकात चोरीवर लक्ष ठेवावे या बाबत त्यांना सूचना देण्यात येतील. अँटी करप्शन ब्यूरोकडून ज्या ज्या महानगरपालिकांची माहिती प्राप्त होईल त्या ठिकाणी कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढविण्याबाबत

(३) * ३१२१४ श्री.मोहन जोशी , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली : तारांकित प्रश्न क्रमांक २७७३० ला दिनांक २० एप्रिल २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने नियम केलेल्या सिद्धापराध प्रमाण अभ्यास समितीने शासनाला दिनांक २८ सप्टेंबर, २०११ रोजी अहवाल सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास विचाराधीन असलेल्या सिध्दपराध प्रमाण अभ्यास समितीच्या शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत काय,

(३) असल्यास समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत शिफारशीनुसार अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत शिफारशी शासनाच्या अद्याप विचाराधीन आहेत.

समितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

१) ज्या गुन्ह्यात सुयोग्य व सबळ पुरावा गोळा झाला आहे, अशाच गुन्ह्यांमध्ये वरिष्ठांच्या मान्यतेने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात यावे.

२) गुन्ह्यामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्यापूर्वी सहाय्यक संचालक तथा सरकारी अभियोक्ता यांनी दिलेले अभियोग टिपणमधील सूचनांनुसार पूर्तता केल्यानंतरच दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात यावे.

३) उपविभागीय पोलीस अधिकार / सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक पोलीस स्टेशनला आठवड्यातून किमान एकदा भेट देऊन गुन्ह्यातील तपास कागदपत्रांची (दप्तर तपासणी) पडताळणी व खटल्यांचा प्रगती आढावा घेण्याचे बंधनकारक करण्यात यावे.

४) न्यायालयात सुरू असलेल्या प्रत्येक खटल्यावर बारकाईने लक्ष ठेऊन पाठपुरावा करण्यासाठी योजना अंमलात आणण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

५) उपविभागीय पोलीस अधिकारी/सहायक पोलीस आयुक्त आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ते यांची संयुक्त आढावा बैठक दर महिन्याला आयोजित करण्यात यावी.

६) साक्षीदाराचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांची गैरसोय व कुचंबणा होणार नाही याबाबत जागरूकता दाखविण्यात यावी.

७) राज्यात एक न्यायालय एक सरकारी अभियोक्ता हे तत्व सुनिश्चित करण्यात यावे व त्याप्रमाणे पदे भरण्यात यावीत.

८) निर्दोष सुटका/दोष मुक्तता झालेल्या प्रत्येक प्रकरणाची सहाय्यक संचालक तथा सरकारी अभियोक्ता/संचालक, अभियोग संचालनालय यांच्या स्तरावर पडताळणी करून आवश्यक त्याप्रमाणे तपास अधिकारी किंवा अभियोक्ता यांच्याविरूद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी.

९) तपासी अंमलदार यांना तपासादरम्यान अतिशय महत्वाची ठरणारी न्यायसहायक व इतर तज्ञ यांची मदत अधिक बळकट करण्यात यावी.

१०) आरोपींकडे शिक्षेसंबंधात विचारपूस करून खटले प्राथमिक स्तरावरच निकाली काढण्यासाठी जागृती निर्माण करण्यात यावी.

११) पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस तपास, निरनिराळे नवीन कायदे/सुधारणा/तरतुदी व संबंधित विषयावर वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या पोलीस खात्याकडून जे खटले दाखल केले जातात त्या बाबत मागील दोन वर्षाचा अहवाल आलेला आहे त्यामध्ये देशाच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याचे प्रमाण फार खाली आले आहे. फक्त १४ टक्के खटल्यांमध्ये आरोपींना शिक्षा होते. या करिता शासनाने नेमलेल्या समितीने आपला अहवाल देऊन जवळपास एक वर्ष पूर्ण होत आला आहे.

सभापती : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, त्या समितीने केलेल्या शिफारशींबाबत शासनाने विचार केला आहे काय, त्या शिफारशी स्वीकारुन त्यांची अंमलबजावणी तीन महिन्याच्या आत हे शासन करणार आहे काय? दुसरी गोष्ट अशी की, पोलीस यंत्रणेकडे मनुष्य बळ अपूरे असल्यामुळे कायदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी....

व सुव्यवस्था, मोर्चे, आंदोलन या कडे देखील त्यांना लक्ष द्यावे लागते. त्या करिता अशाप्रकारच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलीस खात्यामध्ये एक स्वतंत्र टीम तयार करणार काय? तिसरा प्रश्न असा की, आय.पी.सी. सोडून अनेक कलमांमध्ये अशाप्रकारचे गुन्हे दाखल होतात. त्या चौकशी अधिकाऱ्याला आय.पी.सी. शिवाय दुसऱ्या कलमांची माहिती नसल्यामुळे आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण फार कमी आहे. अशा कलमांचे त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आपण वेगळी यंत्रणा निर्माण करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, अन्य राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यातील कन्व्हिक्शनचा रेट कमी आहे. आपल्या राज्यामध्ये चिंता व्यक्त करावी इतका तो कमी होत गेला आहे. त्याची काही कारणे देखील आहेत. 1993 मध्ये राज्याचा कन्व्हिक्शनचा रेट 33 टक्के होता तो 1994 मध्ये 34.5 टक्के होता, 1995 मध्ये 32 टक्के होता, 32 टक्क्यावरुन 1997 मध्ये 18 टक्क्यावर आला.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानंतर हा दर 12 टक्के झाला. त्यानंतर तो 11 व 9 टक्के झाला असून या वर्षी 8.2 टक्क्यावर गेला आहे. 1997 मध्ये सुप्रीम कोर्टाने जजमेंट दिले की, प्रॉसीक्युशनला पोलिसांपासून स्वतंत्र करावे. त्यांना इन्डीपेडन्ट ठेवण्यात यावे. त्यामुळे वकील वेगळे झाले आणि पोलीस एका बाजूला झाले. त्यामुळे कोणाचाच कोणाशी समन्वय नाही. 1997 पर्यंत सरकारने निर्णय घेईपर्यंत "आय-जी" यांच्या लिडरशीपखाली, एस.पी.यांच्या नियंत्रणाखाली प्रॉसीक्युटर काम करीत होते.पण आता त्या दोघांचा कुठेही संबंध उरलेला नाही.त्यामुळे सन्मवयाच्या अभावामुळे 1997 नंतरच मोठ्या प्रमाणात डाऊन फॉल सुरु झाला.म्हणून यासंबंधात त्यांच्यामध्ये पुन्हा एकदा को-ऑर्डीनेशन निर्माण होईल.जरी सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला असला तरी केवळ आपल्याच राज्याने त्याची अंमलबजावणी केली आहे आणि त्याचे हे निष्कर्ष आहेत.त्याबाबतीत काय करता येईल म्हणून एस.ए.यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी गठीत करुन एक महिन्याच्या आज निर्णय घेण्याचे आम्ही ठरविले आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी कन्व्हीक्शनचा रेट कमी होता, तेव्हा गृह विभागाने एक कमिटी गठीत केली होती.त्या कमिटीने ज्या राज्याचा कन्व्हीक्शनचा रेट अधिक आहे,त्या राज्यामध्ये जाऊन आपला कन्व्हीक्शनचा रेट का कमी आहे याबाबत जेव्हा अभ्यास केला,त्यावेळी शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असण्याचे कारण गुन्ह्यांच्या बाबतीत कोर्टामध्ये सुनावणी होण्यास प्रदीर्घ विलंब होतो. महाराष्ट्रामध्ये कोर्टात खूप खटले दाखल होत आहेत. त्यांचे निकाल लवकर लागत नाहीत, तसेच पंचनाम्यातील साक्षीदार फितूर होत आहेत, गुन्हे उशिरा दाखल केले जात आहेत.तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल, वस्तू सादर करण्यामध्ये अनेक वेळा अडचणी आल्या आहेत. तसेच फॉरेन्सिक लॅबचे अहवाल वेळेवर मिळत नाहीत. वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर ते पुन्हा साक्ष देण्यासाठी उपलब्ध होत नाहीत वगैरे गोष्टी समोर आल्या.

सभापती महोदय, अनेक गुन्ह्यामध्ये ॲट्रॉसिटी सारख्या केसेसमध्ये जातीचे दाखले उपलब्ध होत नाहीत. साक्षीदार फितूर होतात अशी जवळपास 25 कारणे आहेत. मात्र यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे तपासणी अधिकारी आणि अभियोक्ता यांचा आपसात समन्वय नाही. तसेच आणखी एक कारण असे आहे की,सरकारच्या वतीने केसेस चालविण्यासाठी जे वकील नेमले जातात, त्यांना शक्यतो आमच्याकडून लवकर फी मिळत नाही. ते सुध्दा यातील एक प्रमुख कारण आहे. कारण गृह विभागामार्फत, पोलिसांच्या मार्फत केसेस दाखल केल्या जातात. त्यासाठी विधी व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न्याय विभागामार्फत वकील दिले जातात.त्यांना वेळेवर फी मिळत नाही.बऱ्याच वेळेला बाहेर वकिली करण्यास अडचण असते. आमच्याकडे खूप चांगले काम करणारे काही वकील आहेत.मी सगळ्यांवर अन्याय करणार नाही.पण मी आपल्याकडेच घडलेला एक प्रसंग सांगतो. जिल्हा कोर्टाने डायसवरुन आपल्या वकिलांना विचारले की,"तुम्ही खरोखरच एल.एल.बी. झाला आहात काय?" तेव्हा आपण त्याठिकाणी अशा प्रकारचे मनुष्यबळ घेऊन लढाई करीत आहोत.त्यामुळे कन्व्हीक्शनचा रेट कमी आहे.आम्ही आता या सगळ्या गोष्टींमध्ये दुरुस्ती करण्याचे ठरविले आहे. मला आपले मत मान्य आहे की, संकेत समितीने जो अहवाल दिलेला आहे, त्यातील काही बाबींची कार्यवाही करण्यास आम्ही सुरुवात देखील केली आहे. यातील सर्व शिफारशींबाबत कालबध्द कार्यक्रम करुन तीन महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी होईल यादृष्टीने आम्ही दक्षता घेऊ. तसेच प्रॉसीक्युशन आणि पोलिसांचे को-ऑर्डीनेशन कसे राहील या दृष्टीने देखील एक महिन्याच्या आत प्रयत्न करु आणि पुढील वर्षी कन्व्हीक्शनच्या रेटमध्ये आम्ही नक्कीच वाढ करुन दाखवू, बदल करुन दाखवू एवढेच मी सदनाला सांगू इच्छितो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, याठिकाणी राज्यातील गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या सिध्दापराध प्रमाण अभ्यास समितीने दिनांक 28 सप्टेंबर 2011 रोजी जो अहवाल सादर केलेला आहे, तो अद्यापपर्यंत शासनाच्या विचाराधीन आहे असे उत्तर देण्यात आले आहे. मग आपण हा अहवाल केव्हा स्वीकारणार आहात हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच या अहवालातील एक कलम असे आहे की,"आरोपींकडे शिक्षेच्या संबंधात विचारपूस करुन खटले प्राथमिक स्तरावर निकाली काढण्यासाठी जागृती निर्माण करण्यात यावी." याचा नेमका अर्थ काय आहे? हे माननीय गृह मंत्री महोदयांनी मला सांगावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये अशी टेन्डन्सी निर्माण झाली आहे. एका बाजूने गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर त्यासाठी पुरेसे पुरावे नसताना सुध्दा आपल्या वरील जबाबदारी जावी म्हणून कोर्टामध्ये केस दाखल करताना पुरावे आहेत की नाही हे पाहिले जात नाही. एकदा चार्जशीट दाखल केल्यावर पुन्हा दोन-तीन वर्षे कोणी विचारावयास येत नाही. कोर्ट केस पेंडींग आहे. तुमचे तुम्ही तिकडे काय ते पहावे. अशामुळे केसचा पुढील तपासही होत नाही आणि चार्जशीट मात्र दाखल केले जाते. अनेक केसेसमध्ये आरोपींना जामीन मिळू नये म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31214 . . . .

श्री.आर.आर.पाटील .....

चार्जशीट लवकर दाखल केल्या जात आहेत.जर आपल्याला कन्व्हीक्शनचा रेट वाढवावयाचा असेल तर ज्या केसमध्ये सबळ पुरावे नाहीत त्याचा तपास पुढे सुरु राहिला पाहिजे. केवळ कोर्टामध्ये चार्जशीट दाखल केली म्हणजे तपास संपला अशा प्रकारचा निष्कर्ष पोलिसांनी सुध्दा काढता कामा नये. आपण ज्या अन्य राज्यांचा अभ्यास केला त्यानुसार तेथे ही परिस्थिती पाहिली जाते की, सबळ पुरावा असल्याशिवाय कोर्टामध्ये चार्जशीटच दाखल केली नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31214 ..... श्री. आर. आर. पाटील ....

महाराष्ट्रामध्ये मात्र आपण प्रत्येक केसच्या बाबतीत चार्जशीट पाठवितो. आता आपल्या त्या भूमिकेमध्ये सुध्दा बदल करण्याची आवश्यकता आहे. या पुढच्या काळामध्ये पुरावे असलेल्या केसेसच कोर्टामध्ये जातील आणि त्यामुळे कोर्टामध्ये दाव्यांची संख्या अनावश्यकपणे वाढणार नाही याचीही दक्षता घेतली जाईल. कमिटीचा जो अहवाल आहे तो कार्यवाहीत आणण्यास सुरुवात केलेली आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे विद्यापीठाच्या आवारात प्रेमी युगलाला हटकल्याने सुरक्षा अधिकाऱ्याचा गोळी घालून करण्यात आलेला खून

(४) * ३०२५४ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.अनिल भोसले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.मोहन जोशी : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठाच्या आवारात रात्रीच्यावेळी बसलेल्या प्रेमी युगुलाला विद्यापीठाच्या सुरक्षा रक्षकाने हटकल्याने प्रियकराने सुरक्षा रक्षकाला गोळया झाडून खून केल्याची घटना माहे मे, २०१२ च्या पहिल्या आठवडयात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर गोळीबारात मृत झालेल्या सुरक्षा रक्षकाच्या कुटुंबाला शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :(१) होय,

(२) व (३) सदर प्रकरणी सुरक्षा रक्षक बाबासाहेब प्रकाश निकाळजे यांनी दिलेल्या तक्रारीवरून चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१६३/२०१२ भा.दं.वि. कलम ३०२, आर्म ॲक्ट कलम ३(२५) अन्वये अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

(४) पुणे विद्यापीठामार्फत मयत सुरक्षारक्षक यांचे मुलाला नोकरी देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 3 मे रोजी पुणे विद्यापीठाच्या परिसरात ही घटना घडलेली आहे. त्या ठिकाणी एक प्रेमी युगुल बसले असताना त्यांना सुरक्षा रक्षकाकडून हटकण्याचा प्रयत्न झाला. त्यांना हटकण्याचा राग येऊन त्या तरुणाने त्यावर रिव्हाल्वरमधून गोळ्या झाडल्या. त्यात सुरक्षा रक्षकाचा जागेवरच मृत्यू झाला. या संदर्भात मी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये चौकशी सुरु आहे असे उत्तर दिलेले आहे. मी असा प्रश्न विचारलेला आहे की, यामध्ये सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई दिली का ? या बाबतीत चौथ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "त्याच्या मुलाला नोकरी देण्याची कार्यवाही पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु आहे." मी असा प्रश्न विचारु इच्छितो की, त्या सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाल्यामुळे त्याच्या मुलाला नोकरी लागेपर्यंत शासन त्यांच्या कुटुंबीयांना ठोस अशी रक्कम देणार

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30254 ..... श्री. चंद्रकांत पाटील ....

का ? हा प्रश्न जवळजवळ सर्व विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये येतो. कारण खूप मोठे कॅम्पस असतात. पुणे विद्यापीठामध्ये मुख्य प्रवेश व्दारावर सुरक्षा आहे परंतु अन्य जे तीन गेट आहेत तेथून कोणी आत आले किंवा गेले तरी कोणीही विचारत नाही. अशा प्रकारे ही मोठी कॅम्पस असल्यामुळे सुरक्षेच्या संदर्भात विद्यापीठांना कडक मार्गदर्शक तत्वे घालून देणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे मृत रखवालदाराच्या नातेवाईकाला नोकरी देण्यासंबंधीची कार्यवाही पुणे विद्यापीठातर्फे सुरु आहे. पुणे विद्यापीठाचा विचार केला तर त्या ठिकाणी 400 एकरचे कॅम्पस आहे आणि साधारणपणे 211 पहारेकरी त्या ठिकाणी काम करतात. निश्चितपणे संबंधित विभागातील डीसीपी यांना सांगून आणखी एकदा सुरक्षेचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना त्यांना दिल्या जातील. इतर ज्या विद्यापीठाच्या ठिकाणी असे कॅम्पस आहेत त्या ठिकाणी सुध्दा सूचना दिल्या जातील.

श्री. चंद्रकांत पाटील : त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, विद्यापीठाने नोकरी देण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि ती कार्यवाही योग्य आहे असे माझे मत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील ११ टक्के पदे रिक्त असल्याबाबत

(५) * ३०६७६ श्री.रामदास कदम : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील ११ टक्के पदे रिक्त असल्याची माहिती "ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट" च्या आकडेवारीवरून माहे मे, २०१२ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिकामी रहाण्याची कारणे काय आहेत व ती तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, आर. आर. पाटील यांच्याकरिता : (१) पोलीस महासंचालक ते पोलीस शिपाई या संवर्गातील मंजूर २,०६,९६२, या पदांपैकी १५,०५४ पदे सध्या रिक्त आहेत.

(२) व (३) रिक्त पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे:-

अ) मपोसे मधील पोलीस उपाआयुक्त या संवर्गातील अधिकाऱ्यांची निवडसूची तयार करण्यासाठी पदोन्नती समितीची बैठक झाली असून पुढील प्रक्रिया सुरु आहे.

ब) पोलीस उपअधिक्षक या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यासाठी निवडसूची तयार करण्यात येत असून सरळसेवा कोटयातून पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

क) पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे.

ड) पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील रिक्त पदांपैकी सरळसेवा कोटयातून पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

इ) सहायक पोलीस उपनिरीक्षक, पो. हवालदार व पो. नाईक या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ई) पोलीस शिपाई पदांची निवडप्रक्रिया पूर्ण झालेली असून वैद्यकीय व इतर तपासण्यांची कार्यवाही सुरु आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे माझे समाधान झाले आहे. परंतु एक गोष्ट मला माननीय मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील यांना विचारावयाची आहे की, मधल्या काळामध्ये समांतर आरक्षणाची योग्य ती अंमलबजावणी न झाल्यामुळे ज्या पोलिसांनी भरती केली होती त्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार निष्कासित केले. विशेषत: त्यांना आय-कार्ड दिले होते. युनिफॉर्म दिले होते तसेच काही लोकांनी दोन तीन महिने बंदोबस्ताचे काम केले. अशा लोकांना आपण पूर्ण निष्कासित केले. त्यातील दोन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30676 ..... श्री.रामदास कदम...

मुलींनी आत्महत्या केली. हा विषय अतिशय सहानुभूतिपूर्वक हाताळावा लागेल. कारण एका बाजूला न्यायालयाचे आदेश आहेत आणि दुसऱ्या बाजूला आपण पोलीस भरती केलेली आहे आणि नंतर त्या सर्वांना आपण घरी बसविले आहे. त्यामुळे सहानुभूतिपूर्वक निर्णय घेऊन त्यांना कशा प्रकारे सेवेमध्ये सामावून घेता येईल याबाबत शासन विचार करणार का ? ज्यांनी चुकीच्या पध्दतीने भरती केली त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी कोणतीही चूक केलेली नाही. आपण नेहमीच्या पध्दतीने भरती केलेली आहे. पण त्यानंतर समांतर आरक्षणाची अंमलबजावणी कशा पध्दतीने करावी या बाबतीत सुप्रीम कोर्टाने आदेश दिले. त्या पूर्वी ही भरती त्या त्या जिल्ह्यामध्ये झाली आणि ज्यांना ऑर्डर दिली त्यांना कोणालाही कमी केलेले नाही. पण काही जिल्ह्यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांच्या याद्या लावल्या होत्या आणि ऑर्डर देण्याची प्रक्रिया सुरु होती परंतु एकदा सुप्रीम कोर्टाचे आदेश आल्यानंतर पुढची प्रक्रिया आपण थांबविली. त्यांचे सिलेक्शन झाले होते आणि बाकीच्या कागदपत्रांची तयारी करण्यास सांगितले होते. फक्त तांत्रिकदृष्ट्या त्यांना ऑर्डर द्यावयाची राहिली होती. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा निकाल लागण्यापूर्वी ज्यांना ऑर्डर दिली होती त्यातील कोणाला कमी केले असेल तर आपण माझ्याकडे नावे द्यावीत. त्या बाबतीत मी जरुर सहानुभूतिपूर्वक पाहीन आणि सर्व मुलांना अशा स्वरुपाचा जो न्याय दिला आहे तो न्याय त्याही मुलांना देण्यात येईल. पण काही मुले सिलेक्ट झाली होती. यावेळी पोलीस भरतीसाठी लाखो विद्यार्थी येत आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30676.... श्री.आर.आर.पाटील...

त्यापैकी फक्त एक हजार अर्ज घेण्यात येतात. त्यामध्ये फक्त परीक्षा घेणे एवढाच मर्यादित विषय नसतो. काही मुले प्रशिक्षणासाठी घरादारा बाहेर जातात. 4-4 महिने रस्त्यावरुन पळण्याची प्रॅक्टीस करीत असतात आणि त्याच्यातून निवड केलेल्या मुलांवर अशा प्रकारचे संकट आलेले आहे. त्यांच्याही बाबतीत निश्चितपणे सहानुभूतिपूर्वक विचार करु. परंतु ही मुले कोर्टामध्ये गेलेली असल्यामुळे कोर्टाकडून त्याबाबत निर्णय येईल.

राज्यातील पोलिसांच्या रिक्त पदांचा मुख्य प्रश्न होता. काही प्रकरणे जातीचे दाखले न मिळाल्यामुळे रखडली होती. मध्यंतरी एम.पी.एस.सी.चे कामकाज 4-5 वर्षे बंद होते. त्यामुळे एका बाजूला पदे रिक्त होत गेली आणि दुसऱ्या बाजूला पदे भरली गेली नव्हती. त्यामुळे पी.एस.आय.ची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त झाली होती. गेल्या दोन वर्षात एम.पी.एस.सी.कडून चांगल्या प्रकारे पी.एस.आय.ची भरती प्रक्रिया सुरु केली असून त्यांच्याकडून 1869 उमेदवारांची यादी शासनाला प्राप्त झालेली आहे. त्यांचे सप्टेंबर, 2012 पासून प्रशिक्षण सुरु होईल. त्यांनी 1013 पी.एस.आय.च्या निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आणलेली आहे. नवीन 590 पदे भरण्यासाठी एम.पी.एस.सी.कडे मागणी केलेली आहे. त्यांचे फिल्डवर प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व ही निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तांत्रिकदृष्ट्या राज्यात पी.एस.आय.च्या पदांचा अनुशेष राहणार नाही. ही सर्व पदे भरली जातील. आज पोलिसांची रिक्त पदे मोठ्या प्रमाणात दिसत आहेत त्यामध्ये कॉन्स्टेबल्सची पदे आहेत. राज्यामध्ये अनेक ठिकाणी कॉन्स्टेब्ल्सची भरती सुरु आहे. ती पूर्ण झाल्यानंतर येत्या 2-3 महिन्यात ही रिक्त पदे दिसणार नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात पोलीस भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आणि मराठवाड्यातील एकाच जिल्ह्यातील बऱ्याच उमेदवारांची निवड करुन त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मी नागपूर येथील अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी माननीय गृह मंत्र्यांनी यासंबंधी चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई केली जाईल असे सभागृहात आश्वासन दिले होते. ती चौकशी कोणत्या टप्प्यावर आहे ? रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग शहरामध्ये परीक्षेच्या वेळी पेपर फुटला होता. उमेदवारांकडून नंतर पेपर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लिहून घेतले होते. त्या भरती प्रक्रियेची संपूर्ण चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. ती चौकशी कोणत्या टप्प्यावर आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एखाद्या ठिकाणी अनियमितता असू शकते. परंतु राज्यात पोलीस भरतीमध्ये भ्रष्टाचार झाला असे मी मान्य करु शकत नाही. कारण भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणलेली आहे. ज्या ठिकाणी भरती असते तेथे सी.आय.डी.चे एक अधिकारी, ॲण्टी करप्शन ब्युरोचे एक अधिकारी व डी.जी.कार्यालयातील एक अधिकारी उपस्थित असतात. अशा प्रकारे बाहेरुन आलेले 3-3 अधिकारी उपस्थित असतात. एखादी भरती प्रक्रिया चांगली होत असते. राज्यामध्ये जे चांगले होत असते ते सुध्दा सांगितले पाहिजे. त्यातील त्रुटी तर नेहमीच दाखविल्या जातात परंतु जे चांगले होते ते सुध्दा दाखविले पाहिजे. राज्यातील पोलिसांच्या भरती प्रक्रियेचे अनुकरण देशातील अनेक राज्ये करीत आहेत. आपल्याकडून ते माहिती घेत आहेत.

भरती प्रक्रियेमध्ये निबंध हा विषय काढून टाकण्यात आला आहे. पर्यायी प्रश्नांचा समावेश परीक्षेत सुरु केलेला आहे. त्याचप्रमाणे लेखी उत्तर पत्रिकेची कार्बन प्रत विद्यार्थ्यांच्या हातामध्ये असते. लेखी परीक्षेचे गुण त्याला लगेच कळू शकतात. त्याचप्रमाणे मुलाखतीचा भाग काढून टाकण्यात आला आहे. त्यामुळे वशिलेबाजीला कोठेही स्कोप मिळत नाही. ग्राऊंडवरील शारीरिक चाचणीचे गुण सर्वांसमक्ष त्या विद्यार्थ्यांच्या हातूनच लिहून घेतले जातात. म्हणजे सेल्फ असेसमेण्ट सारखी 100 टक्के पारदर्शक भरती प्रक्रिया सुरु केलेली आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेत भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी राज्यातून निश्चितपणे प्राप्त झालेल्या नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मागील वेळी रायगड जिल्ह्यातील अनियमिततेबाबत तक्रार केली होती. ती तक्रार कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहे हे मी त्यांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी सांगेन. परंतु आपल्या राज्यात चांगली पोलीस भरती प्रक्रिया सुरु आहे.

सभापती : सन्माननीय गृह मंत्र्यांनी पोलिसांची भरती प्रक्रिया अतिशय निकोप पध्दतीने सुरु केली आहे, त्याबाबत ते कटाक्षाने लक्ष देत असतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु एका ठिकाणी माझ्या निदर्शनास अशी बाब आलेली आहे की, खेळाडू कॅटेगरीतील काही खेळाडूंची पोलीस दलामध्ये भरतीसाठी निवड करण्यात आली होती. त्यांची एक वेटिंग लिस्टही तयार करण्यात आली होती.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतरच्या काळात काही जागा रिक्त झाल्यामुळे ती मुले चौकशीसाठी गेली होती. त्यावेळी त्यांना असे सांगण्यात आले की, आता हा नियम बदलेला आहे. त्यामुळे तुमची निवड होऊ शकणार नाही. मुंबईतील रेल्वे पोलीस दलातील भरती प्रक्रियेबाबत मी हे सांगत आहे. यापूर्वी मी ही बाब सन्माननीय गृह मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्या उमेदवारांना न्याय देता आला तर मंत्री महोदयांनी पुन्हा एकदा या प्रकरणी जरुर लक्ष घालावे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : कोणत्या खेळाडूला नोकरी द्यावी या संबंधी क्रीडा विभागाने नियम केलेले आहेत. कोणत्या कॅटेगरीतील खेळाडू कोणत्या स्तरावर खेळला की तो नोकरीस पात्र ठरतो यासंबंधी क्रीडा विभागाने परिपत्रक काढून तसे पोलीस विभागाला कळविलेले आहे. काही विद्यार्थ्यांकडे सर्टिफिकेटस् आहेत. परंतु क्रीडा विभगाने जी पात्रता ठरविलेली आहे ते सर्टिफिकेट त्यांच्याकडे नाही. त्यामुळे त्या जागा रिक्त ठेवलेल्या आहेत. माननीय सभापती महोदय, आपण केलेली सूचना माझ्याकडे आलेली होती. अनेक विद्यार्थ्यांच्या तक्रारी देखील आलेल्या होत्या. या बाबतीत क्रीडा विभागाशी चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आगामी खरीप हंगामासाठी बी.टी. कॉटनच्या बियाण्यांच्या मागणीत आणि पुरवठा करण्यासंबंधीच्या उपाययोजनेबाबत

(६) * ३०१८८ श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापूस उत्पादक जिल्ह्यातून बी.टी.कॉटनच्या बियाण्यासंबधी किती बॅगची मागणी शासनाकडे नोंदविण्यात आली आहे,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने दिनांक २० जूनपर्यंत जिल्हानिहाय किती बॅगचा पुरवठा करण्यात आला आहे,

(३) बी.टी. कॉटनच्या बियाणे जिल्हानिहाय कोणकोणत्या विक्रेत्यांनी बियाणे कंपनीकडे अनामत रक्कम भरुन किती बॅग देण्याची नोंदणी केली होती व संबंधित विक्रेत्यांना किती बॅगचा पुरवठा केला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता : (१) राज्यातील २४ कापूस उत्पादक जिल्ह्यातून १६० लाख बी.टी.कापूस बियाणे पाकीटांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

(२) मागणीच्या अनुषंगाने दिनांक २० जून, २०१२ पर्यंत १५५ लाख पाकीटांचा जिल्हानिहाय पुरवठा करण्यात आला असून जिल्हानिहाय एकूण मागणीच्या सरासरी ९७ टक्के पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) राज्यात कोणत्याही विक्रेत्याने अनामत रक्कम भरून बीटी कापूस बियाण्यांची आगाऊ नोंदणी केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर हे आता सभागृहामध्ये नसले तरी मला त्यांचा फोन आलेला आहे. ते सभागृहामध्ये येतच आहेत. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी हा तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात हरकत नाही.

श्री. विनोद तावडे : शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर बी.टी.कॉटन बियाण्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये बी.टी.कॉटन बियाण्याचा पुरवठा होईल याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. अजित, महिको, मल्लिका अशा प्रकारच्या बियाण्यांची टंचाई जाणवत आहे. मागील वेळी सभागृहामध्ये असे सांगितले होते की, बियाण्यांच्या संदर्भात आगाऊ बुकींगचा आग्रह धरला जाणार नाही. परिस्थिती अशी आहे की, ज्या शेतक-यांनी आगाऊ बुकींग केले त्यानांच बियाणे मिळालेले आहे. आगाऊ बुकींग केल्याचे पुरावे सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी गोळा केलेले आहेत.हे पुरावे आपणाकडे सादर केल्यानंतर त्याबाबतीत आवश्यक ती

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारवाई करण्यात येईल काय ? अजित, महिको, मल्लिका या बियाण्यांचा काळाबाजार करणा-या कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : बी.टी. कॉटन बियाण्याची 1 कोटी 60 लक्ष पाकिटांची मागणी होती. त्यापैकी 20 जून 2012 पर्यंत 1 कोटी 55 लाख म्हणजे 97 टक्के पाकिटांचा पुरवठा झालेला आहे. 13 जुलै 2012 पर्यंत 1 कोटी 77 लाख पाकिटांचा पुरवठा झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे 15:73:51 या कणक बियाण्याचा पुरवठा 28 टक्के झालेला आहे. बाकीच्या सर्व बियाण्यांचा पुरवठा मागणी प्रमाणे केलेला आहे. बियाण्याचा कुठे काळाबाजार झालेला असेल तर त्याबाबतीत विभागामार्फत वेळोवेळी कारवाई केलेली आहे. काही ठिकाणी पोलीस केसेस दाखल केलेल्या आहेत, काही प्रकरणी परवाने रद्द केलेले आहेत तर काही बियाण्यांच्या विक्रीवर बंदी घातलेली आहे. अशा प्रकारे विभागामार्फत कारवाई सुरु असते. आता बियाण्यांच्या पुरवठ्याच्या बाबतीत कोणतीही अडचण राहिलेली नाही.

श्री. विनोद तावडे : आगाऊ बुकींग केल्या प्रकरणी कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : कोठेही बुकींग झाल्याचे आढळून आलेले नाही. अशा तक्रारी आलेल्या असतील तर त्या बाबतीत कारवाई ही केलीच जाते.

श्री. सय्यद पाशा पटेल : 97 टक्के बियाण्यांचा पुरवठा झालेला आहे असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. एवढा सुरळीत बियाण्याचा पुरवठा झालेला असताना नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील शेतक-यांवर आणि बीड जिल्ह्यातील पाटोडा तालुक्यातील शेतक-यांवर पोलिसांना लाठी हल्ला का करावा लागला ? पूर्वी बी.टी. बियाण्याच्या बाबतीत फवारण्या कमी आणि उत्पादन जास्त अशी परिस्थिती होती. आता फवारण्या जास्त आणि उत्पादन कमी अशी परिस्थिती आहे. शेतक-यांच्या मनामध्ये यामुळे चलबिचल सुरु झालेली आहे. ही भावना शेतक-यांच्या मनामध्ये निर्माण होण्याचे कारण काय ?

...नंतर श्री. अजित...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. 30188..

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय,माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बी.टी.कॉटनच्या संदर्भात आगाऊ बुकींग घेतले जाते काय असा प्रश्न विचारला. या प्रश्नाचे उत्तर माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिलेले आहे.

सभापती महोदय, मी मागे सभागृहात उल्लेख केला होता की, या व्यवस्थेला कीड लागलेली आहे. परंतु आम्ही मागील दोन वर्षात 80 टक्क्यापर्यंत हा प्रकार नियंत्रणात आणलेला आहे. तथापि यामध्ये अजून सुधारणा करण्यास वाव आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी सांगितले की, शेतकऱ्यांवर लाठीमार करण्यात आला. कनक 7351 बियाणांच्या पुरवठ्या बाबत महिको कंपनीकडून कृत्रिम टंचाई निर्माण करण्यात आली असे सकृतदर्शनी चित्र समोर आले आहे. मी मागील आठवड्यात सभागृहात सांगितले होते की, या कंपनी विरुध्द एफ.आर.आय. दाखल करण्यात आलेला आहे. बीड न्यायालयात त्यांना जामीन नाकारण्यात आला होता. परंतु औरंगाबाद खंडपीठाने त्यांना कंडीशनल बेल दिलेला आहे आणि त्या संदर्भातील कार्यवाही सुरु आहे. त्या कंपनीचे लायसन्स रद्द करणे तसेच महाराष्ट्रात त्या कंपनीचे नाव काळ्या यादीत घालणे या संदर्भातील अंतिम सुनावणी आयुक्त, कृषी यांच्या स्तरावर सुरु आहे. या संदर्भात राज्य शासन कठोर कारवाई करीत आहे.

सभापती महोदय, बोंड आळीचा प्रादूर्भाव कमी व्हावा म्हणून आपण बी.टी.वाणाचा वापर केला होता. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे फवारणीचा खर्च वाढत आहे. तेव्हा या संदर्भात कृषी विद्यापीठांना सूचना देण्यात येतील. खरे म्हणजे बी.टी.बियाण्यांचा वापर जिराईत शेतीकरिता आणि कोरडवाहू शेतीकरिता झाला पाहिजे. परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. आपण बागाईत क्षेत्राला पूरक असे वाण वापरत आहोत. आपले कृषी विद्यापीठ संशोधन करण्यामध्ये कमी पडलेले आहे हे मला निश्चितपणे मान्य करावे लागेल. तेव्हा आम्ही या वर्षी सुधारित वाण उपलब्ध करुन देण्या बाबत पुढाकार घेतलेला आहे. जिराईत आणि कोरडवाहू शेतीला पूरक असे वाण उपलब्ध झाल्यास उत्पादनामध्ये त्याचा चांगला परिणाम दिसेल आणि वाढीव फवारणीचा खर्च देखील कमी होईल. कारण हवामानाशी विसंगत असे ते संशोधन झालेले आहे. सन्माननीय सदस्य देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30188..

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

माझ्या मताशी सहमत असतील. आम्ही या वर्षी प्रत्येक जिल्ह्यामध्ये गावनिहाय किती क्षेत्र कपाशी खाली आलेले आहे, शेतकऱ्यांनी कोणते वाण वापरले आहे, ते कोणत्या दुकानातून घेतले, कृषी आयुक्तालयाकडून जिल्ह्याला आणि तालुक्याला वाणाचा पुरवठा केलेला आहे त्याच्याशी तो सुसंगत आहे काय इत्यादी माहिती देण्या बाबत कळविलेले आहे. या संदर्भातील माहिती महिन्याभरात मिळेल. या माहितीमुळे बियांण्याच्या काळ्या बाजाराची शृंखला कमी होण्यास मदत होईल. आपण अशाप्रकारे सूक्ष्म नियोजन करुन कार्यवाही सुरु केलेली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती जिल्ह्यातील योजने अंतर्गत अ,ब,क कार्यक्रमांनुसार रस्ते देखभाल दुरुस्तीच्या कामांत मोठ्या प्रमाणात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत

(7) * 30744 डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती जिल्ह्यातील योजने अंतर्गत अ,ब,क कार्यक्रमांनुसार रस्ते देखभाल दुरुस्तीच्या कामांत मोठ्या प्रमाणात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 5 ऑगस्ट, 2011 व दिनांक 27 डिसेंबर, 2011 रोजी वा त्या सुमारास अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती यांना व दिनांक 18 एप्रिल, 2012 रोजी मुख्य अभियंता, सा.बा. विभाग, अमरावती यांना निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आहे आहे,

(3) असल्यास, त्यानुसार संबंधित कंत्राटदारावर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1) लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे.

(2), (3) व (4) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यातील रस्त्यांची दुरुस्तीची कामे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासन करोडो रुपये देते. परंतु रस्त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती होत नसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "चौकशी करुन अहवाल सादर करण्यात येईल." त्यासाठी मी शासनास धन्यवाद देतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी पाठविलेल्या पत्रांची अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जात नाही. तेव्हा अधिकाऱ्यांना याबाबत समज दिली जाईल काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30744....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी पाठविलेल्या पत्रांना उत्तरे देण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्यांनी पहिले पत्र एस.ई.ना पाठविले होते. त्या पत्राचे उत्तर त्यांनी दिलेले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी तशाच आशयाचे पत्र एक्झिक्युटीव्ह इंजिनियर यांना पाठविले. त्यांनी देखील सन्माननीय सदस्यांच्या पत्राचे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी "एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांनी उत्तर देण्यास दिरंगाई केली. त्यांनी मला सविस्तर माहिती दिली नाही, तेव्हा या कामाची चौकशी होणे अपेक्षित आहे. मला या कामाबाबत शंका आहे" अशा आशयाचे पत्र दिले. त्या पत्राच्या अनुषंगाने आम्ही चौकशी केली.

यानंतर श्री.गिते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30744... श्री. रणजित कांबळे....

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात अशाच प्रकारचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. बजेट रिपेअरची "अ""ब""क""ड", डी.पी.सी.ची सर्व कामे, ठक्करबाप्पा योजनेची सर्व कामे, खनीज विकास निधीची सर्व कामे, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला डिव्हीजन यांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षापासून होत आहेत, त्या सर्व कामांची सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी चौकशी करण्याची मागणी केली होती. आता त्यांनी अमरावती विभागातील अशाच प्रकारच्या कामांची चौकशी करण्यासंबंधीची मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे पत्र माझ्याकडे आहे.

महोदय,मी नम्रपणे सांगू इच्छितो की, विभागाच्या दक्षता पथकाकडून 350 कामांची तपासणी केली जात असते. या कामांच्या व्यतिरिक्त ज्या कामांची तक्रारी येत असतात, त्यांची देखील चौकशी केली जाते. मागच्या अधिवेशनात जेवढया कामांची चौकशी करण्याची मागणी केली होती, त्यातील 100 कामांची तपासणी करण्याचे आदेश दिलेले आहेत. या वर्षी अमरावती डिव्हीजनमध्ये जवळपास 3 हजार 159 कामे आहेत. त्यातील 100 कामांची चौकशी आम्ही पुन्हा सुरु केलेली आहे. एखादे काम चुकीचे झाले असेल, एखाद्या कामात गैरव्यवहार झाला असेल, अशी सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक तक्रार माझ्याकडे केली तर त्या कामांची निश्चितपणे चौकशी करण्याची माझी तयारी आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक 50 कामांची यादी दिली तर त्या कामांची चौकशी करु. पण 3500 कामांची चौकशी करणे शक्य नाही असे मी नम्रपणे या ठिकाणी सांगू इच्छितो. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, काही स्पेसिफीक कामांच्या संबंधी तक्रारी असतील तर जरुर माझ्याकडे कराव्यात, त्या तक्रारींची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल व त्या चौकशी बाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना तसेच सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास मी तयार आहे.

डॉ.रणजित पाटील : मागील अधिवेशनात अशाच प्रकारच्या विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मला 350 पानांची नस्ती विभागाकडून प्राप्त झालेली आहे. या वेळेस देखील 100 ते 150 पानांची नस्ती पाठविली आहे. मी "अ""ब""क" या कामासंबंधी माहिती मागितली होती, ती माहिती त्या नस्तीत देण्यात आलेली नाही. ही बाब मी त्यावेळी देखील माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती. मी तीच बाब आज देखील सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मला जी नस्ती प्राप्त झालेली आहे, ती नस्ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांकडे जी यादी पाठविण्यात आलेली आहे, ती यादी माझ्याकडे आहे. त्या माहितीमध्ये "अ""ब""क""ड" कामाबाबतची माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक कामांची तक्रार केली तर त्या तक्रारींची चौकशी करण्यास मी तयार आहे. परंतु जी कामेच माहिती नाहीत, त्या अनुषंगाने सर्वसाधारण चौकशी करणे हे बरोबर नाही. ज्या 10 टक्के कामांची प्राथमिक रँडमली चौकशी केलेली आहे,त्या कामांमध्ये कोठेही अनियमितता आढळून आलेली नाही. या कामांची डिटेल चौकशी करण्यासाठी वेळ लागेल. यात क्रश, क्वॉलिटी आणि स्पेसिफीकेशनची चौकशी केली असून त्याबाबतचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर त्या बाबतची माहिती सभागृहाला दिली जाईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील जूहू परिसरातील ओकवूड हॉटेलमध्ये सुरू असलेली रेव्ह पार्टीवर अतिरिक्त पोलीस आयुक्त यांच्या पथकाने टाकलेली धाड

(८) * ३१२७१ डॉ.निलम गोऱ्हे , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री. भाई जगताप , श्री.उल्हास पवार , श्रीमती अलका देसाई , श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.जयवंत जाधव , श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , डॉ.सुधीर तांबे , श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जूहू परिसरातील ओकवूड हॉटेलमध्ये सुरू असलेली रेव्ह पार्टी अतिरिक्त पोलीस आयुक्त यांच्या पथकाने दिनांक २० मे, २०१२ रोजी छापा टाकून उघडकीस आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेव्ह पार्टीत १९ नागरिक परदेशी असल्याचे तसेच "आयपीएल" मधील दोन खेळाडू व एका अभिनेत्रीचा समावेश असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे का,

(३) तसेच सदर पार्टीत १५०ग्रॅम कोकेन, १०० ग्रॅम एक्सएमडी ह्या अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार संबंधित दोषींवर व अशा प्रकारे रेव्ह पार्टी आयोजित करणाऱ्या संबंधितांवर तसेच अंमली पदार्थाचे सेवन केलेल्या तरूण-तरुणींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे तसेच हॉटेलचा परवाना कायम रद्द करण्यात आला आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय,

(२) सदर पार्टीत २१ परदेशी नागरीक सहभागी होते. एक परदेशी आयपीएल खेळाडूसह एकूण दोन आयपीएल खेळाडू व एका अभिनेत्रीचाही पार्टीत समावेश होता.

(३), (४) व (५) सदर पार्टीत ११० ग्रॅम कोकेन व ५४ ग्रॅम चरस जप्त करण्यात आले असून सदर पार्टीचे आयोजक व संचालक यांना अटक करण्यात आली आहे त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर पार्टीत सामील झालेल्या ९० व्यक्ती संदर्भात रासायनिक विश्लेषण अहवाल

४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागविण्यात आले आहेत. अद्यापपर्यंत प्राप्त झालेल्या ४६ अहवालांपैकी ४४ अहवाल सकारात्मक तर २ अहवाल नकारात्मक आहेत. सकारात्मक अहवाल आलेल्या व्यक्ती विरुध्द कारवाई करण्यात येत आहे उर्वरित ४४ प्रकरणातील अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.

त्याचप्रमाणे हॉटेलच्या परवान्या संदर्भातही कारवाई करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरातील जुहू परिसरामध्ये फेसबुकच्या माध्यमातून, एजन्टच्या माध्यमातून रेव्ह पार्टी होणे, त्यात अंमली पदार्थांचा सर्रास वापर होणे, अशा पाटर्यांना मोठया प्रमाणात तरुण वर्ग उपस्थित राहणे, परदेशी नागरीक उपस्थित राहणे, यांचे एक मोठे नेटवर्क असणे, या गोष्टी राज्यातील तरुणांना घातक ठरणाऱ्या आहेत. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, शासनाने हॉटेलच्या परवाना रद्द करणेसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. सरकारने नुकताच गुटखा बंदीचा निर्णय घेतलेला आहे. राज्यातील तरुणांना व्यसनमुक्त करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. अशा वेळी मुंबई शहरात रेव्ह पाटर्या होणे आणि अंमली पदार्थाचा मोठया प्रमाणात वापर होणे ही गोष्ट आपल्या राज्याला भूषणावह नाही. या रेव्ह पार्टी ज्या हॉटेलमध्ये झालेली आहे, त्या हॉटेलचा परवाना कायम स्वरुपी रद्द करण्याची कारवाई शासन करणार काय, सदर हॉटेलचा परवाना किती दिवसात रद्द केला जाणार आहे, अंमली पदार्थांचे जे मुख्य सप्लायर्स आहेत, त्यांच्या विरुध्द शासन कोणत्या प्रकारची कडक कारवाई करणार आहे, सदर नेटवर्क उद्‌ध्वस्त करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलिसांना समजलेल्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी स्वत:हून ॲडीशनल सी.पी.च्या नेतृत्वाखाली पथक नेमले आणि त्या पथकाने ही कारवाई केलेली आहे. सदर कारवाई अत्यंत चांगल्या पध्दतीने केलेली आहे. या रेव्ह पार्टीत अनेक परदेशी नागरिक, अनेक तरुण मुले, मुली सापडल्या. तसेच त्या पार्टीत कोकेन, चरस अशा प्रकारचे अंमली पदार्थ देखील मोठया प्रमाणात सापडले. या हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकल्यानंतर पोलिसांवर टिकाटिप्पणीही केली गेली. त्या पार्टीत सहभागी झालेल्या तरुणांनी अंमली पदार्थांचे सेवन केले होते किंवा नव्हते....

यानंतर श्री. कानडे....

अशुद्धित प्रत / शुद्धिपत्रासाठी नाही

श्री. आर.आर.पाटील..... ता. प्र. क्र. 31271.....

त्यांनी ड्रग्ज घेतले की नाही यासाठी 44 नमुन्यांची तपासणी केली असता त्या अहवालानुसार 44 नमुने पॉझिटिव्ह आढळून आले त्यामुळे या तरुणांनी ड्रग्ज घेतले हे स्पष्ट झाले. तसेच अशा प्रकारे ड्रग्ज घेणे हे बेकायदेशीर आहे. त्यानंतर ही पार्टी कोणी आयोजित केली व ड्रग्ज कोठून आले यासंबंधीची कारवाई पोलिसांनी केली आहे. तसेच यामध्ये हॉटेल मालकालाही अटक करण्यात आली होती. तसेच हॉटेल मालक या प्रकरणात दोषी आढळून आला तर त्या हॉटेलचा परवाना रद्द करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : महोदय, पोलिसांनी ही कारवाई सुओ-मोटो केली याबद्दल दुमत नाही. परंतु यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. एक तर हॉटेलच्या मालकाचा दोष यात असण्याची शक्यता आहे कारण त्या हॉटेलमध्येच ही पार्टी आयोजित करण्यात आली होती हे स्पष्ट दिसून येते. या हॉटेल मालकाचा परवाना रद्द करण्यात येणार काय ? आम्ही काहीही केले तर आमच्या विरुध्द काहीच कारवाई होत नाही अशी प्रवृत्ती बळावत चालली असल्याने या हॉटेल मालकाचा परवाना शासन कधी रद्द करणार आहे ? त्याचप्रमाणे हॉटेल्स व कॉलेजेसच्या ठिकाणी ड्रग्ज विकणाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, समाजात व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढू नये आणि खुले आम ड्रग्ज मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ नये याबाबतीत शासनाने काही निर्णय घेतले आहेत. मी इतकेच सांगू इच्छितो की, पोलिसांनी जी कारवाई केली त्याचे रिझल्ट्स आपल्याला बघायला मिळतील. या केस मध्ये सुध्दा मालकाला पाठीशी घालण्याचा शासनाचा हेतू नाही. शासनाला किंवा पोलिसांना हॉटेल मालकाला तसे प्रोटेक्ट करावयाचे असते तर ही कारवाई केली नसते पण शासनाला कोणालाही पाठीशी घालावयाचे नाही. तसेच तपास पूर्ण होण्यापूर्वी जर कारवाई केली तर अनेक वेळा कोर्टातून स्टे मिळण्याची दाट शक्यता असते आणि यापूर्वी असे अनेक वेळा घडले आहे. याचा अर्थ सरकार कारवाई करण्यास मागे पुढे पाहणार नाही पण प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जर हॉटेल मालकाचा दोष आढळून आला तर त्या हॉटेलचा परवाना कायमस्वरुपी रद्द केला जाईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31271.....

श्री. हेमंत टकले : महोदय, मोठ्या शहरांमध्ये रेव्ह पार्टयां होत असतात पण हे लोण आता हळुहळु मुंबईच्या बाहेरही पसरत चालले आहे. याचे कारण म्हणजे मुंबईत अशा पार्ट्यांवर बंधने येऊ लागली तसेच कारवाया होत आहेत त्यामुळे यात गुंतलेले लोक हायवे वरील हॉटेल्समध्ये अशा पार्ट्यांचे आयोजन करतात. त्यामागचे कारण म्हणजे यातून मिळणारा भरमसाठ पैसा व सहज होणारी उपलब्धता याचे आकर्षण इतके मोठे असते की आज जरी आपण बंद केले तरी दोन तीन महिन्यांनी हे लोक दुसरीकडे आयोजन करीत असतात. यावर कायम स्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी शासन कोणत्या विशेष उपाययोजना करणार आहे ? याचे समाजावर भयंकर दु:ष्परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे सातत्याने अशा पार्टयांवर तपासणी करुन कारवाया करणे हाच एक उपाय आहे, त्याबाबत शासन गांभीर्याने विचार करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, पोलीस दलाने अतिशय चांगल्या प्रकारची कारवाई केली आहे. अंमली पदार्थांच्या विरोधात केंद्र सरकारचा एक विभाग काम करीत असतो. आपणही आपल्या राज्यात अंमली पदार्थविरोधी पथके तयार केली आहेत. यामध्ये जी कारवाई केलेली आहे ती पाहिली तर या वर्षात 503 गुन्ह्यांची आतापर्यंत नोंद झालेली आहे. तसेच 847 लोकांना पोलिसांनी अटक केली आहे. ही वाढती आकडेवारी लक्षात घेऊन शासनाने खास पथके नेमली असून त्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 31271 .....

श्री. आर.आर.पाटील ....

स्थानिक पोलीस स्टेशनने सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील गुन्ह्यांना पोलिसांचा पाठिंबा आहे हे स्पष्ट होईल त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्याची भूमिका घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, एखादा गुन्हेगार सुटला तरी चालेल परंतु निरपराध्याला सजा होता कामा नये असे म्हटले जाते. आज असे लक्षात येते की, ज्यावेळेस रेव्ह पार्टीवर किंवा हॉटेलवर धाडी टाकल्या जातात त्या ठिकाणी दूरचित्रवाणीचे कॅमेरे जातात किंवा मीडियाच्या लोकांना नेऊन त्याचे चित्रीकरण केले जाते व ते सर्रास टीव्हीवर दाखवले जाते. जे निरपराध लोक असतात त्यांचेही चित्रीकरण त्यामध्ये केले जात असते. रेव्हपार्टीच्या प्रकरणात दोन व्यक्तींनी अमली पदार्थांचे सेवन केलेले नव्हते हे सिध्द झालेले असतांनाही त्यांचे चित्रीकरण करुन बदनामी करण्यात आली होती. त्यामुळे या पुढील कारवाया इनकॅमेरा केल्या जातील काय ? पब्लीसिटी टाळण्याचे आदेश माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, पब्लीसिटीसाठीच कारवाया होतात असा कोणाचा समज असेल तर तो चुकीचा आहे. रेव्ह पार्टीच्या प्रकरणात पोलिसांनी आपल्या पध्दतीनेच काम केले होते परंतु एवढया मोठया संख्येने पोलीस कोठे गेले तर त्याची माहिती मीडियाला आपोआप मिळत असते. कोणत्या ठिकाणी काय सुरु आहे याची माहिती मीडियाला असतेच. पोलिसांनी मॅनेज करुन अशा कारवाया होत नसतात. मीडिया आता फार गतिमान झालेला आहे. मीडियाला टाळणे आता अवघड झालेले आहे. एखादा माणूस हॉटेलमध्ये गेला आणि त्या हॉटेलमध्ये पोलिसांची धाड पडली व त्याचे चित्रीकरण झाले तर ज्यांची काही चूक नसते त्यांची नाहक बदनामी होत असते. त्यामुळे शक्यतो अशा कारवाया करतांना मीडिया बाजूला राहील याची काळजी पोलिसांनी घ्यावी अशा सूचना पोलिसांना निश्चितपणे दिल्या जातील.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. पहिली सूचना सकाळी 9.32 वाजता आलेली आहे. विधान परिषद सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपल्या सूचनेमध्ये म्हटले आहे की, "आदिवासी विकास विभागाच्या राज्यभर अनुदानित व शासकीय आश्रम शाळा सुरु असणे, आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च होऊनही प्रत्यक्षात मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागणे, माननीय मुंबई उच्च न्यायालय यांनी दखल घेऊन याबाबत शासनास सूचना देऊनही प्रत्यक्षात अंमलबजावणी न होणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आकस्मिक मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, राधाकृष्णन (ता. देवरी जि. गोंदिया) आश्रमशाळेतील सहा मुलांना शाळेत सर्पदंश होणे, त्यात दोन मुलांचा मृत्यू होणे, चार मुले अत्यअस्वस्थ असणे, याबाबत अधीक्षक व आश्रमशाळांना अनुदान देतांना भेदभाव करणे, पुरेसा निधी उपलब्ध न होणे, निधीअभावी संस्था चालकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यास अडचणी निर्माण होणे, आदिवासी आश्रमशाळेच्या दुरवस्थेला शासन जबाबदार असणे, मुलींच्या आश्रमशाळांमध्ये अनैतिक प्रकार घडून आदिवासी मुलींचे जीवन उध्वस्त होणे, याबाबत सर्व सामान्यत असंतोष निर्माण होणे" या सूचनेला न्याय देण्याच्या दृष्टीने एक तासाची चर्चा दोन चार दिवसाच्या अवधीमध्ये निश्तिचपणे घेतली जाईल.

श्री. रामनाथ मोते : धन्यवाद सभापती महोदय.

सभापती : आज सकाळी 9.52 मिनिटांनी सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोदजी तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री. चंद्रकात पाटील, श्री. केशवराव मानकर, श्री. सय्यद पाशा पटेल, श्री. परशुराम उपरकर, डॉ. रणजित पाटील, श्री. राधाकिशन बाजोरिया वि.प.स. यांनी "जिल्हा केंद्रीय सहकारी बँकाना बँकींगचा परवाना अत्यावश्यक करण्याचे आदेश माननीय सर्वोच्च न्यायालयामार्फत देण्यात येणे व या आदेशान्वये आरबीआयने ज्या बँकाचे नेट वर्थ किमान 1 लाख रुपये असेल अशा बँकानाच बँकींगचा परवाना देण्यात येण्याबाबत कलम 11 लागू करणे, नागपूर, वर्धा, बुलढाणा उस्मानाबाद, जालना,आणि धुळे-नंदूरबार या सहा जिल्हयात केंद्रीय सहकारी बँकानी या कलमाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

पालन न केल्यामुळे या बँकाना आरबीआयने कलम 35 ए लागू केल्यानुसार नवीन ठेवी स्वीकारता न येणे, बँकामधील आपल्या ठेवी लाखो ठेवीदारांकडून काढून घेण्यात येणे, उपरोक्त सहा जिल्हा केंद्रीय बँकाच्या संचालक मंडळाच्या चुकीच्या कर्ज वाटपामुळे व हलगर्जीपणामुळे बँका अडचणीत आल्याने बँकामार्फत शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप न होणे, सहा बँकामार्फत दरवर्षी सुमारे 4561 कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप होत असणे सदरहू वाटप न झाल्याने सुमारे 5.50 लाख शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होणे, राज्यातील पावसाचे लहरीपण पाहता शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट असतांना अशा परिस्थितीत कर्जाअभावी शेतकऱ्याची होणारी कोंडी सोडविण्यासाठी नाबार्डला रि-फायनान्सींग बाबत हमी देऊन शेतकऱ्याला लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याची गरज व जबाबदार संचालक मंडळावर कारवाई करण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी दिलेली आहे. या प्रस्तावाच्या सूचनेबाबत सन्माननीय सदस्यांना काही बोलावयाचे आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सभागृहात शिवसेनेचे सन्माननीय सदस्य उपस्थित नसण्याचे कारण काय आहे ?

श्री.विनोद तावडे : मी माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना सांगू इच्छितो की, श्री.उद्धवजी ठाकरे यांना काही तरी त्रास झाल्यामुळे लिलावती रूग्णालयामध्ये ॲडमिट केले आहे त्यामुळे शिवसेनेचे सन्माननीय सदस्य तेथे गेले आहेत. सगळ्याच गोष्टीमध्ये राजकारण करायचे नसते. सुरूवातीला थोडी माहिती घ्यायची असते.

सभापती महोदय, परवा दुष्काळाच्या विषयावर झालेल्या चर्चेच्या वेळी मी हा विषय आग्रहाने मांडला होता. त्यावेळी माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले की, बाकीच्या बँका कृषी कर्ज मोठ्या प्रमाणावर देत आहेत. सदर वस्तुस्थिती आम्ही शनिवार व रविवार या दिवशी दुष्काळी भागामध्ये जाऊन पाहिली. आजही तेथे अतिशय भयावह अशी स्थिती आहे. 7 जिल्ह्यातील 6 बँकांमधील जो शेतकरी आहे त्यांच्यासाठी शासनाने काही तरी तातडीने करणे गरजेचे आहे, असा नियम 289 च्या सूचनेमध्ये विषय दिलेला आहे. नवीन कर्ज मिळावे म्हणून शेतकऱ्यांनी जुने कर्ज फेडण्यासाठी आपले सर्व सोने-नाणे गहाण टाकले आहे. आज शेतकरी पाऊस नसल्यामुळे अक्षरक्ष: हवालदिल झाला आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, यासंबंधी सभागृहात चर्चा करून अधिवेशन संपण्याच्या आधी शासने शेतकऱ्यांना ठोस मदत जाहीर करावी.

सभापती : सदर सूचना मी नाकारीत आहे. तथापि, सूचनेतील विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे मी उद्याच्या कामकाजामध्ये सदर विषयावर एक तासाची चर्चा घेण्याचे ठरविले आहे.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :औचित्याचे मुद्दे

सभापती : आज माझ्याकडे तीन औचित्याचे मुद्दे आलेले आहेत. ते मांडण्यास मी अनुमती देत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गेल्या महिन्यात मंत्रालयाला लागलेल्या भीषण आगी संदर्भात नजिकच्या पोलीस ठाण्यामध्ये सदोष मनुष्यवधाबाबतच्या गुन्ह्यासाठी फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे. ज्या संबंधित व्यक्तींकरिता ही फिर्याद दाखल केली गेली त्यासाठी त्यांच्या वरिष्ठ पातळीवरून पूर्वपरवानगी घेणे कायद्याने (CRPL च्या 197 कलमान्वये) बंधनकारक असतानाही केवळ सर्वसामान्य नागरिकांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण करून काही राजकीय स्वार्थासाठी अशी बेजबाबदार भूमिका घेणे सर्वस्वी अयोग्य आहे. वास्तविक या सर्व घटनेची शासनाच्या विविध पातळ्यांवर चौकशी चालू असून त्याचा अंतरिम अहवाल प्राप्त झाल्याचे विधिमंडळात स्पष्ट करण्यात आले आहे. अशा अपप्रवृत्तींना पायबंद घालण्यासाठी आता विधिमंडळाने पुढाकार घेऊन संबंधितांना योग्य ती समज देण्यात यावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा औचित्याचा मुद्दा कसा काय होऊ शकतो ?

सभापती : हा अत्यंत महत्त्वाचा असा औचित्याचा मुद्दा आहे. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला विषय औचित्याच्या मुद्याद्वारे माझ्याकडे सादर करतात. दर शुक्रवारी आपण औचित्याचे मुद्दे घेतो ही वस्तुस्थिती आहे. पण काही वेळा जे खरोखरच अत्यंत महत्त्वाचे विषय असतात ते त्या दिवसा व्यतिरिक्त अन्य दिवशी देखील उपस्थित करण्यास मी अनुमती देतो. सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा दिल्यानंतर त्याला अकारण आव्हान देण्याचे काम मी कधीच करीत नाही. त्यामुळेच सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी दिलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत देखील मी तीच भूमिका घेतली आहे. काही वेळा माननीय विरोधी पक्ष नेते किंवा अन्य सन्माननीय सदस्य देखील औचित्याचे मुद्दे देत असतात. त्यांच्या औचित्याचे मुद्यांकडे देखील मी त्याच पद्धतीने पाहतो. त्यामुळेच मी त्याच पद्धतीने ह्या औचित्याच्या मुद्याकडे पाहिले आहे. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य आहे. आज आपला औचित्याच्या मुद्यांचा दिवस नाही. जर काही विशेष बाब असेल तर औचित्याचा मुद्दा घेण्यास कोणतीही अडचण नसावी. सन्माननीय सदस्यांना समज द्यावी असा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला आहे. म्हणजे येथे आणीबाणी आणण्याचे दिवस सुरू केले आहेत, असे म्हणावे लागेल. सन्माननीय सदस्यांना विचार पटले नाही हे कारण असू शकते. ते सन्माननीय सदस्य आपल्या सभागृहाचे असते तर थोडे अजून रिलेव्हंट झाले असते. खालच्या सभागृहातील विषय खाली मांडता आला असता. एखाद्या सन्माननीय सदस्यांना वाटले की, सरकारने योग्य चौकशी केली नाही म्हणून त्यांनी कायद्याच्या चौकटीत राहून सर्व बाबी पूर्ण केल्या तर त्यास पायबंद घालावा अशी मागणी करणे योग्य नाही. येथे सन्माननीय सदस्यांना पुन्हा आणीबाणी आणायची आहे काय ?

यानंतर श्री.सरफरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

राज्यामध्ये आणीबाणी आणावयाची आहे काय? त्यामुळे माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांसारख्या ज्येष्ठ सदस्यांनी सर्पदंशाने मुले मेली त्या बद्दल औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असता तर मी समजू शकलो असते. माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी या विषयावर तरी औचित्याचा मुद्दा उपस्थित करु नये एवढेच मला सुचवावयाचे आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, औचित्यासारख्या गंभीर मुद्याबाबत सार्वत्रिक चर्चा होणे अनावश्यक आहे. आपण औचित्याच्या मुद्दयाला परवानगी देत असतांना त्याचे गांभीर्य तपासल्यानंतर त्यावर आम्ही भाष्य करणे अयोग्य आहे. औचित्याचा मुद्दा या सभागृहातील कुणीही माननीय सदस्यांनी उपस्थित केला, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जरी उपस्थित केला तरी सभागृहाची परंपरा व सन्मान आपण संभाळला पाहिजे. आम्ही पाच ते सहा औचित्याचे मुद्दे आपणाकडे सादर केले होते परंतु आपणास ते अयोग्य वाटल्यामुळे आपण ते स्वीकारले नाहीत. माननीय सदस्यांनी आपला औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत असतांना कुणाचाही नामोल्लेख केला नाही. विधिमंडळामध्ये जे काही चालले आहे त्या संदर्भात माननीय सदस्य बोलत असतांना जबाबदार माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असे करणे आम्हाला रुचले नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, कोणत्या गोष्टींबाबत कुणी कशाप्रकारचे कॉमेंट्स करावेत या बाबत सभागृहाने जाणणे आवश्यक आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सोमवार असो किंवा शुक्रवार असो एखादा औचित्याचा मुद्दा गंभीर स्वरुपाचा असल्यास तो सभागृहामध्ये मांडला जातो. माननीय विरोधी पक्षनेते हे अत्यंत अभ्यासू आहेत. ते म्हणाले की, ज्यांच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे ते या सभागृहाचे सदस्य आहेत काय? माझे त्याबाबत असे म्हणणे आहे की, होय, ते या सभागृहाचे सदस्य आहेत. काल मी दूरदर्शनवर बातमी पाहिली त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांचे नाव घेण्यात आले. माननीय मुख्यमंत्री हे या सभागृहाचे सदस्य आहेत. दुसरी गोष्ट अशी की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री ही राज्यातील महत्वाची पदे असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंबंधी मोठया प्रमाणात प्रसिध्दी केली जात असेल तर त्या बाबत या सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित करावयाचा नाही तर अन्य कुठे उपस्थित करावा? इतर सर्व गोष्टींपेक्षाही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. माननीय विरोधी पक्षनेते एवढे अभ्यासू असतांना आपणाकडून कशी चूक होऊ शकते?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी माननीय सदस्यांकडून औचित्याचा मुद्दा माझ्याकडे सादर करण्यात येतो त्या क्षणी त्यावर विचार करुन त्याला परवानगी देण्यात येते. यामध्ये औचित्याचा मुद्दा हा विरोधी बाजूकडील माननीय सदस्यांनी किंवा सत्ताधारी बाजूकडील माननीय सदस्यांनी दिला असला तरी मी त्याला परवानगी देत असतो. त्या बाबत अन्य माननीय सदस्यांनी शंका घेण्याचे टाळले पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना ज्या ज्या वेळी वाटेल त्यावेळी त्यांना बोलण्याचा अधिकार आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी या बाबत हरकतीच्या मुद्याव्दारे मांडलेले विचार योग्य पध्दतीचे आहेत. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी सभापतींच्या परवानगीनंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित केल्या नंतर त्यावर चर्चा होऊ नये. त्या दृष्टीने आपण त्याकडे पहावे. त्या बाबत सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी काही भाष्य केले आहे त्यावर मी काही बोलण्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यावरील चर्चा आपण येथेच थांबवू या.

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" सन 1993 मध्ये मानवी विष्ठा वाहतूक व शुष्क शौचालय निर्माण प्रतिबंधक कायद्यानुसार मानवी विष्ठा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मानवाने कोणत्याही प्रकारे वाहून नेण्यास बंदी करण्यात आलेली आहे. या कायद्याची व संविधानातील मूलभूत हक्कांचे पंढरपूर शहरामध्ये व राज्यात सर्वत्र राजरोसपणे उल्लंघन सुरु आहे. मानवी मैला (विष्ठा) वाहतूक विरोधी अभियानाने मागील तीन वर्षात अभ्यास करुन व पुरावे गोळा करुन प्रशासनाकडे या विरोधात अनेक वेळा निवेदने दिलेली आहेत. परंतु प्रशासनाने अद्याप पर्यन्त काहीच कार्यवाही केली नसल्यामुळे अभियानाने या विरोधात मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहीत याचिका दाखल केली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मात्र अद्यापपर्यंत शासन उच्च न्यायालयापुढे हजर न रहाता वेळकाढूपणा करीत आहे. या याचिकेची पुढील सुनावणी दिनांक 26 जुलै 2012 रोजी होणार आहे. त्या अनुषंगाने आषाढी वारीमध्ये वाल्मिकी समाजाच्या कर्मचाऱ्यांनी या प्रथे विरोधात काम बंद करुन बहिष्कार टाकल्यामुळे पुन्हा एकदा हा मुद्दा ऐरणीवर आला.

सभापती महोदय, सफाई कामगारांची राहती घरे ही त्यांच्या नावावर करावीत तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या अंतर्गत घरे उपलब्ध करुन देण्यात यावीत. मानवी मैला विष्ठा वाहतूक अभियानाने हा संघर्ष पंढरपूर शहरामध्ये सुरु केला असला तरी सुध्दा हा प्रश्न राज्यातील अनेक भागामध्ये अजूनही गंभीर आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सफाई कामगारांच्या या समस्येवर तोडगा काढून 1993 च्या कायद्याची अंमलबजावणी करावी व त्यांच्या इतर ज्या प्रलंबित मागण्या आहेत त्या मंजूर कराव्यात आणि शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय जाहीर करावा या मागणीसाठी आज राज्यातील हजारो सफाई कामगारांनी आझाद मैदानावर धरणे धरलेले आहे.

सभापती महोदय, सध्या दूरदर्शनवर "सत्यमेव जयते" ही मालिका सुरु आहे. त्यामध्ये दोन दिवसापूर्वी चित्रपट अभिनेता श्री.अमिर खान यांनी सुध्दा त्यावेळी हा विषय मांडला होता आणि या विषयाच्या अनुषंगाने ते स्वत: दुपारी 2.00 वाजता माननीय पंतप्रधानांची भेट घेणार आहेत. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे.याबाबतीत देशामध्ये कायदा झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी त्वरित झाली पाहिजे. याठिकाणी संबंधित विभागाचे माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे साहेब देखील उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतीत लवकरात लवकर अंमलबजावणी करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, डोक्यावर मैला वाहून नेणे हा कायदेशीर गुन्हा आहे. त्याचे आपण समर्थन करीत नाही. परंतु जेथे-जेथे असे प्रकार घडले असतील त्याबाबतीत चौकशी करुन कारवाई केली पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्यांनी घराच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपल्या राज्यामध्ये ज्याच्याकडे बी.पी.एल.चे कार्ड आहे पण त्यांच्याकडे पक्के घर नाही. असे कितीही लाभार्थी असले तरी सर्वांसाठी आपण घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच त्यासाठी आपण खूप मोठ्या प्रमाणात फंड देखील उपलब्ध करीत आहोत तसेच त्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांचे जे प्रतिनिधी मंडळ आहे त्यांच्या बरोबर जर सन्माननीय सदस्य आले तर मी त्यांच्यासोबतही चर्चा करीन.

. . . .क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

सभापती : माझ्या समोर सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांचा तिसरा औचित्याचा मुद्दा आहे. यामध्ये त्यांनी अंतराळवीर श्रीमती सुनिता विल्यम व त्यांचे दोन सहकारी यांचे अभिनंदन करावे असे सुचविले आहे. मला असे वाटते की, मी या विषयाच्या बाबतीत कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा केल्यानंतर सदरहू औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी निश्चितपणे परवानगी देईन.

तसेच सन्माननीय सदस्यांचा औचित्याचा मुद्दा किंवा इतर कोणताही मुद्दा असेल तर सभागृह सुरु होण्यापूर्वी माझ्या कार्यालयामध्ये येऊन, माझ्या बरोबर चर्चा केल्यानंतर सादर केला तरच मी त्याबाबतीत विचार करीन.

. . . .क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील मुरुड शहरातील सुभाषचंद्र बोस (शेगवाडा) येथे नगरपरिषदेव्दारे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या नळाव्दारे पाण्यात किडे आढळल्याने पाणी टाकी असुरक्षित असून कोणताही गैरप्रकार, विषबाधा होण्याची शक्यता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 11-7-2012रोजी धाराशीवमध्ये महाविद्यालयातील लखन आढाव यांनी नवव्या इयत्तेत शिकणाऱ्या मुलीची छेडछाड केल्यामुळे त्या मुलीने स्वत:ला पेटवून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "ता.खेड, जि.रत्नागिरी येथील नातुवाडी उजवा कालवा खेड ते आंबये पूर्णपणे नादुरुस्त असून त्यासाठी 2 कोटी 35 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "राज्यातील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींची सुरक्षा तपासणीचे काम अग्निशमन दलाकडे सोपविले असल्याचा गैरसमज नागरिकांमध्ये होत असल्यामुळे इमारती सुरक्षा तपासणीचे काम लेखापरिक्षकां-कडे सोपविण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी./ मु.शी. : राज्यातील अनुदानित संस्थांचे आठ वर्षापासून बंद असलेले वेतनेतर अनुदान याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील अनुदानित संस्थांचे जे वेतनेतर अनुदान गेल्या आठ वर्षापासून बंद करण्यात आले आहे त्या अनुदानासंबंधीचा हा विषय आहे. खरे म्हणजे चार वर्षापूर्वी या संदर्भात एक समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवालही आलेला आहे. आता शासनाने तत्वत: मान्य केले आहे की, त्यांना वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भात नक्की विचार करण्यात येईल. संस्था चालकांच्या महामंडळाने 2 जुलैपासून आंदोलन सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. मध्यंतरी शासनाबरोबर चर्चा झाली आणि ते वेतनेतर अनुदान लवकर लवकर सुरु करु असे शासनाने सांगितल्यामुळे त्यांनी आंदोलन रद्द केले. आता 16 तारखेपासून त्यांनी पुन्हा आंदोलन सुरु करण्याचा निर्णय घेतला होता. पण ही नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर काल मी त्यांना विनंती केली की, सभागृहामध्ये मी या संदर्भात चर्चा करतो, शासनाला विनंती करतो, आपण राज्यातील या हजारो शाळा बंद करु नका. श्री. विजय नवल पाटील यांनी मान्य केले की, ठीक आहे, चर्चा होऊ द्या, शासनाचे काय धोरण आहे ते समजल्यानंतर नक्की विचार करु. त्यांनी आजपासून सुरु होणार आंदोलन स्थगित केलेले आहे.

सभापती महोदय, माझी या निमित्ताने विनंती आहे की, त्या समितीच्या अहवालाप्रमाणे शासनाने गेल्या चार वर्षापासून वेतनेतर अनुदान देण्याचे मान्य केलेले आहे ते वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भामध्ये शासनाने तातडीने म्हणजे किमान हे अधिवेशन संपण्याच्या पूर्वी सकारात्मक निर्णय घेऊन ते जाहीर करावे म्हणजे राज्यातील या हजारो शाळा बंद करण्याचे महामंडळाचे जे आंदोलन आहे ते होणार नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. त्यांनी जो इशारा दिलेला आहे ते आंदोलन होणार नाही. या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासित करावे अशी विनंती करतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत महामंडळासोबत 21 जूनला राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री, आदरणीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर जी बैठक झाली त्यामध्ये सांगितल्याप्रमाणे या बाबतीत शासनाचा सकारात्मक विचार आहे आणि त्यावर निर्णय घेण्याची प्रक्रिया चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आम्ही वारंवार या सभागृहामध्ये उपस्थित करतो. उद्या सुध्दा या संदर्भातील माझा प्रश्न अनुक्रमांक 3 वर आहे. 2004 पासून हे वेतनेतर अनुदान शाळांना दिले जात नाही. आपण सुध्दा ही गोष्ट जाणता आणि आपण वारंवार या संदर्भात शासनाला निदेश दिलेले आहेत. ज्या दिवशी मंत्रालयाला आग लागली त्याच्या एक तास अगोदर या महामंडळाच्या प्रतिनिधींबरोबर जी बैठक झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय शालेय शिक्षण मंत्री, सर्व उपस्थित होते. त्यामध्ये मंत्रिमंडळाच्या उप समितीने शासनाला जे सुचविले होते त्या अनुषंगाने 4 टक्के वेतनेतर अनुदान आणि 1 टक्का इमारत भाडे अशा पध्दतीने 5 टक्के अनुदान देण्याचा जो प्रस्ताव आहे त्या बाबतीत लवकर निर्णय घेण्यात येईल असे ठोस आश्वासन सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आणि सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी दिलेले आहे. आम्ही सुध्दा महामंडळाला विनंती केली होती की, मंत्रालयाला आग लागलेली आहे, हे संकट आलेले आहे त्यामुळे आपण हा बंद थोडा पुढे घेऊ. कारण आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून काम करतो. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना या शाळा कशा प्रकारे चालू असतात, त्यांना वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे त्यांची परिस्थिती कशी झाली आहे ते माहीत आहे. किमान हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्यांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे. तो निर्णय घेऊन त्याबाबतचा जी.आर.इश्यू केला जाईल काय ? मंत्रालयाला आग लागल्यामुळे शासनासमोर अडचण निर्माण झाल्याने शाळा बंद आंदोलन पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे आम्ही सुध्दा शिक्षक महासंघाला विनंती केली होती. त्यासंबंधी श्री.विजय नवल पाटील यांनी सुध्दा संप पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. या शाळा कायम स्वरुपी बंद करावयाच्या असतील तर तसाही ते निर्णय घेऊ शकतील. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. आम्ही त्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला प्रश्न विचारावयाचा नाही असे मी समजावयाचे का ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही रविवारी शाळा चालू ठेवू, परंतु त्या शाळा बंद आंदोलन होऊ नये अशी आमची भूमिका आहे. त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय घेतला जाईल का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर यासंबंधीचा प्रस्ताव आणण्याची प्रक्रिया चालू आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. : बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अवसायनात निधाल्यामुळे शिक्षकांचे थकीत राहिलेले वेतन याबाबत सर्वश्री वसंतराव खोटरे, विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील 6-7 हजार माध्यमिक शिक्षकांच्या वेतनाचा हा प्रश्न आहे. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँक अवसायनात निघाल्यामुळे तेथील शिक्षकांची पगार 2-3 महिन्यांपासून प्रलंबित आहेत. एक महिन्याचा पगार दिला तोही पूर्ण दिलेला नाही. जे शिक्षक निवृत्त झाले आहेत त्यांना अद्याप ग्रॅज्यूईटीची आणि भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे त्या शिक्षकांची आर्थिक कोंडी झालेली आहे. शिक्षक संघटनेने शासनाला पर्याय शोधण्याची विनंती केलेली आहे. जुलै महिन्याचे पैसे शिक्षण खात्याचे अधीक्षक यांच्याकडे जमा झालेले आहेत. ही रक्कम 20 कोटी रुपये इतकी आहे. हे पैसे एसबीआय, बुलढाणा या शाखेतून वितरित केले जाणार आहेत. ही प्रक्रिया किती दिवसात पूर्ण होणार आहे आणि शिक्षकांना किती दिवसात वेतन मिळणार आहे ?

प्रा.फौजिया खान : बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँक अडचणीत आल्यामुळे मे पर्यंतचे पगार सर्व शिक्षकांच्या अकाऊंटमध्ये जमा झाले होते. पण बँकेने पगाराची सर्व रक्कम वितरित केली नाही. जून महिन्याच्या पगाराचा चेकही अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी यांच्याकडे दिलेला आहे. त्यांनी एस.बी.आय.मार्फत त्यांचा पगार होण्यासाठी प्रक्रिया सुरु केलेली आहे. तशी सहमती सुध्दा एस.बी.आय.ने दिलेली आहे. त्यासंबंधीचे आदेश शासनाकडून लवकरच निघणार आहेत. एस.बी.आय.मार्फत शिक्षकांचा पगार होणार आहे.

शालेय शिक्षण विभागामार्फत एक चांगला निर्णय घेण्यात आलेला आहे. ज्या राष्ट्रीयकृत बँकांमध्ये कोअर बँकिंग सिस्टिम उपलब्ध आहे, जिल्ह्यातील अशा बँकांची निवड करुन इ.सी.एस.द्वारे थेट शिक्षकांच्या अकाऊंटमध्ये पगार जमा करण्याचा येणार आहे. त्याची प्रक्रिया चालू आहे. त्याप्रमाणे संपूर्ण राज्यात शिक्षकांचा या पध्दतीने पगार जमा करण्याची पध्दत सुरु होणार आहे. हा प्रश्न कायमचा सुटण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न सुरु आहेत.

श्री.विक्रम काळे : सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी सांगितल्या प्रमाणे राज्यातील उस्मानाबाद, जालना आणि बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँका अडचणीत आलेल्या आहेत. त्या बँकांसंबंधी मंत्री महोदयांकडे निवेदने आलेली आहेत. गेल्या 3 महिन्यांपासून शिक्षकांना पगार मिळालेला नाही. आता शिक्षकांच्या पाल्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरु आहे. काही मुलांना

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.विक्रम काळे....

इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये, काही मुलांना वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश मिळालेला आहे. शिक्षकांच्या खात्यावर पैसे असतानाही बँक पैसे देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. या तिन्ही जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन एस.बी.आय. किंवा अन्य राष्ट्रीय कृत बँकांमार्फत तातडीने देण्यासाठी विभागामार्फत एक आठवड्यात आदेश निघतील काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

प्रा. फौजिया खान : संपूर्ण राज्यासाठी असे आदेश निघालेले आहेत. जेथे कोअर बँकिंग पध्दतीची सुविधा आहे अशा प्रत्येक जिल्हयामध्ये इसीएसद्वारे शिक्षकांचे पगार होणार आहेत. ज्या ठिकाणी बँका अडचणीत आलेल्या आहेत त्याबाबतीत शासनामार्फत पाठपुरावा चालू आहे. याबाबतीत सहकार विभागाच्या सचिवांना तसेच एमएससी बँकेच्या प्रशासका पत्र लिहिलेले आहे.

श्री. वसंतराव खोटरे : बुलढाणा जिल्ह्यातील शिक्षकांचे पगार तीन महिन्यापासून मिळालेले नाहीत. शिक्षकांचे चेक अधीक्षकांकडे जमा आहेत. सदरहू चेक अधीक्षकांना स्टेट बँकेमध्ये जमा करण्याच्या सूचना देण्यात येतील काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकलेले नाही असे दिसते. शिक्षकांचे पगार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून देण्यासंबंधीची प्रक्रिया सुरु आहे. या बाबतीत शासनाकडून लवकरच आदेश निघतील. उर्वरित दोन महिन्यांच्या पगाराच्या बाबतीत बँकेकडे पाठपुरावा सुरु आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी : प्रसूती काळात आरोग्य सुविधा न मिळाल्यामुळे माता व अर्भक यांचा मृत्यू होण्याच्या घडणा-या घटना याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, श्रीमती शोभा फडणवीस व श्री.रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या अहवालामध्ये सर्व त्रुटी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. जननी सुरक्षा योजना आणि जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम यामुळे माता व अर्भक मृत्यू दर घटला असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांनी त्यांच्या अहवालामध्ये ज्या कमतरता निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्या दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत ?

प्रा. फौजिया खान : अहवालामध्ये ज्या ठिकाणी अशा कमतरता नमूद केलेल्या आहेत त्याची प्रत सन्माननीय सदस्यांनी मला दिली तर त्यावर भाष्य करता येईल. 1999 पासून माता मृत्यूदर आणि अर्भक मृत्यू दर यामध्ये सातत्याने घट होत आहे. आमच्याकडे असलेली आकडेवारी ही अधिकृत असून ती कॅगने आणि डब्ल्यूएचओने देखील मान्य केलेली आहे. 2005मध्ये अर्भक मृत्यूचा दर प्रति 1 लक्ष 36 इतका होता. सन 2010मध्ये हा दर 28 इतका खाली आलेला आहे. माता मृत्यू दरामध्ये 2015 अखेर 62 प्रति 1 लक्ष जिवंत जन्म एवढ्यापर्यन्त घट साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. तसेच अर्भक मृत्यू दरामध्ये 2012 अखेर 13 इतकी घट साध्य करण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने ठेवलेले आहे.

श्री. विनोद तावडे : शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना करुन हा मृत्यू दर कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे हे सांगितले पाहिजे. तसेच आरोग्य संस्थांच्या बाहेर होणा-या प्रसूत्यांमध्येही माता आणि अर्भक मृत्यू दराचे प्रमाण मोठे आहे. त्याबाबतीत शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / परिपक्वेसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, इन्स्टिटयुशनल डिलिव्हरी वाढविण्यासाठी जननी सुरक्षा योजना आणि जननी शिशु सुरक्षा योजना शासनामार्फत राबविण्यात येतात. दारिद्रय रेषेखालील व एस.सी., एस.टी. प्रवर्गातील महिलांची इन्स्टिटयुशनल डिलिव्हरी झाली तर ग्रामीण भागांमध्ये 700 रुपये तर नागरी भागामध्ये 600 रुपये देण्यात येतात. सिझरीन झाले तर 1500 रुपये देण्यात येतात. घरामध्ये डिलिव्हरी झाली तर 500 रुपये देण्यात येतात.

सभापती महोदय, आपण जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम सुरु केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत 102 नंबरचा टोल फ्री नंबर दिलेला आहे. या नंबरवर फोन केल्यास महिलांच्या घरी वाहन पाठवून त्यांना रुग्णालयात आणण्याची सोय करण्यात येते. तीस दिवस त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येतात. तसेच त्यांच्या आहाराची देखील व्यवस्था करण्यात येते. जर अर्भक आजारी असेल तर त्याच्यावर देखील उपचार करण्यात येतात आणि दोघांची प्रकृती सुधारल्यानंतर त्यांना मोफत घरी पोहोचविण्यात येते. या सुविधेमुळे अतिशय चांगले परिणाम मिळत आहेत. मागील पाच-सहा वर्षात इन्स्टिटयुशनल डिलिव्हरीचे प्रमाण खूप वाढले आहे. 90 टक्के जिल्ह्यात इन्स्टिटयुशनल डिलिव्हरीचे प्रमाण 95 टक्क्यांपर्यंत गेलेले आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ही योजना कागदावर अतिशय सुंदर आहे. आज 50 टक्के गावांमध्ये रस्ते नसल्यामुळे दुर्गम भागातील गावात ॲम्ब्युलन्स जाऊ शकत नाही. दुर्गम भागातील आदिवासी महिलांना डिलिव्हरीसाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्याची व्यवस्था होत नसल्यामुळे त्या भागातील बाल मृत्यूचे प्रमाण कमी कसे होईल ? दुसरे म्हणजे रुग्णालयांना डिझेलसाठी कमी निधी उपलब्ध होतो. त्यामुळे गावापर्यंत गाड्या जाऊ शकत नाहीत. सिझरीनसाठी डॉक्टर उपलब्ध असले तरी ॲनेस्थेशिअन डॉक्टर उपलब्ध नाहीत. ते डेप्युटेशनवर असतात. ॲनेस्थेशिअन डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे सिझरीन होत नाही. तेव्हा या सर्व व्यवस्था शासन करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी या ठिकाणी आकडेवारी देते. जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्ग राज्यामध्ये 7 ऑक्टोबर 2011 ते 31 मार्च 2012 पर्यंत एकूण 1 लाख 86 हजार 665 महिलांची प्रसूती करण्यात आली. त्यापैकी 19 हजार 663 अर्भकांवर उपचार करण्यात आले. तर 38 हजार 926 गरोदर महिलांना घरापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली. 29 हजार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

022 महिलांना एका संस्थेमध्ये उपचार झाले नाहीत म्हणून दुसऱ्या संस्थ्ेमध्ये उपचारासाठी पोहोचविण्यात आले आहेत. तर 68 हजार 393 महिला आणि अर्भकांना घरापर्यंत पोहोचविण्यात आले. दिनांक 1 एप्रिल ते 30 जून 2012 पर्यंत 2 लाख 15 हजार 582 महिलांची प्रसूती झालेली आहे. जवळपास 27 हजार 524 अर्भकांवर उपचार केलेले आहेत. 21 हजार 069 महिलांना घरापासून रुग्णालयामध्ये पोहोचविण्याची व्यवस्था केलेली आहे. 22 हजार 173 महिलांना रेफरलसाठी पाठविलेले आहे 58 हजार 589 महिलांना रुग्णालयातून घरापर्यंत पोहोचविण्याचे काम केलेले आहे. 5628 बालकांना रेफरलसाठी पाठविलेले आहे. 1905 आजारी बालकांना घरापर्यंत पोहोचविण्यात आलेले आहे. 10 हजार 974 बालकांना संस्थेमार्फत घरी पाठविण्यात आलेले आहे. 2 लाख 62 हजार 014 प्रसृती झालेल्या महिलांना मोफत आहार दिलेला आहे. या आकडेवारीवरुन दिसून येते की, ही योजना अतिशय चांगल्या पध्दतीने सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी डिझेलसाठी निधी उपलब्ध होत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्या बाबत सांगू इच्छिते की, डिझेलसाठी निधी कमी पडणार नाही. कारण नगरपालिका आणि महानगरपालिकांना महिला व बाल कल्याण निधीतून डिझेलसाठी 5 टक्के निधी खर्च करण्याची परवानगी दिलेली आहे. तसेच डिझेलसाठी निधी कमी पडला अशा कोणत्याही तक्रारी आमच्याकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 5 प्रथम घेण्यासंबंधी माननीय आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी विनंती केली होती. परंतु लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा लक्षवेधी सूचना क्रमांक 5 प्रथम न घेता कामकाजपत्रिकेवरील पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येत आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चे प्रश्नकर्ते सभागृहात उपस्थित झाल्यास ती लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईत पावसाळयात कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे पसरलेली रोगराई.

मु. शी. : मुंबईत पावसाळयात कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे पसरलेली रोगराई यासंबंधी श्रीमती अलका देसाई ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" मुंबई शहरात ठिकठिकाणी मोठया प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे प्रत्येक पावसाळयात सर्वत्र रोगराई पसरत असल्याचे प्रकार घडत असूनही त्याकडे महापालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, पावसाळयापूर्वी नाले सफाई करण्यात येऊन नाल्यातील कचऱ्याचे ढीग मात्र नाल्याच्या काठावरच टाकले जाणे, त्यात शहरातील कचऱ्याचा अधिक भार पडत असणे, यामुळे शहरात सर्वत्र दुर्गंधी पसरुन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत संबंधितांकडे वारंवार तक्रार करण्यात येऊनही पालिका मात्र मचऱ्याचे ढीग उचलण्यास टाळाटाळ व दुर्लक्ष करीत असणे, यामुळे शहरातील नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई शहरात कचऱ्याचे मोठया प्रमाणात ढीग साचले असल्यामुळे मुंबईला रोगराईने पूर्णपणे ग्रासले आहे या अनुषंगाने मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेला विभागाकडून जे उत्तर दिले गेले आहे ते वाचून मला खूप गंमत वाटली. कचरा उचलणाऱ्या कंत्राटदारांची मुदत दिनांक 31.4.2012 रोजी संपली. सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी अशी त्या कंत्राटरांनी विनंती केली होती. मुदतवाढ देण्यास एप्रिल आणि मे असा दोन महिन्यांचा कालावधी लागला. एप्रिल आणि मे महिन्यामध्ये मुंबई शहरातील ड्रेनेज साफ केले जातात. मोठ मोठे नाले साफ केले जातात. ड्रेनेज आणि नाले साफ केल्यानंतर त्यातील संपूर्ण कचरा हा काठावर ठेवला जातो. त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली नाही तर शहरामध्ये रोगराईला आमंत्रण मिळते अशा प्रकारचे चित्र असते. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे विधान परिषदेवर पुन्हा निवडून आल्याबद्दल ते अतिशय आंनदात असल्यामुळे व आमदारांमध्ये ते सर्वात श्रीमंत आहेत अशी बातमी आल्यामुळे कदाचित ते माझ्या बोलण्यात अडथळा आणत असावेत असे मला वाटते.

महोदय,या लक्षवेधी सूचनेला लेखी उत्तर दिलेले आहे, ते उत्तर महानगरपालिकेने दिले आहे की, कोणी तरी एका जागी बसून तयार केले आहे अशी शंका मला लेखी उत्तरावरुन येत आहे. मुंबई महानगरपालिकेकडून एप्रिल आणि मे महिन्यामध्ये ड्रेनेज आणि नाल्याच्या काठी टाकण्यात आलेले कचऱ्याचे ढिगारे उचलले गेले नाही. जून महिन्यात पाऊस पडण्यास सुरुवात झाली. कचरा उचलण्याचे टेंडर काढण्यासाठी दोन महिन्यांचा अवधी का लागला, टेंडर उशिरा काढण्यामागे महापालिकेला कोणाचे भले करावयाचे होते काय ही गोष्ट मला कळालेली नाही. मला ते कळून घेण्याची इच्छा देखील नाही. मुंबई शहराची कचऱ्यामुळे मोठी अनास्था झालेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात कोठेही कचरा नाही असे म्हटले आहे. आयनॉक्स, कोरबा मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुलुंड (पश्चिम) रेल्वे स्टेशन, दातार कॉलनी, भांडूप गाव, भांडूप (पूर्व)) (पश्चिम), या भागात महानगरपालिकेने आपल्या अधिकाऱ्यांना पाठवावे. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये आहेत तेथे व....

यानंतर श्री. खर्चे.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ..... लक्षवेधी सूचना क्र. 1.....

त्याचबरोबर मुंबई महानगर पालिकेच्या रुग्णालयात जाऊन पाहणी करावी. कचरा उचलल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात येते मग रस्त्यांवर जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसून येतात तो कचरा उत्तर तयार करणाऱ्यांनी आणून टाकला आहे काय ?

उप सभापती : आपण एकंदरित जे प्रश्न विचारले त्यांचे स्वरुप पाहता माननीय राज्य मंत्र्यांना भेटून आपण हे सर्व प्रश्न सांगावेत.

श्रीमती अलका देसाई : महोदय, वारंवार तक्रारी करुनही महापालिकेकडून त्यांना उत्तरे दिली जात नाही. तसेच रस्त्यांवरील कचराही उचलला जात नाही. मग अशी असत्य उत्तरे का दिली जातात हेच मला कळत नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, कोठेही आजाराची साथ नसताना महानगर पालिकेच्या रुग्णालयात गेल्यानंतर रुग्णांची गर्दी दिसून येते. याचा अर्थ शहरातील दुर्गंधीमुळे लोक आजारी पडतात.....अडथळा.....हा प्रश्न येऊ नये अशाच प्रकारची साजिश काही लोकांनी केल्याचे दिसते आणि ही शंका खरी असेल तर मुंबईवर कोणाचेही लक्ष नाही असे समजून "करुन दाखविले" या वाक्यावर फिरत राहणाऱ्यांना हा खरा प्रश्न आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती सांगितली त्यानुसार जर कोणत्या भागात कचरा उचलला असल्याचे सांगून कचऱ्याचे ढीग तसेच आढळून आले आणि जाणीवपूर्वक असे काम केले असेल तर संबंधितांवर त्याची जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल. तसेच शासनाकडून दिलेले उत्तर असत्य असल्याचे सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर त्यांनी इतर संसदीय आयुधांचा वापर करायला हरकत नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, मुंबईच्या नागरी जीवनाशी निगडीत ही लक्षवेधी सूचना असून दुर्दैवाने गांभीर्याने त्याचे उत्तर दिलेले दिसत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे ज्याप्रमाणे अधिकारी छापून देतात तसेच हे उत्तर असल्याचे जाणवते. मुंबईतील कचऱ्याची परिस्थिती सभागृहात सांगण्यात आली ती वस्तुस्थितीच आहे. जास्त लांब जाण्याची गरज नाही तर अपोलो बंदराच्या ठिकाणी गेलो तरी असे कचऱ्याचे ढीग आपल्याला पहायला मिळतील याची मी खात्री देतो. अशाच प्रकारे मुंबईच्या सर्व भागात विशेष करुन उप नगरांमध्ये गेलो तर भयानक परिस्थिती आहे. नाले सफाई केल्यानंतर जो गाळ काढला जातो तो त्याच्याच काठावर ठेवला

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ..... लक्षवेधी क्रमांक 1 .....

जातो. यासंदर्भात मंत्री महोदयांकडून उत्तर पाहिजे की, गेल्या पाच वर्षात कचरा उचलण्यासाठी जाहीर केलेल्या निविदा आणि या वर्षीच्या निविदा यामध्ये खूप तफावत आहे, याचे कारण काय आणि कोणत्या आधाराने हे टेंडरिंग करण्यात आले आहे ? या सर्व कचरा विल्हेवाटीसंबंधी सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर ही चौकशी शासन सीआयडी मार्फत करणार आहे काय, जेणेकरुन मुंबईच्या नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा जो प्रयत्न केला जातो व भ्रष्टाचार होतो त्याला पायबंद बसण्यास मदत होईल. यादृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबईतील कचरा उचलण्यासाठी गेल्या पाच वर्षापूर्वी, पाच वर्षाकरिता आऊट सोर्सींग करण्यात आले होते. मुंबईतील 100 टक्के कचरा उचलण्याचे काम ठेकेदारांना देण्यात आलेले नसून मुंबईतील 25 ते 27 टक्के कचरा मुंबई महानगर पालिका स्वत:ची वाहने वापरुन, स्वत:च्या कर्मचाऱ्यांमार्फत उचलत असते. यावर्षी 971.99 कोटी रुपयांना कचरा उचलण्याचे टेंडर देण्यात आलेले आहे. गेल्या पाच वर्षापूर्वी हेच टेंडर 421.30 कोटी रुपयांना गेले होते.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी आकडेवारी दिलेली आहे ती आकडेवारी आमच्या समोर सुध्दा आहे. आकडेवारी आक्षेपार्ह असल्यामुळेच आम्ही ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. कंत्राटदारांच्या 839 व महानगर पालिकेच्या 337 वाहनांमार्फत मुंबईतील कचरा उचलला जात असतो. असे असतांनाही मुंबईतील संपूर्ण कचरा उचलला जात नाही. मुंबई महानगरपालिकेने कचरा उचलण्याचे जे टेंडर दिलेले आहे त्यामध्ये संशय निर्माण होणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत. या सदनाचा सदस्य म्हणूनच नाही तर मुंबईकर म्हणून कचरा उचलण्याचे जे टेंडर मुंबई महानगरपालिकेने दिलेले आहे त्याबाबत माझ्या मनात संशय आहे. माझ्याच मनात संशय आहे असे नाही तर मुंबईतील 1.20 कोटी जनतेच्या मनात यासंदर्भात संशय आहे. त्यामुळे मुंबई महानगर पालिकेच्या कचरा उचलण्याच्या टेंडरींग प्रोसेसची सीआयडी मार्फत चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई महानगर पालिकेतील कचरा उचलण्याचे टेंडरींग ओपन आहे. मागच्या पाच वर्षापूर्वी ज्या लोकांना टेंडर देण्यात आले होते त्यातील काही लोकांना पुन्हा टेंडर देण्यात आलेले आहे काय असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मागील पाच वर्षापूर्वी ज्या लोकांनी टेंडर भरले होते त्यातील काही लोकांना पुन्हा यावर्षी टेंडर देण्यात आलेले आहे. टेंडर कॉल करण्याकरिता मुदत संपून गेल्यानंतरही यासाठी काही कालावधी लागलेला आहे ही देखील वस्तुस्थिती आहे परंतु तरी देखील या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील आमच्या भावना आम्ही व्यक्त करीत आहोत. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय थातूर मातूर उत्तर देत असतील तर ते योग्य नाही. टेंडरच्या संदर्भात संशय किंवा संभ्रम निर्माण झाला त्या त्या वेळेला या सभागृहाने चौकशा करण्याचे आदेश दिलेले आहेत. मुंबईतील 1.20 कोटी जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असतांना सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात सीआयडीची आवश्यकता नाही असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे योग्य नाही. मुंबईचा नागरिक म्हणून आम्ही आमच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यामुळे मुंबईतील कचरा उचलण्याच्या संदर्भातील टेंडरींगची सीआयडी चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहात महापालिकेसंबंधी वारंवार प्रश्न आलेले आहेत. त्यावर आपण चर्चा केली आहे. पण ज्यांची सत्ता महापालिकेत आहे, ते बाहेर स्पष्ट शब्दात सांगतात की, अधिकारी, आयुक्त, उपायुक्त हे सर्वच शासनाचे आहेत. आजचे उत्तर बघितल्यानंतर मी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, या सर्व अधिकाऱ्यांना शासन पाठीशी का घालत आहे ? आपण उत्तरात म्हटले आहे की, मुंबई शहरात निर्माण होणारा कचरा नियमितपणे रोजच्या रोज उचलून त्याची विल्हेवाट लावण्यात येते. मागच्या वर्षी गाळ काढण्यासाठी 97 कोटी रूपये खर्च केले आहेत. यावर्षी 131 कोटी रूपये नालेसफाईवर खर्च केले आहेत. मी फक्त आकडेवारी निदर्शनास आणत आहे. किती रकमेनंतर सीआयडी चौकशी करण्यात येणार आहे हे शासनाने एकदाचे सांगून टाकावे.

दुसरे असे की, येथे नेहमी मिठी नदीसंबंधी बोलले जाते. मिठी नदीचा गाळ काढण्यासाठी एमएमआरडीने 300 कोटी रूपये खर्च केले आहेत. मुंबई महानगरपालिकेने आता पर्यंत 600 कोटी रूपये खर्च केले आहेत. विमानतळ विकासाचे काम करणाऱ्या कंपनीने 150 कोटी रूपये खर्च केले. मिठी नदीच्या संवर्धनासाठी 1650 कोटी रूपये खर्च झाले तरी अद्याप तो कालवाच आहे. तिचे नदीत रूपांतर झाले नाही. या सर्व प्रकाराची आपण सीआयडी चौकशी करणार नसाल तर किती रूपयांचा भ्रष्टाचार झाल्या नंतर आपण सीआयडी चौकशी करणार आहात ?

मुंबई महापालिकेने 7 कंत्राटदारांना काळ्या यादीमध्ये टाकले आहे, असे आपण उत्तरात म्हटले आहे. मी आपल्याकडे 30 कंत्राटदारांची लिस्ट पाठवित आहे. तीच व्यक्ती वेगवेगळ्या नावाने कंत्राट भरत आहे. ते कंत्राट स्थायी समिती समोर जाते. त्यांना परवानगी दिली जाते. 6,7 कंपनीच्या नावावर 26 कोटी रूपये, 22 कोटी रूपये, 23 कोटी रूपयांचे कॉन्ट्रक्ट दिले जात आहे. गणपती आणि दिवाळी आल्यानंतर घराची साफसफाई केली जाते तशी पावसाळा आल्यानंतर नालेसफाई करण्यात येते. त्यासाठी 131 कोटी रूपये वेगळे आहेत. दररोज कचरा वाहून नेण्यासाठी 800 कोटी रूपये वेगळे आहेत. 1650 कोटी रूपये मिठी नदीसाठी वेगळे आहेत. त्यामुळे किती कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्यानंतर सीआयडी चौकशी शासन करणार आहे हे सांगावे. कदाचित पाच,दहा,पंधरा हजार कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्यानंतर शासन सीआयडी

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पासकर .....

चौकशी करणार आहे काय ? तेव्हा याची शासन सीआयडी चौकशी करणार आहे काय, जे कंत्राटदार काळ्या यादीमध्ये आहेत ते वेगवेगळ्या कंपनींच्या नावाने कंत्राट घेत आहेत, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय, या सर्वांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची शासन सीआयडी चौकशी करणार आहे काय ?

उप सभापती : येथे मुंबई महानगरपालिकेचा कचऱ्यासंबंधीचा कारभार मुंबईतील लोकप्रतिनिधी मांडत आहेत. आताच सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विस्तृत विवेचन केले आहे. त्यांची मागणी अत्यंत रास्त आहे, असे मला वाटते. या सर्व प्रकरणांची सीआयडी चौकशी व्हायला पाहिजे. यासंबंधी माननीय राज्यमंत्र्यांनी निश्चितपणे विचार करून सीआयडी चौकशी करावी असे मी येथे सुचवित आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मिठी नदीच्या गाळासंबंधी प्रत्येक वेळी पावसाळी अधिवेशनामध्ये तक्रारी करण्यात येतात. दुसरी गोष्ट अशी की डम्पींग ग्राऊंडसंबंधी देखील खालच्या व वरच्या सभागृहात तक्रारी करण्यात आल्या होत्या. सीसीटीव्ही लावून कचरा टाकत आहोत असे सांगितले होते. परंतु, सीसीटीव्ही लावण्यात आलेले नाहीत हे देखील लक्षात आले आहे. टेंडर संबंधी, आऊट सोर्सेस संबंधी तक्रार आलेली आहे. मागच्या वेळी 4600 कोटी रूपयांची पुढच्या 30 वर्षांकरिता कचरा टाकण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे. खरे तर हा BMC चा कारभार आहे. यात शासनाचा प्रत्यक्षपणे संबंध येत नाही. परंतु, या सर्व गोष्टी फेस कराव्या लागत असल्यामुळे व या सर्व गोष्टींचा निपटारा व्हावा म्हणून आपले निदेश म्हणून सीआयडीकडे चौकशी देण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ...

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना काही सांगायचे आहे. त्यांना त्यांचे म्हणणे मांडू द्यावे. त्यांचे म्हणणे सभागृहाने ऐकून घ्यावे.

यानंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपला मुद्दा मांडीत असतांना मुंबई महानगरपालिकेबरोबर एमएमआरडीएकडून 1600 कोटी रुपयांचा निधी चार्ज झाल्याचा उल्लेख केला. म्हणजेच मत्री महोदयांनी जाहीर केलेली सी.आय.डी. चौकशी ही मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीएमध्ये झालेल्या घोटाळयांची आहे असे मी समजतो.

श्री. किरण पावसकर : मी एमएमआरडीएबद्दल बोललो नाही, मी फक्त मुंबई महानगरपालिकेबद्दल बोललो.

उप सभापती : संबधित यंत्रणेची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यास सांगितले आहे. माझे निर्देश माननीय राज्य मंत्र्यांनी मान्य केले आहेत. मी आता दुसरी लक्षवेधी सूचना पुकारतो.

(गोंधळ)

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भातील संदिग्धता संपविली पाहिजे. प्रश्न असा आहे की, मागील वेळी या सभागृहामध्ये मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीएने मिठी नदीमधील केलेल्या वेगवेगळया कामांच्या पोर्शनबाबत चर्चा झाली आहे. त्यामध्ये एमएमआरडीएने ज्या दराचे टेंडर काढले होते त्यामध्ये त्यांनी एक टक्का देखील वाढ केलेली नाही. परंतु मुंबई महानगरपालिकेने काढलेल्या टेंडरमध्ये 161 टक्के अधिक वाढ केली आहे, हे जाहीर झाले आहे. त्यामुळे यामध्ये एमएमआरडीएचा संबंध जोडण्याचे काही कारण नाही.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी वक्तव्य केले आहे. हे असे चालणार नाही....

(गोंधळ)

उप सभापती : मी दुसरी लक्षवेधी सूचना पुकारतो. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, एमएमआरडीएमध्ये भ्रष्टाचार नाही तर घाबरता कशाला? एमएमआरडीएची चौकशी करा.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण जे निर्देश दिले....

उप सभापती : मुंबई महानगरपालिकेच्या कचरा गोळा करणाऱ्या यंत्रणेमार्फत भ्रष्टाचार झाल्याचे दिसते. त्याची चौकशी करण्यात यावी अशी माननीय सदस्यांनी सूचना केल्यानंतर त्या संदर्भात सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी असे मी निर्देश दिले. त्या चौकशीला किती कालावधी लागेल एवढे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, एकंदरीत चौकशीची व्याप्ती.....

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला असेल त्या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे व ते खरे आहे. माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी आपले म्हणणे मांडतांना मिठी नदीच्या कामासाठी खर्च करण्यात आलेल्या 1600 कोटींचा उल्लेख केला. त्या बाबत माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मांडलेला मुद्दा अतिशय भयानक असल्यामुळे त्याची चौकशी झाली पाहिजे.

(गोंधळ)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये ज्या प्रकरणी भ्रष्टाचार झाला असेल त्याची चौकशी झाली पाहिजे. तुम्हाला भ्रष्टाचाराविषयी प्रचंड तळमळ आहे. आम्ही पाटबंधारे विभागामध्ये झालेला भ्रष्टाचार पाहिला आहे, परंतु तो नंतरचा विषय आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, मिठी नदीमधील गाळ काढण्याच्या कामामध्ये दोन्ही यंत्रणांचा सहभाग आहे. मंत्री महोदय, जर यामध्ये भ्रष्टाचार नाही असे सांगत आहेत. तर मग त्याच्या चौकशीला आपण घाबरता कशाला? आपल्याला जर चौकशी करावयाची असेल तर दोन्ही यंत्रणांची चौकशी केली पाहिजे. नाही तर आपण एका बाजूने मान्य करीत आहात की, एमएमआरडीएमध्ये काही तरी गडबड आहे, कॉंग्रेसवाल्यांच्या भानगडी विनाकारण बाहेर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

पडतील म्हणून आम्हाला चौकशी करावयाची नाही. असे आपण करु नका. आपल्याला चौकशी करावयाची असेल तर दोन्ही यंत्रणांची करा. त्यानंतर त्यामध्ये भ्रष्टाचार आहे की नाही हे सिध्द होईल. राष्ट्रवादी कॉंग्रेस भ्रष्टाचार नाही असे प्रमाणपत्र देईल. तर मग आपण घाबरता कशासाठी?

(गोंधळ)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी हरकत एकाच गोष्टीसाठी आहे. याठिकाणी जी लक्षवेधी सूचना देण्यात आली, त्याचा रोख विशिष्ट आहे. अनेक गोष्टी त्यामध्ये येतील. या लक्षवेधी सूचनेचा रोख पाहिला किंवा त्यातील विषय लक्षात धेतला तर तो मर्यादित विषयापुरता आहे.

(सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे खाली बसून बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आता सन्माननीय विरोधी पक्षनेते खाली बसून का बोलत आहेत ? आम्ही अशा प्रकारे बोललो काय ? आम्ही माननीय विरोधी पक्षनेते बोलत असताना त्यांना अडविले आहे काय ? मग तुम्ही आम्हाला अडवू नका, तुमचा प्रॉब्लेम काय आहे? तुम्ही तसा प्रश्न आणावा, आम्ही तुम्हाला मदत करु. कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या बाबतीत चर्चा होत असताना या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी केवळ त्यामध्ये भागच घेतला नाही तर अनेक वेळा आपले विचारही मांडलेले आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या बाबतीत बोलण्याचा ठेका केवळ तुम्ही घेतलेला आहे असे काही समजण्याचे कारण नाही. आपण याठिकाणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले त्याबद्दल मी याठिकाणी आभार व्यक्त करतो.पण ही चौकशी ठराविक कालावधीमध्ये व्हावी अशी माझी इच्छा आहे. तेव्हा ही चौकशी किती कालवधीमध्ये करण्यात येणार आहे याबाबतीत देखील सांगण्यात यावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,दोन महिन्यामध्ये एमएमआरडीएची चौकशी करणार.

उप सभापती : सदरहू लक्षवेधी सूचनेच्या संबंधातील चर्चा संपलेली आहे. आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल.

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य शासनाच्या महाराष्ट्र लक्ष्मी,सागर लक्ष्मी,पद्मिनी, अक्षय,पुष्कराज,वैभवलक्ष्मी या लॉटरीच्या छपाई,विक्री व सोडत यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे.

मु.शी. : राज्य शासनाच्या महाराष्ट्र लक्ष्मी, सागर लक्ष्मी,पद्मिनी, अक्षय,पुष्कराज,वैभवलक्ष्मी या लॉटरीच्या छपाई, विक्री व सोडत यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्य शासनाच्या येणाऱ्या महाराष्ट्र लक्ष्मी, सागर लक्ष्मी, पद्मिनी, अक्षय, पुष्कराज, वैभव लक्ष्मी, या लॉटरीच्या 2005 ते 2007 या कालावधीत त्यांची छपाई, विक्री व सोडत यात मोठ्या प्रमाणावर भष्टाचार व गैरव्यवहार झाल्याचे माहितीच्या अधिकारान्वये नुकतेच उघडकीस येणे, योजनेप्रमाणे तिकीट न छापणे, छापलेल्या तिकिटातून विजेत्यांचे नंबर काढणे, राज्य शासनाचे मुद्रणालय तिकीट छापण्यास सक्षम असताना कर्नाटक राज्यातील बंगळूर येथे तिकीट छपाईस देणे, लॉटरी योजनेबाबत ग्राहक आणि विक्रेत्यांना विश्वासात न घेता योजनेत बदल करणे, तिकीट विक्री न करता बेकायदेशीररित्या सोडतीचा ड्रॉ काढणे, अशा प्रकारे लॉटरी खेळणाऱ्या लोकांची फसवणूक करण्यात येणे, याकडे शासनाने केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, या संपूर्ण प्रकरणाची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करुन संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच ग्राहकांचा गमावलेला विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी लॉटरी प्रक्रियेत पारदर्शकता व सुरक्षितता आणण्याची आवश्यकता, लॉटरी विक्रेत्यांना सवलती देण्याची तसेच ग्राहकांसाठी नवनवीन योजना आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

. . . .2 अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (नियोजन राज्यमंत्री) :सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो,"

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 ए-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, हा लॉटरीचा विषय अतिशय भयानक आहे. मी माहितीच्या अधिकारामध्ये जी माहिती मागविली होती, ती माझ्याकडे लिखित स्वरुपामध्ये प्राप्त झाली आहे. हा विषय असा आहे की, आपण लॉटरीची तिकीटे जास्त छापतो.सी.ए.जी.ने म्हटले की, ही तिकिटे जास्त किंवा कमी छापली जातात. त्यातले सगळे खरे आहे.मात्र ती जास्त छापली जातात. मधल्या काळामध्ये तिकिटे छापण्यासाठी बंगलोरला का पाठविण्यात आली? शासकीय प्रिंटींग प्रेसवाले आकर्षकपणे छापू शकत नाही काय, मग ती व्यक्ती बंगलोरच्या श्रीमती गुप्ता बाईंचा नातेवाईकच कशी निघाली इ.प्रश्न आहेत पण ते माझ्या दृष्टीने गौण आहेत. तो कमी प्रमाणातील भ्रष्टाचार आहे पण असे असले तरी ही बाब महत्वाची आहे. या तिकिटांची छपाई करण्यासाठी बंगलोरला का पाठविण्यात आली? याची चौकशी केल्यानंतर माननीय मंत्री महोदयांना कळू शकेल.पण मला महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे की, जी तिकिटे छापली गेली नाहीत आणि त्या तिकिटांच्या न छापलेल्या नंबरला पुरस्कार लागले तर ते कोणाकडे जाणार नाहीत. 4 कोटी 9 लाख 20 हजार रुपये हे कोणकोणत्या लॉटरीचे, कोणकोणत्या नंबरला लागले आणि ते कोणाला दिले गेले ही माहिती माहितीच्या अधिकारामध्ये मिळालेली आहे. मग मी संबंधितांना म्हटले की, नावे द्यावीत. तर त्याबाबतीत असे उत्तर दिले जाते की, ही माहिती उघड केल्यामुळे व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल, तसेच त्याच्या जीविताला धोका निर्माण होईल. म्हणून संबंधितांची नावे देता येत नाहीत. अगोदर लॉटरी लागल्यानंतर पेपरमध्ये फोटो येत असत म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना आमदारकीची लॉटरी लागली वगैरे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांना विनंती आहे की, याबाबत मी आपल्याकडे सर्व माहिती देतो. याबाबतीत इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडून चौकशी करावी. शिवडी येथे काय चालते ते मंत्रालयामध्ये अर्धा टक्का देखील कळत नाही. त्यामुळे मी माझ्याकडे माहितीच्या अधिकाराअंतर्गत जी माहिती प्राप्त झालेली आहे ती दिल्यानंतर आपण खरोखरच इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडून चौकशी करणार आहात काय असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरे म्हणजे ऑन लाईनच्या लॉटरीबाबत काय केले तर प्रत्येक सोडतीला आपण टॅक्सेशन लावले. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना खात्रीपूर्वक सांगतो की, त्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केवळ 30 टक्के सोडतीच दाखविल्या जातात, 70 टक्के सोडती दाखविल्या जात नाहीत. राजश्री लॉटरी, गोल्डन लॉटरी हे यामध्ये आघाडीवर आहेत. या दोन्ही लॉटरीच्या बाबतीत मघाशी सांगितल्याप्रमाणे इकॉनॉमिक आफेन्स विंगच्या माध्यमातून चौकशी करणार आहात काय असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे साहेबांना सांगू इच्छितो की, 2005 ते 2007 या कालावधीमध्ये ज्या सोडतींच्या तिकिटांची छपाई केल्याच्या बाबतीत महालेखापालांनी आक्षेप घेतला त्या बाबतीत महालेखापालांना संपूर्ण स्पष्टीकरण दिलेले आहे आणि ते स्पष्टीकरण स्वीकारले गेले आहे. या छपाईमध्ये जी डिस्क्रिमिनिटी झाली, छपाई झालेली तिकिटे आणि विक्री झालेली तिकिटे यामध्ये झालेल्या डिस्क्रिमिनिटीच्या संदर्भात महालेखापालांना माहिती दिलेली आहे. आता आपला जेवढ्या तिकिटांची विक्री करण्याचा लक्षांक आहे तेवढ्याच तिकिटांची छपाई आपण हल्लीच्या काळामध्ये करतो. या लॉटरीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात करही प्राप्त होतो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ऑनलाईन लॉटरीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. आपल्या राज्यामध्ये जवळपास 240 ऑनलाईन ड्रॉ रोज निघतात. त्यावर आपण जो काही कर लावतो त्यातून आपल्याला मोठ्या प्रमाणात रेव्हेन्यू प्राप्त होतो. काही ड्रॉ रोज निघतात आणि काही ड्रॉ ऑन पेपर असतात अशी माहिती माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे साहेबांनी दिली. त्या संदर्भात निश्चितपणे चौकशी केली जाईल. यामध्ये सुसूत्रता आली पाहिजे. ऑनलाईन लॉटरी राज्य शासनाने सुरु करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. नेमक्या या प्रकरणामध्ये महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाचे व्यवस्थित संपूर्ण उत्तर दिलेले आहे. ऑनलाईनच्या संदर्भात चौकशी केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा प्रश्न दोन्ही विषयाच्या संदर्भात होता. जी तिकिटे छापली नाहीत त्याचे नंबर लागले आणि त्याचे 4 कोटी रुपये दिले गेले असे मी स्पेसिफिक सांगितले. मला उगीच अनावश्यक वेळ घालवावयाचा नसल्यामुळे बाकीच्या निवेदनाबाबत मी उल्लेख केला नाही. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला त्याचे स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची इकॉनॉमिक ऑफेन्स विंग मार्फत चौकशी केली जाईल आणि नागपूरच्या अधिवेशनाच्या आत चौकशी पूर्ण करुन त्या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवली जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून इतके सुस्पष्ट उत्तर आल्यानंतर ऑनलाईनच्या बाबतीत एकच प्रश्न अनुत्तरित राहतो. ऑनलाईनच्या संदर्भामध्ये राज्याला मिळणाऱ्या महसुलाच्या बाबतीत ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी त्याचा गैरवापर होऊ नये असेही कायद्यामध्ये अभिप्रेत आहे. ऑनलाईन सोडतीची आपण ज्यांना परवानगी दिलेली आहे त्यांनी दिवसातून किती वेळा लॉटरी काढावी यालाही बंधने आहेतच. नाही तर एकीकडे आम्ही मटका बंद केला म्हणून पाठ थोपटून घ्यावयाची आणि दुसरीकडे ऑनलाईन लॉटरीवाले जर मटक्यापेक्षाही वाईट पध्दतीने वागत असतील आणि त्यामध्ये कष्टकरी, कामगार, तरुण बरबाद होत असतील तर त्याला काय अर्थ आहे ? म्हणून ऑनलाईन लॉटरीच्या बाबतीत कायद्याने त्यांनी किती ड्रॉ काढणे अभिप्रेत आहे ? ते तेवढेच ड्रॉ काढतात की नाही हे ऑब्झर्व्ह करणारी किंवा व्हिजिलन्स करणारी यंत्रणा शासनाकडे आहे का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपल्या राज्यात इतर माध्यमातून जी ऑनलाईन लॉटरी सुरु आहे त्यांची संख्या 240 च्या जवळपास आहे. मी आधीच सांगितले की, या 240 ऑनलाईन लॉटरीचा ड्रॉ रोजच्या रोज काढला जातो. त्यावर नियंत्रण करण्यासाठी आयुक्त, लॉटरी हे पद आपल्याकडे निर्माण करण्यात आलेले आहे. त्यांची जी व्हिजिलन्स विंग आहे ती यावर सर्व लक्ष ठेवते. भविष्यामध्ये आपल्या राज्यामध्ये आपण ऑनलाईन लॉटरी सुरु करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे त्या सर्व दक्षता आपण घेऊ. येणारी पिढी चुकीच्या मार्गाने जाऊ नये. ऑनलाईन लॉटरीच्या माध्यमातून आपल्याला अतिरिक्त रेव्हेन्यू मिळत असताना सर्व गोष्टींची दक्षता निश्चितपणे घेतली जाईल. त्याची व्यावहारिकता सुध्दा तपासली जाईल आणि त्यानुसारच राज्य शासन भविष्यामध्ये ऑनलाईन लॉटरी सुरु करण्याच्या संदर्भात निर्णय घेईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकण विभागातील शिक्षकांच्या जुलै महिन्यात झालेल्या बदल्या

मु. शी. : कोकण विभागातील शिक्षकांच्या जुलै महिन्यात झालेल्या बदल्या यासंबंधी सर्वश्री निरंजन डावखरे, रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.विक्रम काळे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकण विभागातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्या होणे, प्रामुख्याने ठाणे जिल्हा परिषदेंतर्गत एकूण १३ तालुक्यातील सुमारे ४६२ शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तालुक्याबाहेर बदल्या करण्यात येणे, माहे जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात शाळा सुरू होऊन जुलैच्या पहिल्या सप्ताहामध्ये बदलीचे आदेश निर्गमित होणे, बदली झालेल्या शिक्षकांमध्ये महिला शिक्षक कर्मचारी बहुसंख्येने असणे तसेच सर्वाधित शिक्षकांची वयाची पन्नाशी उलटल्यामुळे प्रापंचिक व शारीरिक अडचणींमुळे त्यांना बदलीच्या ठिकाणी नोकरीत रुजू होणे अत्यंत गैरसोयीचे ठरणे, अशा अनेकविविध समस्यांमुळे शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

श्री.जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी असे म्हटलेले आहे की, कोकण विभागातील बदलीपात्र शिक्षकांच्या दिनांक 2.7.2012 नंतर कार्यमुक्त करण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांना शिक्षक संघटनेने विरोध केलेला आहे. शाळा सुरु होऊन आता दोन आठवडे झाल्यानंतर आयत्यावेळी शिक्षकांच्या हातात बदल्यांचे आदेश पडलेले आहेत. या शिक्षकांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी काही कालावधी देणे आवश्यक आहे. अन्यथा शिक्षक रजेवर गेल्यास शाळांचे वेळापत्रक कोलमडण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. शिक्षक हे सेवा नियमांच्या अधिपत्याखाली येत असले तरी त्यांनाही प्रपंच असतो. त्यांची मुले शिक्षण घेत असतात. त्याकडे दुर्लक्ष करुन डोंगराळ व दुर्गम भागामध्ये त्यांनी ज्ञानदानाचे कार्य उत्तम प्रकारे व कार्यक्षमपणे पार पाडावे अशी अपेक्षा केली जाते. शासनाने या प्रकरणी ग्राऊंड रिॲलिटी लक्षात घेणे गरजेचे आहे. शिक्षकांना सेवा नियमांचा बडगा दाखवून अडचणीच्या ठिकाणी आयत्या वेळी त्यांच्या बदल्या करणे हे कल्याणकारी राज्य शासनाकडून अपेक्षित नाही. त्यामुळे या बदल्यांबाबत फेरविचार करुन झालेल्या बदल्या स्थगित करुन पुढील शैक्षणिक वर्षापासून या बदल्यांची अंमलबजावणी केली जाईल काय ?

निवेदनाच्या भाग तीन मध्ये असे नमूद केले आहे की, यातून 53 वर्षांवरील शिक्षकांच्या बदल्या वगळण्यात आल्या आहेत. परंतु ही वस्तुस्थिती नाही. 53 वर्षे वयाच्या शिक्षकांच्याही बदल्या झालेल्या आहेत. रायगड, रत्नागिरी व ठाणे जिल्ह्यातील अनेक महिला शिक्षकांच्या बदल्या पालघर, मुरबाड व वसई तालुक्यातील डोंगराळ व दुर्गम भागात करण्यात आलेल्या आहेत. शासन याबाबत सहानुभूतिपूर्वक विचार करील काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांची ही पहिलीच लक्षवेधी सूचना आहे. या प्रश्नाबाबत आणि प्रश्नकर्त्या सदस्यांबाबत मला अतिशय सहानुभूती आहे. परंतु दुर्दैवाने मला त्यांच्या तिन्ही प्रश्नांना नाही असे उत्तर द्यावे लागत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी म्हटल्या प्रमाणे शासनाने शाळा सुरु झाल्यानंतर बदल्यांचे आदेश काढण्याची आवश्यकता नव्हती. यासाठी निवडणुकीचे कारण दिले जात आहे. कारण काहीही असेल, पण एकदा शाळा सुरु झाल्यानंतर बदल्यांचे आदेश निघाले तर त्यामुळे मुलांचे व शिक्षकांचेही नुकसान होते. आता

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

महिला शिक्षकांच्या आणि 53 वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. वास्तविक 53 वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या किंवा निवृत्ती जवळ आलेल्या शिक्षकांच्या बदल्या केल्या जात नाहीत, असा संकेत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या झालेल्या बदल्या ताबडतोब रद्द केल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे बाहेरच्या राज्यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या कोठेही केल्या जात नाहीत. ते शिक्षक जेथे नोकरी करतात तेथेच राहत असतात. त्यामुळे ती मुले वर्षानुवर्षे त्या शिक्षकांसमोर मोठी होत असतात. आपल्या राज्यात राजकीय भूमिकेतून बदल्या केल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होते. स्थानिक राजकारणी लोक फक्त आपली सोय पाहतात. त्यामुळे बदल्याची पध्दत कायमची रद्द केली जाईल काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची दुसरी टर्म आहे. त्यांनी दुसऱ्या राज्यातील शिक्षकांची माहिती सदनात सांगितली आहे. त्यांची माहिती असत्य आहे. कोणकोणत्या राज्यांमध्ये बदल्या केल्या जातात त्याबाबतची माहिती माझ्याजवळ आता उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवीन. परंतु आपल्या राज्यात 53 वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या शिक्षंच्या बदल्या करु नयेत असे मूळ आदेशात नमूद केलेले आहे. त्यामुळे त्या प्रकारे कोणाचीही बदली झालेली नाही हे मी ठामपणे सांगू शकतो. आंध्र प्रदेश राज्यात 5 वर्षे इ ाल्यानंतर नियमितपणे बदल्या होतात. अशी अनेक राज्ये आहेत पण मी एका राज्याचे उदाहरण सांगितले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : राज्यामध्ये शिक्षकांच्या मे आणि जून महिन्यामध्ये होणा-या बदल्या फेब्रुवारी महिन्यामध्ये करण्याचे धोरण आखण्यात येईल काय ? असे धोरण आखले तर बदल्यांच्या संदर्भात ज्यांना कोर्टामध्ये जायचे असेल ते जाऊ शकतील.

श्री. जयंत पाटील : असे करता येणार नाही. कारण फेब्रुवारी महिना हा शिकविण्याचा काळ असतो आणि त्या काळामध्ये शिक्षकांना बदलीमध्ये अडकवून ठेवणे योग्य नाही. परीक्षा झाल्यानंतर ताबडतोबीने या बदल्या करण्याची प्रक्रिया पुढील वर्षापासून सुरु करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे हे निवडून आल्यानंतर तातडीने शिक्षकांच्या कामाला लागलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी या खात्याचा कारभार हाती घेतल्या पासून एक नवीन चेहरा या खात्याला देण्याचे काम केलेले आहे. सर्व शिक्षक संघटनांचे म्हणणे विचारात घेऊन शेजारच्या तालुक्यामध्ये बदल्या करण्यात येतील असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. या शिक्षकांच्या बदल्या कशासाठी केल्या पाहिजेत ? शिक्षक आपली शाळा आणि आपले घर बरे अशा पध्दतीने राहात असतो. एखाद्या शिक्षकाची तक्रार असेल तर त्याच्या बदलीचे समर्थन आम्ही करणार नाही. परंतु प्रत्येक वर्षी बदलीची टांगती तलवार शिक्षकाच्या डोक्यावर ठेवणे हे चुकीचे आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये धो-धो पाऊस पडत असतो. अशा परिस्थितीमध्ये शिक्षक आपले कुटुंब घेऊन कोठे जाणार ? तेव्हा किमान कोकणातील बदल्या थांबवून पुढच्या वर्षापासून शिक्षकांच्या बदल्या करुच नयेत अशा प्रकारचा स्वच्छ निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. जयंत पाटील : ग्रामविकास विभागाने अनेक वर्षापूर्वी काढलेल्या जी.आर.नुसार या बदल्या होत आहेत. मी काही ही बदल्याची नवीन पध्दत सुरु केलेली नाही. शिक्षक संघटनांचे मत विचारात घेऊन, त्यांना विश्वासात घेऊन बदल्यांच्या बाबतीत अनेक सुधारणा केलेल्या आहेत. उदा. पती-पत्नींची बदली करीत असताना ती शक्यतो एका गावामध्ये करावी आणि तशी ती होत नसेल तर किमान 30 कि.मी. दरम्यानच्या गावामध्ये करावी, दुर्धर आजार असलेल्या शिक्षकांची बदली होऊ नये, अशा प्रकारच्या सुधारणा केलेल्या आहेत. एक गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे ती म्हणजे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांच्या मनामध्ये असा विश्वास

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

निर्माण झालेला आहे की, त्यांची बदली ही समायोजनाने होते. त्यामुळे बदली करुन घेण्यासाठी वेगळा खर्च करणे किंवा कोणत्या पुढा-याला विनवणी करणे हे बंद झालेले आहे.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

आपण बदल्या करतो म्हणजे नेमके काय करतो ? महाराष्ट्रामध्ये काही शिक्षकांनी एकाच ठिकाणी 28 वर्षे, 25 वर्षे, 27 वर्षे सेवा केलेली आहे. मी या संदर्भात काही जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी बोललो. त्यांनी मला सांगितले की, आता आम्ही 24 वर्षापर्यंत पोहोचलो आहोत. ठाणे जिल्ह्यामध्ये एकाच ठिकाणी 24 वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये 20 वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, मागील वर्षी मला मेळघाटमधील शिक्षक येऊन भेटले. त्यांनी मला सांगितले की, "मागील 22-24 वर्षापासून आम्ही मेळघाटमध्येच शिकवित आहोत. परंतु आमची कधीच बदली करण्यात आली नाही. परंतु आपण घेतलेल्या निर्णयामुळे आमची तेथून बदली झाली.." सांगण्याचा मुद्दा एवढाच की, शिक्षकांना विश्वासात घेऊन हे सर्व केलेले आहे. नियमावलीमध्ये पाच वर्षात बदली करण्याचा नियम होता. त्यामध्ये सुधारणा करुन आपण दहा वर्षांपर्यंत मुदत वाढविली आहे. आज आपण 27, 25, 29 इतक्या ॲव्हरेजवर आलो आहोत. सन्माननीय सदस्य दऱ्याखोऱ्यातील शिक्षकांची चिंता करतात तशीच चिंता दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची देखील करण्याची आवश्यकता आहे. त्या विद्यार्थ्यांना नवीन शिक्षकांची आवश्यकता आहे. या निर्णया बाबत मूठभर शिक्षकांची नाराजी आहे. परंतु महाराष्ट्रातील सर्वच शिक्षकांनी या निर्णयाचे स्वागत केलेले आहे. आपण हे चक्र असेच सुरु ठेवले तर आपले ॲव्हरेज 10 वर्षापर्यंत येईल. 10 वर्षापर्यंत शिक्षकांची बदली होणार नाही. आपण हा निर्णय शिक्षकांच्या संघटनांना विश्वासात घेऊन केलेला आहे. शिक्षक संघटनांची मागणी होती की, तालुक्याच्याच ठिकाणी बदली करावी. परंतु हे जिल्ह्याचे केडर असल्यामुळे आपण त्यांची मागणी अमान्य केली. .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे ज्यांनी नुकतेच या विधानपरिषदेत पाऊल ठेवले आहे त्यांना तसेच सर्वच सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे जर कोणत्या शिक्षकांवर अन्याय झाला , महिला किंवा विधवा शिक्षिकेवर बदलीच्या संदर्भात अन्याय झाला अशी आपल्याकडे तक्रार आली असेल तर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

आयुक्तांकडे अर्ज द्यावा. माझ्याकडे अर्ज दिला तरी चालेल. परंतु बदलीच्या संदर्भात अन्याय झाला असेल तर तो दुरुस्त करण्याचा अधिकार आयुक्त पातळीवर दिलेला आहे. जर आयुक्तांच्या पातळीवर अन्याय दूर झाला नाही असे वाटत असेल तर माननीय मंत्री महोदयांना किरकोळ बदल करण्याचे अधिकार दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री निरंजन डावखरे, कपिल पाटील किंवा विक्रम काळे यांच्याकडे आलेल्या तक्रारी तपासून पाहण्यात येतील. परंतु आपण आयुक्त स्तरावर बदलीचे आदेश दिलेले आहेत. जर आयुक्त पातळीवर समाधान झाले नाही तर मंत्री स्तरावर समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे महिलांच्या संदर्भात जो उल्लेख केला तो महत्वाचा आहे. नियम किंवा जी.आर.मध्ये तरतूद नसली तरी आपण मानवतेच्या दृष्टीकोनातून विचारु करुन ज्या महिलांची डोंगरदऱ्यात बदली झालेली आहे त्यांच्या बाबतीत फेरविचार करणार काय ?

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. शिक्षकांच्या बदलीच्या संदर्भात एक चांगली पध्दती अनुसरली म्हणून मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. या पध्दतीमुळे चुकीच्या पध्दतीने होणाऱ्या बदल्या बंद झाल्या. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश वेगळा आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती आणि तेथे पडणारा पाऊस पाहता तसेच या दोन्ही जिल्हापरिषदांनी माननीय मंत्री महोदयांकडे तसेच आयुक्तांकडे विनंती केली की, शिक्षकांना बदलीच्या ठिकाणी जाणे गैरसोयीचे आहे. तसेच शिक्षकांच्या मुलांना 5 जुलै नंतर शाळेत प्रवेश मिळणे गैरसोयीचे होणार आहे.

यानंतर श्री.गिते..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

हा निर्णय महाराष्ट्रासाठी घेतला तो शंभर टक्के बरोबर आहे. रत्नागिरी आणि सिधुदुर्ग या जिल्हयांतील बदल्या रद्द करण्याबाबतची विनंती करण्यात आलेली आहे, ती विनंती माननीय ग्रामविकास मंत्री मान्य करतील काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात पूर्णपणे बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे त्या बदल्या थांबविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. आता फक्त रत्नागिरी जिल्हा राहिलेला आहे. राज्यातील सर्व जिल्हयात बदल्या झाल्या आणि रत्नागिरी जिल्हयासाठी अपवादात्मक बाब म्हणून बदल्या रद्द केल्या तर इतर जिल्हयांमध्ये असंतोष वाढेल आणि म्हणून रत्नागिरी जिल्हयातही बदल्या कराव्या लागतील.

उप सभापती : बदल्यांच्या बाबतीत रत्नागिरी हा एकच जिल्हा राहिला असेल तर त्या बाबतीत विचार करण्यास हरकत नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कालच मी आदेश काढलेले आहेत. बदल्याच्या संदर्भातील टाईम टेबल पुन्हा काढलेले आहे. या सगळया बदल्या वेळेतच झाल्या असत्या. परंतु बदल्यांच्या संदर्भात काही शिक्षक संघटना कोर्टात गेल्या. कोर्टाच्या सुटीच्या आदल्या दिवशी या संबंधी निकाल आला. त्यामुळे कोर्टाची सुटी पूर्ण होईपर्यंत थांबावे लागले. त्यामुळे या बाबतीत उशीर झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे ज्या मतदार संघातून निवडून आले तेथे निवडणूक होती. नाशिक जिल्हयात निवडणूक होती. निवडणुका असल्यामुळे आचारसंहिता चालू होती. आचारसंहिता संपल्यानंतर बदल्या कराव्यात असा निर्णय घेतला गेला. रत्नागिरी जिल्हा असा निघाला की, त्यांनी अजिबातच समायोजन केलेले नाही आणि त्यामुळे उशीर झाला. काही गोष्टी गृहीत धरुन जिल्हा परिषदा काहीच करीत नसतील तर ज्यांनी नियमावली पाळून बदल्या केला किंवा समायोजन करुन ठेवले होते, त्या जिल्हयांत असंतोषाला तोंड द्यावे लागेल. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत नवीन सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांना विश्वास देऊ इच्छितो की, कोणावर अन्याय झाला असेल तर त्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार आयुक्तांना आहे. या गोष्टीत मंत्री महोदय देखील लक्ष घालू शकतात.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग-सावंतवाडी येथे परप्रांतीय लोक गुन्हेगारी प्रवृत्तीने हडप करीत असलेली शेतजमीन

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग-सावंतवाडी येथे परप्रांतीय लोक गुन्हेगारी प्रवृत्तीने हडप करीत असलेली शेतजमीन यासंबंधी श्री.परशुराम उपकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

लक्षवेधी सूचना क्रमांक-5

उप सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 5 नंतर चर्चेसाठी घेण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात आली असून सदर लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 02.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.37 ते 02.15 वाजेपर्यंत मध्यंतरासाठीस्थगित झाली.)

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ. शी./मु. शी. : क्रीडा प्रशिक्षक नेमण्याबाबत होत असलेला विलंब याबाबत श्री.सतीश चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" राज्यात अनेक खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर पदक मिळविणारे खेळाडू आहेत. तसेच नोकरी किंवा स्पर्धात्मक खेळांडूमधून निवृत्त झालेले खेळाडू व प्रशिक्षक आहेत. अशा खेळाडू किंवा प्रशिक्षकांचा खेळाडूंना उपयोग होऊ शकतो. तथापि, शासनाने क्रीडा विकासाकरिता माहे मार्च,2012 च्या तिसऱ्या सप्ताहात 150 क्रीडा शिक्षक नेमण्याचा निर्णय घेऊनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी क्रीडा प्रशिक्षक नेमण्यात होत असलेला विलंब, याबाबत खेळाडूंना प्रशिक्षण देणेबाबत क्रीडा शिक्षक नेमण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : चंद्रपूर जिल्हयात रोहयोवरील मजुरांना मजुरीचे पैसे न मिळणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

" चंद्रपूर जिल्हयात महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची कामे सुरु होणे, सदर जिल्हयातील मजुरांनी केलेल्या कामाचे मार्च, एप्रिल, मे, जून या चार महिन्याचे केलेल्या कामाच्या रोजीचे पैसे अद्यापही न देणे, त्यामुळे जिल्हयात 70 कोटी रुपयांची आवश्यकता असणे, त्यामुळे मजुरांवर आलेली उपासमारीची पाळी, शासनाने ताबडतोब मजुरांचे मजुरीचे पैसे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची उपाययोजना."

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांचे नाशिक येथे राष्ट्रीय स्मारक उभारणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंतराव जाधव : (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" चित्रपटतंत्र, वितरण, मुव्ही कॅमेरा हे शब्दही माहिती नसतानाच्या काळात दादासाहेब फाळके यांनी एकहाती प्रयत्न करुन पहिल्या भारतीय चित्रपटाची केलेली निर्मिती, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये चित्रपटतंत्र आत्मसात करुन त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचा घातलेला पाया, त्यामुळे चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांचे नाशिक येथे राष्ट्रीय स्मारक करु अशी शासनाने नुकतीच केलेली घोषणा,भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक असलेले दादासाहेब हे नाशिकच्या मातीतले होते, नाशिक ही दादासाहेबांची जन्मभूमी व कर्मभूमी असून येथे त्यांचे राहते घर,जुना स्टुडिओ,फिल्म प्रोसेस लॅब व 1934 मधील त्यांची मॉरीस गाडी आजही त्यांनी चित्रपटसृष्टीला जन्माला घातल्याची साक्ष देत असणे, नाशिकमध्ये पांडवलेण्याच्या पायथ्याशी 29 एकर जागेवरील यापूर्वी असलेले महानगरपालिकेचे दादासाहेब फाळके स्मारकच राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, राष्ट्रीय स्मारकासाठी दुसरीकडे जागा शोधण्यापेक्षा किंवा प्रश्न निर्माण करण्यापेक्षा महानगरपालिकेच्या दादासाहेब फाळके स्मारकाचीच सुधारणा करुन येथेच राष्ट्रीय स्मारक निर्माण करण्याची आवश्यकता, नाशिकच्या नैसर्गिक वातावरणाचा नेहमीच मोह पडत असलेल्या मुंबईच्या सेलेब्रिटींची नाशिकला असणारी नेहमीच पसंती, शासनाने केलेल्या घोषणेनुसार नाशिकमध्ये दादासाहेब फाळके यांच्या राष्ट्रीय स्मारकाचे काम तत्काळ सुरु करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :रायगड जिल्हयातील शिक्षकांना वेळेवर वेतन

न मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते,

वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" रायगड जि.प.च्या माध्यमिक विभागात सुमारे 400 पेक्षा अधिक अनुदानित खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा असून या शाळांमध्ये काम करणाऱ्या हजारो शिक्षक-शिक्षकेतराचे वेतन रायगड जिल्हयाच्या वेतन पथक कार्यालयाकडून होते. रायगड जिल्हयातील शिक्षकांना कधीही वेळेवर वेतन मिळत नाही. जून महिन्याचे वेतन त्यांना अद्यापही मिळाले नाही. मे 2012 चे वेतन 25 जून 2012 ला मिळाले. सातत्याने यासंदर्भात तक्रारी येत असून वेळेवर वेतन न मिळाल्याने शिक्षक-शिक्षकेतरांना प्रचंड अडचणी येत आहेत. वेतन पथकाचा हलगर्जीपणा व जाणीपूर्वक विलंब करुन देयकात त्रुटी ठेवण्याचे प्रकार होत आहेत. या जिल्हयातील शिक्षकांना वेळेवर वेतन मिळण्याच्या संदर्भात अनेक वेळा शिक्षक-शिक्षकेतवर संघटनांनी आंदोलने करुनही सुधारणा होत नाही. याबाबत शासनाने तातडीने देखल घेऊन रायगड जिल्हयाच्या वेतन पथक कार्यालयाच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करावी ही विनंती आहे."

. ---

नंतर श्री. खर्चे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : धान्य साठवणुकीस अयोग्य असलेल्या गोदामांमुळे लाखो मे.टन धान्याची होत असलेली नासाडी याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, राज्यातील 1 हजार 39 गोदामांपैकी 184 गोदामे वापरास अयोग्य असल्याचे निरीक्षणात आढळून आले असून 75 लाख मे.टन धान्याच्या साठवणुकीचा प्रश्न राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागासमोर आला आहे. हे धान्य दरवर्षी खाण्याच्या स्थितीत राहत नसल्याचीही नोंद शासनाच्या आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट केली आहे. कुजलेल्या अवस्थेतील हे धान्य शिधा पत्रिका धारकांना वितरीत करण्यात आले आहे.

भंडारा जिल्ह्यात 16 धान्य साठवणुकीची गोदामे कार्यरत असून 4 गोदामे वापरण्यास योग्य नसल्याने धान्य नासाडीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. राज्यात 5 कोटी 68 लाख मे.टन धान्य साठविण्यासाठी पुरेशी गोदामेच नसल्याने भाड्यापोटी वर्षाला 280 कोटी 68 लाख रुपयांचा महसुली खर्च व्यर्थ जात आहे.

निकृष्ट गोदामांच्या यादीत राज्यातील 21 जिल्हे असून विदर्भात गोदामांची संख्या सर्वाधिक आहे. सद्य:स्थितीत पश्चिम विदर्भातील बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यात 119 गोदामे तर वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली आदि जिल्ह्यात 156 गोदामांत धान्य साठवणूक केली जात आहे.

यातील अनेक गोदामे अशी आहेत की जेथे धान्य साठवणुकीसाठी पुरेशा सुविधा नाहीत. पर्यायाने धान्याच्या नासाडीच्या प्रमाणात वाढ होत आहे. याचा परिणाम गोरगरीब शिधावाटप धारकांना धान्य न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी या महत्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : बीड जिल्ह्यातील माती परीक्षण यंत्र बंद असणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"कृषी विभागाच्या जिल्हा माती परीक्षण प्रयोग शाळेत शेत जमिनीतील गुणधमाची कमतरता किंवा उपयुक्तता शोधणारे बीड जिल्ह्यातील माती परीक्षण यंत्र मागील दोन वर्षांपासून बंद आहे. शेतकऱ्यांना माती परीक्षण करण्यासाठी जालना, औरंगाबाद, नांदेडची वारी करावी लागते. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर वाढल्याने जमिनीचा पोत बिघडला आहे. एकच पीक वारंवार घेतल्याने जमिनीतील विशिष्ट मुलद्रव्य अन्य घटक कमी होत आहेत. आपल्या जमिनीचे आरोग्य कसे आहे याची तपासणी करण्यासाठी राज्याने प्रत्येक जिल्ह्यात माती परीक्षण प्रयोग शाळा सुरु केल्या. प्रयोग शाळेत जमिनीत स्फुरद आणि पालाश यांचे प्रमाण किती आहे हे तपासण्यासाठी 15 रुपये शुल्क आकारले जाते. बीड जिल्ह्यात वर्षभरात 11000 नमुने तपासले जातात. फळबाग करताना NKP बरोबर मुलद्रव्यांची कमतरता तपासायला लागते. लोह, तांबे, जस्त यांचे प्रमाण तपासण्यासाठी ॲटोमेटिक अव्हाप्शन सेफ्टो फोटो मीटर यंत्र प्रयोग शाळोत आठ वर्षापूर्वी बसवले, तंत्रज्ञानाअभावी उशीरा सुरु झाले, ते आता बंद आहे. दुरुस्तीस फक्त दीड लाख रुपये हवेत. पण तेही नाहीत यामुळे समाजात निर्माण झालेली असंतोषाची भावना व त्यावर शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पुणे महापालिकेच्या इंग्रजी शाळांतील विद्यार्थ्यांना सातवीनंतर आठवीत प्रवेश घेण्यात्pा येणाऱ्या अडचणी, याबाबत श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या इंग्रजी शाळा सातवीपर्यंत असून या शाळांमधून सातवी उत्तीर्ण झाल्यानंतर अनुदानित, विना अनुदानित किंवा खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेऊन देण्याची जबाबदारी मंडळाची आहे. यावर्षी याच मंडळातून अनेक विद्यार्थी उत्तीण झाले असून त्यापैकी थोड्याफार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला व उर्वरित अनेक विद्यार्थ्यांचे काय झाले याबाबत शिक्षण मंडळाकडे, पालिकेकडे काहीही व कोणती माहिती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येते, पालिकेच्या शाळांमधून सातवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खाजगी शाळा शक्यतो प्रवेश द्यायला तयार होत नाहीत. त्यांना मिळालेला शिक्षणाचा दर्जा आणि त्याहूनही महत्वाचे म्हणजे त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता या शाळा पालिकेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायला फारशा उत्सुक नसतात. त्याचबरोबर महानगर पालिकेच्या वतीने एकूण 46 शाळा चालविल्या जातात. या शाळांमधून 10 हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत आठवी मध्ये प्रवेश घेताना अडचण उद्भवते. याकरिता पुणे महानगर पालिका व शासनाने उपाययोजना राबवावी अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कै.वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यात विविध कार्यक्रम राबवण्याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच राज्यात सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री असलेले आणि राज्यातील हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष दि. 1 जुलै, 2012 रोजी पासून सुरु झाले आहे. महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री माननीय कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्ष शासकीय पातळीवर करुन 100 कोटीची तरतूद केली असून वर्षभर विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

कै. वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची प्रदीर्घ कारकीर्द आणि त्यांनी हरितक्रांतीच्या माध्यमातून महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत विक्रमी उत्पादन निर्माण कराण्याची क्षमता निर्माण करुन शेती प्रधान महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने हरितक्रांती निर्माण केली असून देशाच्या कृषी क्रांतीलाही मार्गदर्शन केले होते. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त शासकीय पातळीवर तसेच महाराष्ट्राच्या चारही कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उन्नतीचे कार्यक्रम साजरे करावेत, याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : बुलढाणा, जालना, उस्मानाबाद या जिल्हयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखांमधून करण्याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून होत असते. परंतु मराठवाडा विभागातील बुलढाणा, जालना, उस्मानाबाद या जिल्हयातील जिल्हा बँका अडचणीत आल्यामुळे व त्यांची आर्थिक परिस्थिती खराब झाल्यामुळे तेथील सर्व बँकाच्या शाखेतून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या 3 महिन्यापासून झालेले नाही. खात्यावर पैसे असतांना सुध्दा तसेच शासनाकडून शिक्षक व शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शासनाने निधी दिलेला असतांनाही सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांना पैसे असतांनाही दिले जात नाही. त्यामुळे त्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे त्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून जालना, बुलढाणा व उस्मानाबाद जिल्हयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन यापुढे राष्ट्रीयकृत बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखांमधून करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करुन तशा बाबतचे आदेश शासनाने त्वरित निर्गमित करावेत अशी मागणी मी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मांडत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचा मुद्दा

उप सभापती : आता औचित्याच एक मुद्दा घेण्यात येईल.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

नाशिक जिल्हयात यंदा पावसाने पाठ फिरवल्यामुळे आणि आगामी काही दिवसात पाऊस पडण्याची शक्यता कमीच असल्याने निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई, पावसाचा थेंबही नाही अन चाऱ्याचीही उपलब्धता नाही. त्यामुळे दुष्काळाचे संकट अधिक गडद होत असतांना शासनाने नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यातील दोडी, वावी, आणि धुळवाड येथील तिन्ही चारा छावण्या दि. 13 जुलै, 2012 बंद केल्यामुळे शेतकऱ्यामध्ये पसरलेला तीव्र संताप, छावण्या चालवण्याची मुदत संपल्याचे कारण सांगून हया छावण्या बंद केल्यामुळे जनावराची होत असलेली उपासमार, दुष्काळी स्थिती कायम असतांनाही छवण्या बंद करुन शासनासने शेतकरी आणि जनावरांना वाऱ्यावर सोडल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व त्यामुळे शेतकऱ्यांवर होणार घोर अन्याय, येथील चारा छावण्या हया स्थानिक मतदार संघातील एका लोकप्रतिनिधीकडून चालविल्या जात असल्याने चारा वाटप करतांना शेतकऱ्यांवर केला गेलेला दुजाभाव, तसेच चारा देतांना काटा मारला जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली चिडीची भावना, येथे पुरवल्या गेलेल्या चारावाटपात मोठया प्रमाणावर झालेला गैरव्यवहार, हया चारा माफियांवर कारवाई करण्याची शेतकऱ्यांची असलेली मागणी, शासनाने येथील चारा घोटाळयाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी तसेच जनावरांची उपासमार टाळण्यासाठी या चारा छावण्यांना शासनाने तत्काळ मुदतवाढ द्यावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख पुढे सुरु.....

पृ. शी./मु. शी. : परभणी जिल्ह्यातील सेलू नगरपालिकेच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी दिनांक 10 जुलै 2012 रोजी बौद्ध धम्म ध्वजाची केलेली विटंबना याबाबत श्री.राम पंडागळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

परभणी जिल्ह्यातील सेलू नगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी तसेच जातीयवाद्यांनी बौद्ध धम्माचा धम्मध्वज काढून दिनांक 10 जुलै 2012 रोजी व त्या सुमारास धम्म ध्वजाची केलेली विटंबना, सेलू येथील गणेशनगर भागात बौद्ध बांधवांनी धम्मध्वज लावला होता त्या ठिकाणी बौद्ध बांधव जमून प्रार्थना वगैरे करीत असत. तथापि, काही जातीयवाद्यांचा याला विरोध होता. त्यांनी काही राजकीय पक्षाच्या लोकांना हाताशी धरून नगरपालिकेकडे धम्मध्वज काढण्याची मागणी केली. परंतु,नगरपालिकेच्या मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांना बोलावून तेथील धम्मध्यवज काढण्याबाबत जबरदस्ती केली. त्यामुळे नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी धम्मध्वज काढून खाली पाडला व हा ध्वज पायाने तुडवून निघून गेले. त्यामुळे बौद्ध बांधवात पसरलेले भीतीचे वातावरण, नगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरूद्ध बौद्ध बांधवांनी सेलू पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करून व त्यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी केली असता पोलिसांनी याकडे केलेले दुर्लक्ष या विरोधात तेथील बौद्ध बांधवांनी नगरपालिकेसमोर उपोषणास बसून व्यक्त केलेला निषेध, संबंधितांविरूद्ध कार्यवाही होत नाही तो पर्यंत बौद्ध जनतेने तीव्र आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, ज्यांनी धम्म ध्वज पायदळी तुडविला त्यांच्या विरोधात कार्यवाही करण्याबाबत मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2012-2013 च्या खर्चाच्या पुरवणी मागण्या.

उप सभापती : पुरवणी मागण्यांवरील चर्चा आज व मंगळवार, दिनांक 17 जुलै 2012 रोजी घेण्यात येणार आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करायची आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पुरवणी मागण्या व मंगळवार, दिनांक 17 जुलै 2012 रोजी असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा मंगळवार, दिनांक 17 जुलै 2012 रोजी पूर्ण करावी लागेल.

शीर्षक : विविध मंत्र्यांच्या पुरवणी मागण्या.

उप सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : जी-2, जी-5,जी-7
के-6, ओ-5, ओ-7, ओ-8

उद्योग,बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : के-7, के-8

सार्वजनिक बांधकाम (सावर्जनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, आय-3,आय-4, आय-5

गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवण्या मागण्या क्रमांक : बी-1, बी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ...

वने,पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक : सी-6

सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यवसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : एन-4,एन-5

कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक : डी-3

ग्राम विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : एल-3,एल-5

सहकार आणि संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक : व्ही-2

महसूल व खार जमिनी मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवण्या मागण्या क्रमांक : सी-1, सी-2, सी-8,

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : वाय-2, वाय-5

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राज्यशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक : आर-1, आर-2

कामगार व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक के-4

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता आपण पुरवणी मागण्या मांडायला परवानगी दिलेली आहे. सदर मागण्यांवर चर्चा होत असताना संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी येथे पूर्णकाळ बसले पाहिजे. त्यांनी सभागृहात रोजंदारीवर बसता कामा नये.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, रोजंदारी या शब्दाला माझी हरकत आहे.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. मी रोजंदारी शब्द मागे घेतो. आपणाला रोजंदारीवर कोण नियुक्त करणार ? आपण सर्वांचीच जबाबदारी घेता. (अडथळा) मी चहाच्या भाडयावर बोलू का ?

श्री.नारायण राणे (बसून) : आपण काही बोला. मी उत्तर देण्यास तयार आहे.

श्री.दिवाकर रावते : आपणाकडे सर्वच जबाबदारी आहे. हे सर्व बिनकामाचे आहेत असे आपल्याला वाटते. मीच सर्वांची जबाबदारी घेतो असे आपणाला वाटते. त्यामुळेच आपण सर्व मंत्र्यांना अगोदरच मूर्खात काढले आहे हे आम्ही बघितले आहे. कधी काही झाले की, मी आहे ना, अशी आपली भूमिका असते. संबंधित खात्याचा मंत्री असला तरी मी उत्तर देतो असे आपण म्हणता. सन्माननीय सदस्य हे संबंधित खात्याबरच बोलत असतात. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. अगदीच नैसर्गिक आपत्ती असेल तर त्यांना जाण्यास काहीही हरकत नाही. त्या बाबतीत आमचे काहीही म्हणणे नाही. सदर विनंती करण्यासाठी मी उभा आहे. धन्यवाद.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यां देखील माननीय मंत्र्यांची उत्तरे होई पर्यंत सभागृहात उपस्थित राहणे गरजेचे आहे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. मार्केटमध्ये दिवाळीमध्ये इन्स्टॉलमेंटवर वस्तू मिळतात. तसे आता राज्याचे बजेट देखील इन्स्टॉलमेंटवर येत असल्याचे दिसून येत आहे.

श्री.दिवाकर रावते (बसून) : आपण हप्त्याहप्त्यांमध्ये असा शब्द वापरावा.

श्री.विनोद तावडे : हप्ता या शब्दाचे खूप अर्थ होतात. सरळ अर्थ समजू शकणार नाही म्हणून मी इन्स्टॉलमेंट हा शब्द वापरला आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या सर्व मागण्यांचा मी बारकाईने अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, जवळ जवळ 3 हजार 427 कोटी रुपयांच्या मागण्या नियमित बजेटमध्ये समाविष्ट करता आल्या असत्या. जर त्या मागण्या नियमित बजेटमध्ये दाखविल्या असत्या तर आपल्याला तुटीचा अर्थसंकल्प दिसला असता. यामध्ये काही गोष्टी अशा स्वरुपाच्या दाखविल्या आहेत, उदा. महसूल विभागाच्या बाब क्रमांक 24 आणि 27 मध्ये 6 कोटी 12 लाखांची नवीन वाहनांची खरेदी दाखविण्यात आली आहे. महसूल विभागाची मागील दोन महिन्यात सर्व वाहने भंगारात निघाली की काय? जिल्हा पोलीस दलाच्या वाहनांच्या दुरुस्तीकरिता 143 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. अशाप्रकारचा खर्च होणार आहे हे नियमित बजेट मांडीत असतांना आपल्याला माहीत नव्हते काय? मावळच्या गोळीबाराची चौकशी होणार आहे याची आपल्याला माहिती होती. परवा लोकसत्तामध्ये श्री. रामदास फुटाणे यांची एक चांगली कविता छापून आली होती. यामध्ये चौकशी कशी लावण्यात येते आणि ती चौकशी कशी लांबते यावर सुध्दा पैसे लागणार आहेत. या मध्ये काही गोष्टींची आपल्याला माहिती असल्यामुळे त्या गोष्टी नियमित बजेटमध्ये समाविष्ट करता आल्या असत्या तरीपण आपण केल्या नाहीत. त्यामुळे इन्स्टॉलमेंटने येणारे, हप्त्या-हप्त्याने येणारे बजेट असे याला म्हटले पाहिजे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र. 15 मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेसाठी 39 कोटी 37 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माननीय आबांकडे हे खाते असल्यामुळे संपूर्ण वातावरण तशाप्रकारचे झाले आहे व या योजनेला प्रसिध्दी देखील मिळाली आहे. या योजनेमध्ये तातडीने 29 कोटी रुपये समाविष्ट करण्याची गरज कां निर्माण झाली? एकदम राज्यामध्ये तंटे वाढले आहेत काय? राज्य मंत्रिमंडळामध्ये वाढलेल्या तंटयाबाबत एखादी वेगळी समिती नेमण्यासाठी तरतूद केली आहे काय याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 130 मध्ये रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित देयकांच्या प्रदानासाठी 30 लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या ठिकाणी वेगवेगळया बाबींवर रकमा खर्च झालेल्या आहेत त्या मी या ठिकाणी मांडल्या आहेत. या अचानक उद्‌भवलेल्या बाबी नाहीत. स्पष्टीकरणात्मक निवेदनामध्ये म्हटले आहे की, "नवीन कामांसाठी तरतुदी करणे आवश्यक आहे" या मध्ये नवीन बाबी कोणत्या आहेत हे समजत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्र. 30 मध्ये दुष्काळग्रस्त बाधित असलेल्या शेतकऱ्यांसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परवाच्या दिवशी माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी जो काही मोठा आकडा सांगितला त्यावरुन माननीय डॉ.पतंगराव कदम हे पुनर्वसन मंत्री आहेत की, पॅकेजिंग मंत्री आहेत? सद्या नेहमीच्या असलेल्या योजना चांगल्या पाकिटात बांधून त्या रॅपरमध्ये गुंडाळून आणावयाच्या असे चालू आहे. नाही तर एवढी मोठी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेबांकडे दिली नसती. या नेहमीकरिता असलेल्या योजनांसाठी 50 कोटींची तरतूद केली आहे. त्यावर "गिफ्ट रॅपर" असे म्हटलेले आहे. त्यामधून आपण शेतकऱ्यांना नवीन काही दिले नाही. मघाशी म्हटल्याप्रमाणे आपण अतिरिक्त 50 कोटींचा निधी या ठिकाणी मागितला आहे.

सभापती महोदय, आपण केंद्र सरकारकडे दुष्काळग्रस्तांसाठी 2 हजार 281 कोटी रुपये मागितले होते. त्यापैकी केंद्र सरकारकडून आपल्याला 574 कोटी रुपये मिळाले आहेत. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब आपण हाय प्रोफाईलमधील आहात, माननीय मुख्यमंत्री हे हाय कमांडच्या मर्जीतील आहेत. माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेब सांगत असतांनाही आपण विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी चौथा उमेदवार उभा केला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे तीनच उमेदवारांनी अर्ज भरले. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्याकडे चार मते असतांनाही ते निवडून आले. अशा प्रकारे आपण केंद्र सरकारकडे 2281 कोटी रुपये मागतो तरीसुध्दा केंद्र सरकारकडून आपल्याला 574 कोटी रुपये मिळतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणखी 1707 कोटी रुपयांची गरज आहे. ती यामध्ये कुठेतरी दिसली पाहिजे.कारण दुष्काळासाठी याची गरज आहे. पुनर्वसन, आपत्ती किंवा मदत जी काही आहे . . . .

श्री.नारायण राणे (खाली बसून) : मी बोलणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना महसूल विभागाच्या बाबतीत बोलता येणार नाही तर उद्योग विभागाबाबत बोलता येईल. पान क्र.27, बाब क्र.32 पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी नैसर्गिक आपत्तीच्या काळामध्ये जो खर्च केला पाहिजे त्यासाठी आता 624 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. यातले किती रुपये टँकर माफिया, चारा माफियांना प्रत्यक्षात जात आहेत हा प्रश्न आहे. हे विरोधी पक्षाकडून सांगण्यात आले नाही तर सत्ताधारी पक्षा कडून जे सांगण्यात आले तेवढे गृहीत धरुन चौकशी केली तरी आपल्या लक्षात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेख मांडतांना चाऱ्याच्या घोटाळ्याबाबत विषय मांडला आहे. तसेच राज्यातील दुष्काळाचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत चालले आहे. हे लक्षात घेता 2685 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे, त्यातील 50 कोटी रुपये देण्यात येत आहेत. मग वरची जी रक्कम आहे ती सोडा पण उरलेले किमान 2000 कोटीचे खरे पॅकेज केवळ रॅपिंग नाही तर ते दुष्काळाशी सामना करण्यासाठी राज्य शासनाने घोषित केले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, गेल्या वर्षी देखील असेच पॅकेज घोषित झाले. त्यातील थोडासा भाग दिला. नंतर बजेटच्या माध्यमातून थोडेसे दिले. परंतु बजेटमध्ये डेफीशिट का आले? असा प्रश्न उपस्थित झाला तर यासंबंधात असे सांगण्यात आले की, पॅकेज घोषित केले म्हणून डेफीशिट आले. परंतु प्रत्यक्षात तेवढा खर्च झालाच नव्हता. त्यामुळे मला असे वाटते की, शेतकऱ्यांना पॅकेज दिले असे म्हणून तूट दाखवावयाची आणि प्रत्यक्षात केंद्रीय वित्तीय आयोगाची आपल्यावर वक्रदृष्टी होता कामा नये. यासाठीच श्री.जगमोहन यांनी म्हटले होते की, हे जग्लरी बजेट होते आणि ते परत पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सिध्द होत आहे. दुष्काळग्रस्तांसाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून 2000 कोटी रुपयांच्या पॅकेजची मागणी करीत असताना केवळ 2 विभागामध्ये काय गोष्टी सुरु आहेत ते सांगतो.

सभापती महोदय, समाजकल्याण विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर बाब क्र.114 अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी तरतूद करण्यात आली आहे.तसेच बाब क्र.115 मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती साठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी तरतूद करण्यात आली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

ही तरतूद चांगली आहे पण ती उशिरा करण्यात आली आहे. ठीक आहे."देर से आए दुरुस्त आए" यातून काही भले होऊ शकते. परंतु सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत व्ही.जे.एन.टी.साठी असलेल्या आश्रमशाळांचे स्थलांतर करण्याबाबत 1 ऑगस्ट 2007 रोजी शासनाकडून निर्णय घेण्यात आला आणि अशा प्रकारे स्थलांतर करताना आवश्यक असलेल्या अटी व शर्ती यांची यादी देण्यात आली. त्या संदर्भातील अटी ठरलेल्या आहेत. बृहत आराखड्याप्रमाणे आश्रमशाळांचे ठिकाण असले पाहिजे. तेथे सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा असावयास पाहिजेत. तसेच राज्य शासनाचे संचालक एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये स्थलांतर करण्यासाठी परवानगी देतील असे म्हटले आहे.ज्या ठिकाणी आश्रमशाळा आहेत तेथे जर पूर आला, भूकंप झाला तर अशा वेळी त्याचे स्थलांतर करता येईल अशा प्रकारचे नियम करण्यात आले.

सभापती महोदय, सध्या तेथे निवासी शाळा आहे, त्या सभोवती असलेली अनेक गावे दुसरी कडे गेली असतील तर तो भाग आहे. सध्या तेथे ज्या निवासी शाळा आहेत तेथील सभोवतालच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या 50 टक्क्याने कमी झाली तर त्या जिल्ह्यात 10 कि.मी.च्या परिसरात ट्रान्सफर देता येऊ शकते इ.अटी घातल्या आहेत. या सगळ्या अटी असताना दोन-तीन आश्रमशाळांचे काय झाले ते मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, प्रतिभा शिक्षक प्रसारक मंडळ जनुना, ता.बार्शी, टाकळी, अकोला संचालित लालखेड अमरावती येथील प्राथमिक आश्रमशाळा, अष्टविनायक शिक्षण प्रसारक मंडळ, अहेरी यांच्या बाबतीत सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

10 किलोमीटरच्या आत पाहिजे पण प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही. त्यांनी जिल्हा बदललेला आहे. नैसर्गिक आपत्ती वगैरे काही नाही. सर्वात गंमतीची बाब अशी आहे की, या संस्थेने स्थलांतराचा प्रस्ताव 20 मार्च, 2010 रोजी दिलेला आहे पण त्याच्या एक महिना अगोदरच म्हणजे 20 फेब्रुवारी, 2010 रोजी संचालक, विमुक्त जाती यांच्याकडे हा अर्ज आला. हे शासन किती तत्पर आणि कार्यसम्राट आहे ? मूळ अर्ज मार्च महिन्यामध्ये आला आणि त्याच्या आधीच फेब्रुवारी महिन्यामध्ये संचालकांकडे अर्ज आला. हे स्थलांतर करताना श्री. प्रशांत अंजनवार यांचा विशेष रस आहे असे संचालक वगैरे सांगतात. असे का झाले अशी विचारणा केली असता आम्हाला माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळाली की, अशी परिस्थिती आहे. श्री. अंजनवार हे कोण आहेत, कोणाचे सहायक आहेत हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, स्वामी समर्थ शिक्षण संस्था, अक्कलकोट यांच्या बाबतीत मी मघाशी उल्लेख केला. तिरुपती बालाजी प्राथमिक आश्रमशाळा, डिग्गेवाडी यांच्या बाबतीत स्थलांतर पुन्हा 10 किलोमीटरच्या आत नाही. स्थलांतर त्याच जिल्ह्यामध्ये आहे. भूकंप नाही, काही नाही. ही शाळा श्री. देवानंद पवार या व्यक्तीशी संबंधित आहे असे म्हणतात. यांनी सुध्दा केव्हा तरी मंत्र्यांचे सहायक म्हणून काम केले आहे असे सांगितले जाते. गोंडवाना मुक्ती मिशन अंजीअंधेरी, ता.देवळी, जिल्हा वर्धा संचालित जय भवानी प्राथमिक आश्रमशाळेची बाब आहे. स्थलांतर 10 किलोमीटरच्या आत असणे गरजेचे आहे. ही शाळा वर्धा जिल्ह्यातून यवतमाळ जिल्ह्यात गेली. स्थलांतर करताना त्याच जिल्ह्याची अट नाही. त्या ठिकाणी सुध्दा पूर नाही, भूकंप नाही, कोणतीही नैसर्गिक आपत्ती नाही. आधी मी ज्या आश्रमशाळेच्या बाबतीत उल्लेख केला त्या प्रकरणामध्ये एक महिना आधी संचालकांकडे अर्ज आला परंतु या आश्रमशाळेच्या बाबतीत स्थलांतराचा प्रस्ताव 20 एप्रिलला दिला पण संचालकांकडे 25 जानेवारीला अर्ज पोहोचला. याला काय म्हणावे ? हे सरकारच काहीच करीत नाही अशी टीका उगीचच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते करीत असतात. या ठिकाणी प्रत्यक्षात त्या संस्थेचा प्रस्ताव येण्याच्या तीन महिने आधीच संचालकांकडे अर्ज आला की ही आश्रमशाळा स्थलांतरित करावयाची आहे. यामधील सरकारची जी दूरदृष्टी आहे किंवा जो द्रष्टेपणा आहे तो दिसतो. ही आश्रमशाळा श्री. संजय मोघे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे .....

यांची आहे. ते कोण आहेत याची मला माहिती नाही. या विषयात शासनाने चौकशी केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 29 वरील बाब क्रमांक 37 बाबत बोलणार आहे. यामध्ये नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम,1936 अन्वये देय असलेल्या मुद्रांक शुक्लासाठी नुकसानभरपाई देण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. ही थकबाकी आताची आताची नसून आधीची आहे. खरे म्हणजे ही बाब अर्थसंकल्पामध्ये आणता आली असती पण ती अर्थसंकल्पात आलेली नाही. मुद्रांक शुल्क हे राज्य शासनाचे उत्पन्नाचे महत्वाचे साधन आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मी एक मुद्दा मांडला होता त्या संदर्भात चौकशी होईल असे वाटले होते पण चौकशी झाली नाही. बजेटच्या अर्धी तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये येते त्यामुळे मी सुध्दा ती मागणी पुन्हा पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये करतो.

सन 2006 च्या दरम्यान घर खरेदी, भाडेपट्टा करार इत्यादी दस्तऐवजांच्या स्कॅनिंगचे काम अभिषेक एन्टरप्रायझेस, एस.एन. कॉप्युटर्स आणि जे.के.कॉम्प्युटर्स यांना दिले. 1 कागदपत्र स्कॅन करण्याची किंमत 1 रुपया 75 पैसे होती. आता मंत्रालयात जे काम दिले आहे ते 3 रुपये 45 पैसे प्रमाणे दिले आहे. पण ते काम 1 रुपये 75 पैसे प्रमाणे दिले होते. त्यांचे कंत्राट 2007 मध्ये संपल्यानंतर सुध्दा त्यांना दरवर्षी काही ना काही वाढ मिळते. अभिषेक एन्टरप्रायझेसचे श्री. आनंद रेड्डी आहेत, एस.एन.कॉम्प्युटर्सचे श्री. सुरेश कांकरीया आहेत, जे.के.कॉम्प्युटर्सचे श्री. कौशाल पौराणा ठाण्याचे आहेत. त्यांना कोणाचा आशीर्वाद आहे हे माहीत नाही. पण मुद्रांक शुल्क वसुलीचा खर्च गेल्या वर्षी 1 हजार कोटी रुपये होता तो या अर्थसंकल्पामध्ये 2 हजार कोटी रुपये असल्याचे दिसून आले. आपण बाहेर काम दिलेले असताना 1 हजार कोटी रुपये जादा खर्च का येतो आणि या कंपन्यांवर कोण प्रेम दाखवितो याची माहिती जर महसूल खात्याकडून मिळाली तर सरकारचे जे एक हजार कोटी रुपये वाया जात आहेत ते पैसे दुष्काळासाठी मिळाले तर माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना त्यातील किमान अर्धे पैसे मिळतील. या बाबतीत सुध्दा सविस्तर माहिती पुरवणी मागण्यांवरील उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदय देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेत सहभागी होण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पान क्र.60 वरील वित्त विभागाच्या बाब क्र.56 वर मी माझे विचार मांडणार आहे. सभापती महोदय, घटनेमध्ये पुरवणी मागणी किती रकमेची असावी हे नमूद केलेले आहे. या संदर्भातील माहिती घेण्यासाठी मी सचिवांच्या कार्यालयात गेलो होतो, त्यानंतर ग्रंथालयामध्ये गेलो होतो, परंतु मला त्याबाबतची माहिती मिळू शकली नाही. परंतु मी या संदर्भातील माहिती वाचलेली आहे. सन्माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे साहेबांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. या सभागृहात पुरवणी मागणी सादर केली जाते ती मागणी मूळ मागणीच्या किंवा बजेटमध्ये नमूद केलेल्या तरतुदीपेक्षा अधिक रकमेची असू नये असे कायद्याचे बंधन आहे. हे घटनेत नमूद केलेले आहे. एवढेच नव्हे तर या राज्याच्या अर्थ खात्याकडून ज्या बाबीसाठी पुरवणी मागणी केली होती त्याच बाबीसाठी पुन्हा पुरवणी मागणी केली जाते, किंबहुना त्यापेक्षा अधिक रकमेचा विक्रम हे राज्य शासन आणि अर्थ खाते करीत आहे. हे राज्य शासन म्हणजे या शासनामधील 5-6 जणांची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे काय ? बजेटमध्ये तरतूद करुन राज्य शासन चालविले जाते. सन्माननीय उद्योग मंत्री श्री.राणे साहेबांना अर्थ खात्याकडून किती सहकार्य मिळते त्याचे दु:ख मला माहीत आहे. प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सारखे अर्थ खाते चालविण्याचे काम होत असेल तर हे सभागृह पुरवणी मागण्यांना मान्यता देणार नाही. पुरवणी मागण्या सादर करीत असताना घटनेच्या चौकटीत राहून त्या केल्या पाहिजेत. परंतु शासनाकडून घटनेचे सातत्याने उल्लंघन केले जात आहे. सन्माननीय उद्योग मंत्री हे राज्याचे ज्येष्ठ मंत्री आहेत. (अडथळा) त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्ष नेते म्हणून सक्षमपणे काम केलेले आहे. ते 1990 साली पहिल्यांदा विधानसभेत निवडून आले होते त्यावेळी ते अतिशय अभ्यास करुन भाषण करीत असल्याचे मी पाहिलेले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, सिंचन क्षमतेचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता. त्यावेळी सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. यापूर्वीच्या काळात पाटबंधारे विभागामार्फत 1-1 हजार कोटी किंवा 2-2 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या जात होत्या. म्हणून सन्माननीय मंत्री श्री.राणे साहेब यांनी मला मार्गदर्शन करावे असे मी म्हणत आहे. (अडथळा) मी वित्त विभागाच्या बाब क्र.56 वरच बोलत आहे. या वेळी जलसंपदा विभागासाठी केवळ 16 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे खजिनदार आहेत. तुमच्याकडे कशा प्रकारे चेक आले त्याबाबत मला बोलण्यास भाग पाडू नये. पार्टीच्या खात्यामध्ये चेक कशा प्रकारे आले त्यावरही मी बोलणार आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांचे उद्योग सबंध महाराष्ट्राला माहीत आहेत. विशेषत: या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना माहीत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी माझ्या उद्योगाबाबत बोलू नये. माझे दोनच उद्योग आहेत. माझ्या उद्योगांचा उल्लेख केला तर...

श्री.राम पंडागळे : सन्माननीय सदस्यांनी पक्षाचा उल्लेख करुन बोलू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : मी कोणत्याही पक्षाचा उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांना पक्षाबाबत एवढा पुळका असेल तर मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करीन की, उद्या कोणत्या सदस्यांचे किती उद्योग आहेत त्यावर चर्चा ठेवावी. माझे आव्हान आहे. मी माझ्या उद्योगात प्रामाणिकपणे पैसे कमविलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

मी स्वत:च्या हिमतीवर उद्योग सुरु केले आहेत. मी युतीच्या शासनाच्या वेळी माननीय मंत्री महोदयांकडे कामासाठी येत होतो. मी त्यावेळी लहान होतो. तत्कालीन मंत्री महोदय श्री. रामदास कदम यांनी आम्हाला बंदर दिले होते. या सभागृहामध्ये बोलण्याचा माझा अधिकार आहे. कोणत्याही मंत्री महोदयांकडे मी खोटे काम घेऊन गेलो नाही. परवा मी माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब यांच्याकडे गेलो होतो. मी कोणते बेकायदेशीर उद्योग करीत नाही.

सभापती महोदय, मला या निमित्ताने एवढेच विचारावयाचे आहे की, हे राज्य शासन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे काय ? ठराविक खात्यासाठीच निधीची तरतूद केली जाते. ठराविक लोकांच्या कामासाठीच निधीची तरतूद केली जाते. असे प्रकार थांबायला पाहिजेत. मंत्रिमंडळामध्ये घेतलेल्या निर्णयांच्या बातम्या आम्ही वृत्तपत्रातून वाचतो. घटनेनुसार ज्या गोष्टी करणे बंधनकारक आहेत त्या न करता घटना पायदळी तुडविली जात आहे. ज्या तरतुदी घटनेनुसार, कायद्यानुसार करताच येत नाहीत त्या केल्या जात आहेत आणि ही अतिशय गंभीर अशी बाब आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 102 वरील बाब क्रमांक 98 विषयी मी बोलत असताना मी सांगू इच्छितो की, हे वर्ष आपण स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात साकार केली. जेव्हा जिल्हा परिषदांची स्थापना झाली त्यावेळी मोठ्या ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याचे ठरले होते. ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न आणि लोकसंख्या नगरपालिकेपेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतीचे विभाजन केले गेले पाहिजे. परंतु ज्या ग्रामपंचायती विभाजनाच्या निकषात बसत नाहीत अशा ग्रामपंचायतींचे विभाजन केलेले आहे आणि ज्या ग्रामपंचायती विभाजनाच्या निकषात बसतात त्या ग्रामपंचायतींचे मात्र विभाजन केलेले नाही. थळ ग्रामपंचायतीचे 10 कोटीचे बजेट आहे. अलिबाग नगरपालिकेचे बजेट 1 कोटी 65 लाखाचे आहे. अलिबाग आणि मालवण नगरपालिकेचे प्रश्न सारखे आहेत. जी गावे पुनर्वसनाखाली येतात त्या गावांचे विभाजन केले गेले पाहिजे असा कायदा आहे. परंतु या कायद्याची पायमल्ली होत आहे. या बाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना अनेक वेळा भेटलो. परंतु काही कार्यवाही झालेली नाही. आता प्रत्येक गोष्टीसाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

आम्ही न्यायालयाचे दरवाजे ठोठवायचे काय ? सभापती महोदय, हे काय चालले आहे. याचा कोठे तरी सोक्षमोक्ष लागला पाहिजे. म्हणून राज्य शासन ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे का असा प्रश्न मला पडलेला आहे. याबाबतीत मला मंत्री महोदयांकडून समर्पक उत्तराची अपेक्षा आहे.

...नंतर श्री. अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

बाब क्रमांक 30, पृष्ठ क्रमांक 36, महसूल विभाग - राज्यातील बंदरे सुशोभित आणि चांगली व्हावीत यासाठी बंदरे विभाग सुरु करण्यात आला. बंदराच्या संदर्भात करार करणारी मी पहिली व्यक्ती आहे. करारनामा कसा करायचा हे बंदर विभागाला माहीत नव्हते. करारनामा करताना दहा वेळा त्या विभागाकडे गेलो तरीही त्यामध्ये चुका करण्यात आल्या, त्या मी आज भोगत आहे. मंत्रिमंडळाचे बंदर खात्याकडे जागा देण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु महसूल विभागाने त्या फाईलवर अजून सही केलेली नाही. महसूल विभाग सही का करीत नाही हे मला समजत नाही. फाईलवर शेवटची सही मला करता आली पाहिजे यासाठी महसूल विभाग आपला अधिकार सोडण्यास तयार नाही याच कारणासाठी ते सही करीत नाही. तेव्हा याचा विचार कुठेतरी झाला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, 1999 मध्ये माननीय श्री.नारायण राणे यांच्याकडे बंदरे विभागाचा कार्यभार असताना त्यांनी मला बंदर मंजूर केले होते. (अडथळा) माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, ही कोकणातील भाषा आहे आणि त्यांना ती चांगली कळते. आपण किंवा डॉ.पंतगराव कदम बोलत असताना आम्ही आपल्या भाषणामध्ये अडथळा आणतो काय ? आपण कोणत्या भाषेमध्ये बोलता असे आम्ही आपणास विचारतो काय ? माझ्या भाषेबद्दल माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेबांनी आक्षेप घ्यावा.

सभापती महोदय, सन 1999 मध्ये मला 25 वर्षासाठी बी.ओ.टी.तत्त्वावर बंदर मंजूर करण्यात आले होते. परंतु आज 13 वर्षे झाली तरी अजून आम्हाला ती जागा मिळालेली नाही. हेच शासनाचे धोरण आहे काय ? माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी बंदरे विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी कामास गती दिलेली आहे. माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना आमचा समुद्र कळत नव्हता म्हणून त्यांच्याकडील ते खाते काढून श्री.नारायण राणे यांचेकडे दिले. तेव्हा माझ्या प्रश्नाचे उत्तर माननीय महसूल मंत्री महोदयांकडून मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, बंदरांसंबंधी शासनाचे जे धोरण आहे त्यामुळे कोकणाचा विकास होऊ शकतो. आयात-निर्यात धोरणामुळे स्थानिकांना रोजगार मिळू शकतो. तेव्हा शासनाचा एक विभाग जी अडवणूक करीत आहे ती थांबविली पाहिजे अशी मी आपणास विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

बाब क्रमांक 61, पृष्ठ क्रमांक 84 -सार्वजनिक बांधकाम विभाग- सभापती महोदय, कोकणात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. दुर्दैवाने या वर्षी कमी पाऊस झाला आहे. कोकणातील रस्त्यांचे चौपदरीकरण होत आहे. परंतु या रस्त्यांच्या देखभालीसाठी असलेली तरतूद अपुरी आहे असे मला वाटते. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री उत्तर देताना सांगतात की, आमच्या विभागासाठी तरतूद नाही तर मग आम्ही कोठून पैसे आणणार ? कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्यामुळे तेथील रस्त्यांवर खड्डे पडत आहेत. गणपती सणाच्या कालावधीत कोकणातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले असतात. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची फार गैरसोय होते. तेव्हा रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी वाढविण्यात यावा अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 160, पृष्ठ 61 पाणी पुरवठा विभाग - मागील 20 वर्षापासून अलिबाग नगरपालिकेची पाणी पुरवठा योजना बंद आहे. या संदर्भात मी पाणी पुरवठा मंत्री महोदयांना अनेक वेळा भेटून त्यांच्याकडे बैठक घेण्याची मागणी केली.

यानंतर श्री.गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

अलिबाग नगरपालिकेची पाणी पुरवठा योजनेसाठी टाक्या बांधून तयार आहेत. त्या योजनेच्या पाईप लाईन्स देखील टाकण्यात आलेल्या आहेत. परंतु पाईप लाईन्स कशा पध्दतीने टाकण्यात आल्या आहेत या बाबतचे रेकॉर्ड नगरपालिकेला मिळत नाही. माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी मागील अधिवेशनात सांगितले की, येत्या काही दिवसात या बाबतीत बैठक घेऊ. परंतु अजूनपर्यंत पाणी पुरवठा मंत्र्यांना बैठक घेण्यासाठी वेळ मिळत नाही ही एक दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, अलिबाग हे पर्यटन शहर झालेले आहे. तेथील पाणी पुरवठयाचे काम पूर्ण झालेले आहे. अलिबाग शहराला पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा सुरुळीतपणे होण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठा विभाग बैठक कधी घेणार एवढेच मला माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांकडून आश्वासन मिळावे अशी अपेक्षा करतो आणि पुरवणी मागण्यांवरील माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, मी चार अत्यंत महत्वाच्या बाबीवर बोलणार आहे.

सभापती महोदय, मी उद्योग विभागापासून बोलण्यास सुरुवात करीत आहे. उद्योग विभागाने नवीन आदेश काढलेला आहे. जे उद्योजक आहेत, त्या उद्योजकांनी 20 टक्के बांधकाम करणे आवश्यक आहे. माझी माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांना विनंती आहे की, ज्या उद्योजकांनी अगोदरच परवानगी घेतलेली आहे, ज्यांनी प्रकल्प सादर केलेले आहेत, त्यांना या आदेशामुळे त्यात तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात. या संदर्भात पूर्वी 10 टक्के बांधकामाचा निर्णय होता. त्या प्रमाणे बऱ्याच उद्योजकांनी 10 टक्के बांधकाम करण्यासाठी परवानगी घेतली, प्रकल्प सादर केले आहेत, आता उद्योजकांनी 20 टक्के बांधकाम करावे अशा प्रकारचा नवीन आदेश उद्योग विभागाने काढलेला आहे. त्यामुळे उद्योजकांसमोर अडचण निर्माण झालेली आहे. ज्या उद्योजकांनी 10 टक्के बांधकामाची परवानगी घेतलेली आहे, त्यांच्यासाठी किमांन पूर्वीची सवलत तशीच्या तशी द्यावी, अशा प्रकारची माझी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, वने व पुनर्वसनाची बाब क्रमांक 23, बाब क्रमांक 22 च्या अनुषंगाने मी माझे मत व्यक्त करीत आहे. या ठिकाणी वने मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब उपस्थित आहेत. डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे पाहिल्यानंतर महाराष्ट्रातील जनता असे समजून चालते की, "चांद निकला हैं." औरंगाबाद विमानतळाचे विस्तारीकरणाचे काम झाले. शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात आल्या. जमीन भूसंपादित करण्याची एक प्रक्रिया सिडकोने केली आणि दुसरी भूसंपदानाची प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाने केली. औरंगाबाद विमानतळ विस्तारीकरणासाठी सिडकोने ज्या जमिनी भूसंपादित केल्या होत्या, त्या सर्व शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित भूखंड दिले गेले. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने जमिनी संपादित करुन 20 वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा औरंगाबाद येथील चिखलठाणा, मुकुंदवाडी, मुर्तजापूर येथील शेतकऱ्यांना साडेबारा टक्क्यांचे विकसित भूखंड आजपर्यंत मिळालेले नाहीत.

महोदय, औरंगाबाद विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात आल्या आहेत. एका शेतकऱ्याला त्यांच्या भूखंडाचा मावेजा मिळतो आणि दुसऱ्या शेतकऱ्याला मात्र मावेजा मिळत नाही.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

याबाबतीत राज्य शासनाचे जे धोरण आहे ते धोरण अतिशय विसंगत आहे. निर्णय विसंगत आहेत. पुनर्वसन खात्याचे मंत्री माननीय डॉ. कदम याबाबतीत लक्ष घालतील असा मला विश्वास आहे. गेली 20 वर्षे या भागातील शेतकरी मदतीची वाट पहात आहेत. शासनाला अनेकदा निवेदने दिली. सूचना केलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी उपोषणाची नोटीसही दिली. शेवटी विमान रोखण्याचा इशारा दिला. विमान रोखण्याचा संकल्प करुन सुध्दा शेतकऱ्यांना जर भूसंपादनाचे पैसे मिळत नसतील आणि 12.50 टक्के जमिनीचा हिस्सा शेतकऱ्यांना मिळत नसेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. या गंभीर बाबीचा विचार शासनाने अतिशय गांभीर्याने करावा अशी मी आग्रहाची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 63, पृष्ठ क्रमांक 56 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. बीड शहरातून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. त्यापैकी एक औरंगाबाद-सोलापूर आणि दुसरा नगर-नांदेड-हैद्राबाद. या महामार्गावरुन मोठमोठी जड वाहने व रोज बीड शहराहून ये-जा करीत असतात. 16/16, 18/18 टायरची असंख्य वाहने बीड शहरातून जात असल्यामुळे गेल्या 4-5 वर्षात अनेक लोक या महामार्गावर झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेले आहेत.बीड शहरातील लोकांची मागणी आहे. बीड शहराच्या बाहेरुन वळणाचा रस्ता आहे. रिंगरोड आहे हा रिंगरोड ताबडतोब करण्याची गरज आहे. बीड शहरातून बीड-औरंगाबाद चौपदरी रस्ता होणार आहे. मान्यता दिलेली आहे. या खात्याचे श्री. भुजबळ साहेब हे मंत्री आहेत. 25 वर्षापूर्वीची त्यांची कार्यतत्परता आजही त्यांच्या कार्यशैली आम्हांला पहायला मिळत आहे. बीड शहरातील रिंगरोड ताबडतोब करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. बीड शहरात उड्डाणपूल करण्याचा संकल्प सोडलेला आहे त्याला तिलांजली द्या. माननीय उद्योगमंत्री श्री. राणेसाहेब यांच्या कानावर ही बाब घालण्यात आलेली आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या उपस्थितीत छत्रपतींच्या पुतळयाचे भूमिपूजन झाले होते. त्यावेळी स्वर्गीय चव्हाण साहेब म्हणाले होते की, इतका सुंदर, सुबक, रेखीव आणि आखीव पुतळा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सापडणे अशक्य आहे. कै.चव्हाण साहेबांची इच्छा होती. या चौकात उड्डाणपूल करु नये. त्याची दोन कारणे आहेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

सभापती महोदय, उड्डाणपूल केल्यामुळे छत्रपती चौकाचे जे सौंदर्य आहे ते अबाधित राहणार नाही.याबाबतीत बीड शहरातील जनतेच्या भावना आहेत. बीड शहरातील जनतेची इच्छा आणि आकांक्षा आहे. लोकांच्या भावना अतिशय प्रक्षुब्ध आहेत. या भावनेतून लोक रस्त्यावर आले आणि काही अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्व जबाबदारी शासनाची राहणार आहे. शासनाने उड्डाणपूल करण्याचा दुराग्रह धरलेला आहे तो मनातून काढून टाकावा. हा अतिशय गंभीर विषय आहे. हसण्यावारी नेण्याचा विषय नाही. उड्डाणपुलाचे आणि छत्रपती चौकाचे गांभीर्य माननीय सदस्यांच्या लक्षात यायला तयार नाही.

नंतर श्री. खर्चे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

दुर्दैवाने हा निर्णय घेतला हजारो कार्यकर्ते व शिवप्रेमी रस्त्यावर उतरण्याची शक्यता आहे....अडथळा....."बहु जनांचा आधारु, अखंड स्थितीचा निर्धारु, निश्चयाचा महामेरु, श्रीमंत योगी" अशा या श्रीमंत योगीच्या चौकाचे सुशोभीकरण विद्रूप करण्याचा निर्णय शासनाने घेतला तर आम्हाला हाती निखारा घ्यावा लागेल आणि त्यावेळेस आम्ही कोणत्याही दु:ष्परिणामांची चिंता करणार नाही. माझी विनंती आहे की, माननीय मंत्री श्री. भुजबळ साहेबांनी बीड शहराच्या बाहेरुन रिंग रोड केला तर उड्डाण पुलाचे संकट दूर होईल.

बाब क्र. 38, पृ.क्र. 35, कृषी विभागाच्या संदर्भात मला नम्रपणे अशी सूचना करावयाची आहे की, शासनाने ज्या भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे त्या त्या ठिकाणी 5 कोटी लिटर क्षमता असणारी शेत तळी घेतली तर 1 हजार लोकवस्ती असलेल्या गावांना वर्षभर त्यातील पाणी पुरु शकेल. तसेच हा निर्णय घेतल्यास टँकरवर जो करोडो रुपयांचा खर्च होतो तो देखील वाचू शकेल. माझी विनंती आहे की, प्रायोगिक तत्वावर असा निर्णय शासनाने घेतला ज्या गावांना दरवर्षी टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो त्याची गरज भासणार नाही. तसेच पाण्यासाठी वणवण भटकणारी जनता ढोबळे साहेबांना देखील दुवा देईल आणि दूरदर्शनच्या माध्यमातून आपल्यावर होणारी टीका सुध्दा यापुढे होणार नाही, म्हणून या गोष्टीचा गंभीरपणे विचार करुन लोकांच्या तहानलेल्या जीवांना समाधान द्यावे एवढीच आग्रहाची विनंती करतो. तसेच पुन्हा एकदा मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांना विनंती करतो की, बीड शहरातील रिंग रोडचा प्रस्ताव मान्य करुन तातडीने हा रिंग रोड घ्यावा व आपण स्वत: याकडे लक्ष द्यावे आणि सभागृहातच यासंबंधीची घोषणा केली तर मी आपला आभारी राहीन. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पुरवणी मागण्यांबाबत विचार केला तर एकूण 4606 कोटीच्या या पुरवणी मागण्या आहेत. तसेच त्यांचे विश्लेषण केले तर त्यात भांडवली खर्च फक्त 7 टक्के इतका असून महसुली खर्च 93 टक्के एवढा आहे. याचा अर्थ महसुली खर्चासाठीच हा पुरवणी अर्थसंकल्प आणला हे या आकडेवारीवरुन दिसून येते. यातील भारित खर्चाचे प्रमाण फक्त 3 टक्के आहे तर दत्तमत खर्चाचे प्रमाण मात्र 97 टक्के म्हणजेच 4470 कोटी रु. एवढे हे प्रमाण आहे. या एकूण 4606 कोटीमध्ये दुष्काळासाठी फक्त 50 कोटी रु. दिलेले आहेत. या निधीत वाढ करण्याची गरज आहे.

कृषी विभागाच्याच बाब क्र. 30, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी 50 कोटी आणि 40 कोटीची रक्कम चाऱ्यासाठी दिली आहे. पुन्हा फलोद्यानसाठी 10 कोटीची तरतूद केली आहे. अशा 50 कोटी रुपयात दुष्काळग्रस्तांना किती दिलासा मिळणार हा खरा प्रश्न आहे. याचे कारण पावसाअभावी अजूनही राज्यातील अनेक भागात पेरण्या झालेल्या नाहीत. तसेच जुलै महिना संपत आला असून दुबार पेरणीचे संकट देखील शेतकऱ्यांच्या डोक्यावर आहेच. त्यादृष्टीने हा निधी वाढविता आला तर शासनाने तो वाढविण्याचा प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो.

बाब क्र. 31, कृषी विभाग - या मागणीनुसार कापूस आणि सोयाबीन पिकाच्या नुकसानीसाठी शासनाने 400 कोटीची तरतूद केली आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव असे राज्य आहे की, ज्या राज्याने कापूस आणि सोयाबीन या पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी 4 हजार रुपये प्रमाणे मदत करण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

ही रक्कम वाढवून देण्याची आवश्यकता आहे. जळगाव जिल्यामध्ये कापसाचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. या ठिकाणच्या अनेक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना यासंदर्भातील निधी मिळालेला नसल्यामुळे या मुद्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, सभागृहात उद्योगमंत्री माननीय राणे साहेब उपस्थित असून मी त्यांना सांगू इच्छितो की, उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 91 ते 97 मध्ये सबसिडीच्या संदर्भात काहीही मागणी करण्यात आलेली नाही. उद्योगाच्या संदर्भात आपण नवीन धोरण आणणार आहात. या शासनाने टेक्सटाईल पॉलिसी आणलेली आहे. या शासनाने 12.5 टक्क्याची सबसिडी, 20 टक्क्याची भांडवली सबसिडी आणलेली आहे परंतु उद्योगाचे धोरण अद्यापही जाहीर झालेले नाही.

सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय उद्योग मंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, उद्योगाचे धोरण अगोदरच जाहीर झाले असते तर या पुरवणी मागण्यांमध्ये उद्योग खात्याची मागणी आली असती. पुरवणी मागण्यांमध्ये उद्योगाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे माननीय उद्योगमंत्र्यांनी उद्योगाच्या संदर्भातील औद्योगिक धोरण जाहीर करुन त्याचा समावेश डिसेंबरच्या पुरवणी मागण्यांमध्ये केला जावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, गृह खात्याच्या फॉरेन्सीक लॅबरोटरीच्या संदर्भात 6.85 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. आपल्या राज्यात फॉरेन्सीक लॅब केवळ मुंबई आणि नागपूर येथेच आहेत. या फॉरेन्सीक लॅब औरंगाबाद तसेच इतर मोठया शहरात सुरु करता आल्या तर त्याचा चांगला उपयोग जनतेला होऊ शकेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 69 मध्ये प्रशासकीय इमारतींसाठी 425.50 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. मी चोपडा येथे राहतो. या ठिकाणच्या तहसिल कार्यालयाच्या बांधकामासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे परंतु त्याच्या बांधकामास अद्यापही सुरुवात झालेली नाही. त्यामुळे चोपडा येथील तहसिल कार्यालयाच्या बांधकामास त्वरित सुरुवात करण्यात यावी ही विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, बाब क्रमांक 77 मध्ये मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलच्या बांधकामासाठी 10.71 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. जळगाव सिव्हील हॉस्पिटलमध्ये अनेक वर्षापासून सिटी स्कॅन मशीन बंद पडलेले आहे. जळगाव जिल्हा मोठा जिल्हा असल्यामुळे जळगाव जिल्हयासाठी नवीन सिटी स्कॅन मशीन तसेच एमआरआय मशीन उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 15 मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त अभियानासाठी 29 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तंटा मुक्ती अभियान यशस्वी करण्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव व्हावे यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 28 वरील 296 पदाच्या निर्मितीच्या संदर्भातील हा विषय आहे. या विषयाच्या संदर्भात मी आज सकाळी आदरणीय महसूल मंत्र्यांना एक पत्रही पाठविलेले आहे. त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात माननीय महसूल मंत्र्यांनी माहिती द्यावी एवढीच विनंती आहे. हा विषय तसा जुनाच आहे.

सभापती महोदय, लातूर जिल्हयातील ता. अहमदपूर येथील मध्यवर्ती बँकेत विम्याचा घोटाळा झाला होता. याविषयाच्या संदर्भात मी गेल्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना दिली होती. बँकेतील कर्मचाऱ्यांनी जो विमा घोटाळा केलेला आहे तो मी सहकार विभागात मांडणार आहे. या ठिक्राणच्या बँकेतील कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या नावावर, पत्नीच्या नावावर, कुटुंबाच्या नावावर नसलेल्या जमिनी दाखवून विम्याची खोटी रक्कम घेतली त्यासंदर्भातील हे प्रकरण आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हा विषय श्री.एम.एच.क्षीरसागर या तलाठ्याशी संबंधित आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, आपण खाता तर मग मी का खायचे नाही ? हा विषय किती गंभीर आहे हे आपण पहावे. ते अहमदपूर,जिल्हा लातूर येथे तलाठी म्हणून कार्यरत होते. अंधोली या गावी त्यांचे स्वत:चे निवासस्थान आहे. या गावात आपली दुप्पट जमीन आहे असे दाखवून तिकडचा तलाठी म्हणून त्यांनी सही व शिक्के मारले व विम्याचे पैसे घेतले. याबाबत त्यांची तक्रार करण्यात आली. त्यामुळे त्याच्या खात्यामधील विम्याची दोन लाख रक्कम ठेवण्यात आली आहे. ती त्यांना दिलेली नाही. शासनाचा एक तलाठी एक शेतकरी म्हणून खोटी सही व शिक्के वापरतो. 108 शेतकऱ्यांचा विषय मी सहकार विभागाच्या मागण्यांवर बोलताना मांडणार आहे. अशा तलाठ्याचे निलंबन करायचे, चौकशी करायची, कारवाई करायची हे तर राहिले बाजूला पण त्या तलाठ्याला शासनाने बढती दिली आहे म्हणूनच मी हा विषय येथे मांडला आहे. पदनिर्मिती करीत असताना शासन अशा महाभागांवर कोणती कारवाई करणार आहे ? या तलाठ्याने एक गँग पोसली आहे. हा तलाठी कसा आहे हे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना देखील माहिती आहे. या तलाठ्याच्या विरोधात तक्रार केल्यानंतर तो संबंधितांना धमकावतो. या प्रकरणाची चौकशी झालेली आहे. सर्व पर्दाफाश झालेला आहे. या संबंधातील सर्व कागदपत्रे मी माननीय मंत्री महोदयांना सकाळीच दिलेली आहेत. या संबंधातील सगळी माहिती आपल्याला संध्याकाळ पर्यंत आपल्या सचिवाने दिली पाहिजे व कारवाईचीच घोषणा झाली पाहिजे तरच या चर्चेला अर्थ राहील. तलाठी श्री.एम.एच.क्षीरसागर यांनी आपल्या अधिकारामध्ये बेकायदेशीररित्या सही व शिक्के मारून स्वत:च्या नावावर बेकायदेशीर जमीन दाखविली आहे व त्याद्वारे त्यांनी लातूरच्या बँकेतून अनुदान लाटण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा त्यांच्या विरूद्ध ताबडतोब कारवाई झाली पाहिजे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी एक महत्त्वाचा विषय येथे मांडला आहे. हा बाब क्रमांक 31चा विषय आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या कापूस, सोयाबीन आणि भात यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता तरतुदीचा विषय आहे. सदर चर्चा नागपूर अधिवेशनामध्ये झाली होती. नागपूरला शेवटच्या दिवशी 2000 रूपयांचे पॅकेज जाहीर केले होते. आम्ही अभिमानाने सांगितले की, या देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे की, त्याने शेतकऱ्यांना मदत जाहीर केली. पण हे अनुदान शेतकऱ्यांना मिळालेच नाही. त्यामुळे मागच्या अधिवेशनामध्ये यावर चर्चा झाली. त्यावेळी मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आम्हाला आश्वस्त केले की, कोणत्याही परिस्थितीत एप्रिल अखेरपर्यंत हे सर्व पैसे शेतकऱ्यांना दिले जातील. हे उत्तर सभागृहाच्या पटलावर आहे. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी म्हणाले की, अजूनही शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. उलट अनुदानाचे हे पैसे वाढविले पाहिजेत. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या कापूस, सोयाबीन आणि भात यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता 400 कोटी रूपयांची मागणी करण्यात आली आहे. कापूस, सोयाबिन आणि भात यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना डिसेंबर 2011 मध्ये 2000 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. पैकी 1585 कोटी 77200 एवढ्या रक्कमेची तरतूद आपण मार्च 2012 च्या अधिवेशनात केली. मग उर्वरित तरतूद अर्थसंकल्पामध्ये का झाली नाही ? उर्वरित रक्कम पुरवणी मागणीत का आली आहे, हे मला समजले नाही. शेतकऱ्यांचे पैसे त्यांना दिले गेले नाहीत. ती तरतूद पुरवणी मागणीमध्ये आली आहे. सदर पैसे एप्रिल अखेरपर्यंत दिले नसतील तर ते का दिले गेले नाही, हे मी येथे जाणून घेण्यास उत्सुक आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांच्या भागामध्ये पैसे मिळाले नाहीत. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांची आपण साक्ष काढली, मी आपल्याला मानतो.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 29 मध्ये "मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे व्यवस्थापक,छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे व सर्वसाधारण मुद्रांक कार्यालय, मुंबई या कार्यालयांच्या वेतन, भत्ते प्रवास खर्च, भाडे, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क,जाहिरात व प्रसिध्दी, कार्यालयीन खर्च, पुरवठा व मुद्रांकाची वाहतूक इत्यादीकरिता रुपये 50 कोटींची तरतूद मागितली आहे. सुदैवाने तत्कालीन महसूल मंत्री माननीय श्री. नारायण राणे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्या ठिकाणी बेनामी कर्मचारी कसे बसतात हे सांगितल्यानंतर आपण त्या बाबत कारवाई करतो असा शब्द दिल्यानंतर एक महिन्यात कारवाई देखील केली. त्यानंतर, नारायणराव आपल्याकडील खाते गेले व त्या ठिकाणी नवीन महसूल मंत्री आल्यानंतर पुन्हा सर्व कर्मचारी त्या ठिकाणी आले. पुन्हा त्याच ठिकाणी टेबल टाकून बसले. जे कर्मचारी नाहीत असे सर्व लोक तेथील दस्त ऐवज कसे हाताळीत असतात हेच मला समजत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी एकदा कारवाई केल्यानंतर त्या बाबत पाठपुरावा करुन ती कायम करण्याऐवजी मुंबईतील कार्यालयामध्ये जैसे थे परिस्थिती आहे. त्या पेक्षा देखील एक गंभीर बाब मी आपल्या निदर्शनास आणणार आहोत. इतकेच नव्हे तर त्या बाबीवर आम्ही मतदानाची मागणी करणार आहोत. पैसे मागण्याचा आपल्याला अधिकार नाही असा माझा दावा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सरिता-3 नावाने ई-टेंडरींग पध्दत आपण सुरु केली. सरिता-3 ई-टेंडरींग अंतर्गत मॉनिटर, स्कॅनर, अंगठयाचा ठसा घेणारे मशिन, डिस्प्ले करणारे स्क्रीन, बॅकअप बॅटरी ही सामग्री आहे. यामध्ये मुंबईत किंवा मुंबईच्या उपनगरात कधीही वीज जात नसतांना बॅकअप बॅटरी घेणे हा एक मोठा विनोद आहे. ग्रामीण भागामध्ये वीज जाते. त्या ठिकाणी आपण बॅकअप बॅटरीसाठी खर्च केला तर समजू शकतो. आज या गोष्टीला दीड वर्ष होऊन देखील ही सामुग्री जशीच्या तशी पडून आहे. मुंबईमध्ये दोन आठवडयापूर्वी गुरुवारी 12 तारखेला शेड क्रमांक 3 मध्ये ही सिस्टीम सुरु झाली. ती सुरु झाल्यानंतर नोंदणीकरिता फक्त सहा दस्तऐवज आले होते. बाकीचे दस्तऐवज आले की नाहीत हे तेथील कर्मचाऱ्यांना माहीत नाही. त्या दस्तऐवजाची नोंदणी कशी करावयाची याची देखील त्या कर्मचाऱ्यांना माहिती नाही. आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले नाही म्हणून दीड वर्षापासून ही सामुग्री पडून आहे. या सामुग्रीकरिता आपण पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावयाची, अर्थसंकल्पामध्ये बाब समाविष्ट करावयाची आणि एखादी गोष्ट झाली नाही तर आम्ही अर्थ खात्यावर टीका करावयाची. त्या ठिकाणी बसविण्यात आलेली मशिनरी जर आपल्याला वापरता येत नसेल तर आपण त्याचे उत्तर काय देणार आहात हा माझ्यासमोर प्रश्न आहे?

सभापती महोदय, मुंबईमध्ये अंधेरीला भाडयाच्या जागा घेण्यात आल्या आहेत. गेल्या सहा-सात महिन्यापासून वापराविना पडून असलेल्या त्या भाडयाच्या जागांचे आपण भाडे देत आहोत. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या काळात त्या जागा भाडयाने घेतल्या असाव्यात. आज त्या ठिकाणी दोन-तीन टेबले टाकली आहेत. आपल्या खात्याचा मंत्री बदलला तर त्याची संकल्पना बदलते काय? हे मला समजत नाही. दुसऱ्या बाजूला आपण भाडयाच्या जागेचे भाडे देण्याकरिता पुरवणी मागणीमध्ये तरतूद करीत आहात. तर मग असा प्रश्न निर्माण होतो की, त्या जागा वापराविना ठेवल्यामुळे लोकांची गैरसोय होत असेल तर प्रवास भत्ता, भाडे, दूरध्वनी, वीज, पाणी इत्यादींच्या शुल्कावर झालेल्या खर्चाची जबाबदारी कोण स्वीकारणार आहे, अशाप्रकारचा प्रश्न यामध्ये निर्माण झाला आहे? सभापती महोदय, या अधिकाऱ्यांचा हट्टीपणा, त्यांची दुसरीकडे कुठेही बदली होत नाही, अशाप्रकारे तेथील सर्व अधिकाऱ्यांचे रॅकेट आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

एका बदलीसाठी 50 हजाराचा दर आहे असे मी ऐकतो. मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदय, ही बाब तुमच्यापर्यंत आलेली दिसत नाही. हे सगळे खूर्चीतील ढेकूण आहेत. मी हे जबाबदारीने बोलतो. महसूल विभागातील सहायक श्री.दिलीप पाटील, दुय्यम निबंधक कार्यालय अंधेरी याठिकाणी ते आठ वर्षे काम करीत आहेत. पण त्यांची बदली करण्याची कोणाची हिंमत होत नाही.

सभापती महोदय, दुय्यम निबंधक श्री.धांदले, ते तिथल्यातिथे कशा आट्यापाट्या खेळतात ते पहा. बोरीवली तालुक्यामध्ये नेमणूक, त्यानंतर अंधेरी येथे नेमणूक, त्यानंतर कालावधी पूर्ण होताच परत बोरीवली येथील कार्यालयामध्ये त्यांची नेमणूक करण्यात आली म्हणजे अंधेरी-बोरीवली या उपनगरामध्ये त्यांचे सगळे सेटींग सुरु राहिले पाहिजे.त्यांना मुंबईच्या बाहेर देखील पाठवत नाहीत आणि हे सगळे का सुरु आहे? तर तेथील दररोजचे उत्पन्न कमीतकमी एक ते दीड लाखापर्यंत आहे. हे शासनाकडून मिळालेले नाही, ते वेगळे आहे. आता एस.आर.ए.मुळे नवीन टॉवर उभे रहात आहेत. नवीन इमारती बांधल्या जात आहेत. अशा प्रकारे उपनगरामध्ये प्रचंड प्रमाणात विकास होत आहे. तेथे मोठ्या प्रमाणात नोंदणी होत असल्यामुळे त्या जागा सोडावयाच्या नाहीत.

सभापती महोदय, दुय्यम निबंधक श्री.पिंपळे प्रथम मुंबई शहरामध्ये उपनगर जिल्ह्यामध्ये नोंदणी कार्यालयामध्ये त्यानंतर उप महानिरीक्षक कार्यालयामध्ये दुय्यम निबंधक म्हणून काम केले. तेथे तीन वर्षे पूर्ण झाल्यावर संबंधितांची बदली बोरीवली यो करण्यात आली. त्यानंतर बोरीवली येथून मुंबई झोनमध्ये बदली करण्यात आली. मला असे विचारावयाचे आहे की, आपण यांना उप नगरामध्ये का पाठवित नाही? अशा प्रकारे तेथे अधिकाऱ्यांचे सगळे रॅकेट आहे. तसेच आणखी एक नाट्य घडलेले आहे आणि त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक श्री.तरे हे जिल्हाधिकारी मुद्रांक येथे आहेत. मुंबई शहर कार्यालयासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील कुर्ला तालुक्यात मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात नेमणूक करण्यात आली. तेथे स्टींग ऑपरेशन झाल्यानंतर प्रकरण सिध्द झाले. त्यानंतर हे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले. मग त्यांनी राजीनामा दिला म्हणजे व्हॉलेंटरी रिटायरमेंट घेतली. त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर त्यांना घरी पाठवावयास हवे होते. त्यांच्या बाबतीत चेंबूर येथे स्टींग ऑपरेशन झाल्यानंतर सुध्दा स्वेच्छानिवृत्ती घेतलेले व्यक्तिमत्व परत येते. त्यांचा राजीनामा परत घ्यावयास ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लावला जातो आणि त्यांना पुन्हा एकदा नेमणूक दिली जाते आणि त्यांना पुन्हा चेंबूर येथील कार्यालया मध्येच काम करण्यास सांगण्यात येते. याठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणेसाहेब उपस्थित आहेत आणि त्यांना तेथे काय-काय चालते हे सर्व माहिती आहे. सर्वात मोठा गट चेंबूर येथे आहे. ज्या माणसाचे स्टींग ऑपरेशन करण्यात आले, त्यामध्ये भ्रष्टाचार सिध्द झाला. मग संबंधितांना विचारण्यात आले की, आता तुमच्याबाबत काय कारवाई करावयाची? अशा वेळी त्याने सांगितले की, मी राजीनामा देतो. मग राजीनाम्याच्या नावाखाली सदरहू प्रकरण मिटविले. नंतर त्यांना राजीनामा मागे घ्यावयास लावून पुन्हा त्यांची नेमणूक करण्यता आली या मागील नक्की गणित काय आहे ते आपण सांगितले तर बरे होईल.

सभापती महोदय, यामध्ये नेमणूका, भाडे इ.बऱ्याच बाबी आहेत. या बाबतीत विधेयक चर्चे साठी आल्यानंतर सगळ्याच गोष्टी मांडणार आहे. तोपर्यंत येथेच थांबतो. याबाबतीत सांगावयास भरपूर आहे. पण यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी शासनाकडून प्रशासक नेमण्याचे काम मंत्री म्हणून केले आणि नवीन मंत्री महोदय आल्यानंतर त्यांनी उलटे केले हा प्रकार काय आहे तो मला कळला नाही. या संदर्भात माननीय मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांनी महसूल मंत्री म्हणून जे केले ते नवीन मंत्री तेथे आल्यावर त्यांनी उलटे करावयाचे हा प्रशासनामध्ये काय प्रकार आहे ? जर नवीन मंत्री महोदयांनी त्यांचे चुकलेले योग्य केले असते तर ते मला समजले असते. पण त्यांनी जे केले ते उलटेच केले आणि ते त्यांचे चुकत आहे असे दिसते. म्हणून याबाबतीत त्यांचे काय म्हणणे आहे ते जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. आताच माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजितदादा पवार सदनातून बाहेर गेले आहेत.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा आणि कामगारांच्या संबंधातील मागणी क्रमांक 94 बाबत बोलावयाचे आहे. येथे ऊर्जा राज्यमंत्री आहेत. कोऱ्हाडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच 6 हा 100 टक्के अनुदानित आहे. यासाठी 2 कोटी 2 लाख रुपये इतके केंद्र शासनाचे पैसे असून ते पुरवणी मागण्यांमध्ये आलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधित प्रत / शिक्षणासाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

हे पैसे तुमच्याकडे आले. ते पैसे केव्हा आले हे मला जाणून घ्यावयाचे आहे. ते पैसे जर अर्थसंकल्प मांडल्यानंतर आले असतील तर पुरवणी मागण्यांमध्ये ते येणे क्षम्य आहे पण जर ते पैसे अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आले असतील तर शासनाने या औष्णिक केंद्राच्या दुरुस्तीसाठी जे पैसे वापरले त्या संदर्भात मी माहिती जाणून घेण्यास उत्सुक आहे.

काल आपणच कौतुकाने सांगितले होते त्याप्रमाणे दुष्काळाकरिता केंद्र शासनाकडून आलेले जे पैसे होते त्यावर 12 कोटी रुपये व्याज सरकारला मिळते. राज्य शासनाला व्याज घेण्याकरिता हे आपत्ती निवारणाचे पैसे, शेतकऱ्यांचे पैसे येत नसून ते शेतकऱ्यांना वाटण्याकरिता येतात. सरकारने ते पैसे बँकेत ठेवले आणि व्याज घेतले हे आपणच सांगितले. 12 कोटी रुपये व्याज मिळाले. त्या बाबतीत आम्ही माहिती घेतली. सरकारला 12 कोटी रुपये व्याज मिळाले पण ते बँकेत आहेत आणि शेतकरी उपाशी आहेत. शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाचे असेच धोरण आहे का ? या बाबतीत केंद्र शासनाकडून पैसे केव्हा उपलब्ध झाले हे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. जर ते पैसे अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी उपलब्ध झाले असतील तर त्याचा उल्लेख अर्थसंकल्पात का आला नाही. ती बाब पुरवणी मागण्यांमध्ये का आली ? ते पैसे आल्यानंतर त्या पैशाचा विनियोग कसा केला, ते पैसे कशासाठी वापरले गेले हे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.

सभापती महोदय, यानंतर मी ग्रामविकास विभागाच्या संदर्भात मुद्दा मांडणार आहे. हे प्रकरण मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मांडणार आहे या संदर्भात मी सकाळी माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांना पत्र दिलेले आहे. संध्याकाळी उत्तर देत असताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी हा मुद्दा आयत्या वेळी मांडला असे म्हणावयास नको म्हणून मी आधीच मंत्री महोदयांना पत्र दिलेले आहे. जिल्हा परिषद लातूर येथील वर्ग 3 च्या कर्मचाऱ्यांच्या बदलीत झालेली अनियमितता या संदर्भातील ही बाब आहे. हे प्रकरण 2007-2008 चे आहे. या प्रकरणामध्ये पूर्ण चौकशी झाली. त्याची संपूर्ण कागदपत्रे मी माननीय मंत्री महोदयांकडे दिलेली आहेत. त्या प्रकरणाची चौकशी झाली. त्याकरिता तीन सदस्यांची समिती नेमली. त्यांनी त्यांना दोषी ठरविले. त्या दोषींना काय शिक्षा करावी याकरिता अहवाल तयार झाला. तो अहवाल विभागीय आयुक्तांकडे आला. विभागीय आयुक्तांनी त्या अहवालाची छाननी केली. त्यानंतर तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ...

अहवाल पुण्याला पाठविला. पुण्यावरुन तो अहवाल जानेवारी, 2012 ला मुंबईच्या सचिवांकडे पाठविण्यात आला. विभागीय आयुक्त सातत्याने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विचारत आहेत की, कारवाई कधी करणार ? त्यांनी 6 स्मरणपत्रे पाठविली. 6 स्मरणपत्रे पाठविल्यानंतर सुध्दा कारवाई होत नाही. 2008 मध्ये ते कागदोपत्री सिध्द झाले आहे. ते सर्व मांडून मी सभागृहाचा वेळ घेत नाही. मी माननीय मंत्री महोदयांकडे सकाळी सगळी कागदपत्रे दिलेली आहेत. आज उत्तर देताना या संदर्भामध्ये या तिघांच्या संदर्भात आपल्याला कारवाई जाहीर करावी लागणार आहे. 2007-2008 साली अनियमता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोष सिध्द झाल्यानंतर कोण पाठीशी घालत आहेत, कशाला पाठीशी घालत आहेत ? मला माहितीच्या अधिकाराखाली मिळालेली सर्व माहिती मी आपल्याकडे पाठविलेली आहे. मला आपल्याकडून अपेक्षा आहे. माझे पत्र माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांच्याकडे आहे. त्यांच्याकडे आलेले माझे पत्र त्यांनी मला सकाळी दाखविले. हे प्रकरण आयत्यावेळी मांडले असे म्हणण्याची भानगड नाही.

सभापती महोदय, श्री. शिवाजीराव मोघे साहेब सामाजिक न्याय विभागाचे मंत्री आहेत. त्यांनी एकदा होय म्हटल्यानंतर ते करणारच याबद्दल प्रश्न नाही. मी त्यांना अनेक वर्षापासून ओळखतो. पण एका प्रकरणाच्या बाबतीत असे का झाले हे मला कळत नाही. धुळे येथील विद्यार्थी श्री. स्वप्नील भदाणे यांचे एक प्रकरण मी या सभागृहात मांडले होते. त्यांच्याकडून जातीचे प्रमाणपत्र देण्याकरिता पैसे मागितले गेले होते हे मी या सभागृहात सांगितले होते. हे सर्व मांडल्यानंतर आदरणीय मंत्री महोदयांनी त्यावेळी 18.4.2012 रोजी या सभागृहात दिलेले उत्तर माझ्याकडे आहे. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात असे म्हटले होते की, "सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. 20 हजार रुपये घेतले तसेच काही अधिकाऱ्यांविरुध्द चौकशा झाल्या असे त्यांनी सांगितले. या संदर्भात मी आधी सांगितले आहे पण पुन्हा सांगतो. त्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात आयुक्त, सामाजिक न्याय यांच्या वतीने चौकशी होईल आणि दीड महिन्याच्या आत जे काही असेल त्याप्रमाणे कारवाई होईल." हे आपलेच शब्द आहेत. 18.4.2012 नंतर दीड महिना कधी पूर्ण होतो याचा हिशेब आपण करावा.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यानंतर मंत्री महोदयांनी असे म्हटले होते की, "मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, अशा प्रकारे पैशाची मागणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना ॲण्टी करप्शन ब्युरोकडे द्यावे. त्यांना पकडून देणे शक्य नसेल तर आमच्याकडे तक्रार करावी. ज्या अधिकाऱ्यांनी पैशाची मागणी केली आहे त्याची सुध्दा चौकशी करण्यात येईल."

सभापती महोदय, पुणे येथील सौ.फुले या अधिकाऱ्यांच्या प्रकरणासंबंधी या सभागृहात उल्लेख केला होता. पुणे येथील सौ.फुले या नावाच्या संबंधित अधिकारी आहेत त्यांचा मला फोन आला होता. मी संबंधितांचे पैसे देते पण माझ्या मागे चौकशी लावू नका असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी त्या पालकांना सुध्दा पैसे घेऊन जाण्यासाठी फोन केला होता. मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतरही त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली नाही. मंत्रालय स्तरावरुन त्यांना फोन करुन विचारण्यात आले नाही. त्यामुळे ते प्रकरण तेथेच थंडावले. त्यामुळे त्यांना असे वाटत असेल की, माझ्यावर कारवाई झाली नाही. या सदनाला काही महत्व आहे की नाही ? ज्या अधिकारी मला स्वत:हून फोन करुन सांगतात की, आपण मला वाचवावे, मी त्यांचे पैसे परत करते. त्यांनी पालकांनाही फोन करुन पैसे परत घेऊन सांगितले होते. पैसे हा महत्वाचा विषय नाही. विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाते हा विषय महत्वाचा आहे. त्यासंबंधी मंत्री महोदयांनी असे जाहीर केले होते की, यापुढे विद्यार्थ्यांची अधिकाऱ्यांकडून अडवणूक होणार नाही. त्यानंतर सामाजिक न्याय विभागाने विद्यार्थ्यांची प्रवेश घेत असताना जात पडताळणीच्या नावाखाली अडवणूक होता कामा नये अशा प्रकारचे आदेश काढलेले आहेत. त्याचा मला आनंद आहे. या विषयासंबंधी मंत्री महोदयांनी गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. आपल्या खात्याचे मंत्री सुध्दा आपल्या विरुध्द कारवाई करु शकत नाहीत असा त्या अधिकाऱ्यांचा समज झालेला आहे तो उधळून टाकला जाईल असे उत्तर मला आपल्याकडून अपेक्षित आहे. आज त्यासंबंधी 100 टक्के कारवाई करण्याचे जाहीर करावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मी सहकार विभागाच्या बाब क्र.145 वर बोलत आहे. शेतकऱ्यांच्या पीक विम्याच्या संदर्भातील हा विषय आहे. या संदर्भात मी मागील अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना दिली होती. परंतु ती लक्षवेधी सूचना चर्चेला येऊ शकली नाही. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लक्षवेधी सूचनांची निवेदने पटलावर ठेवण्यात येतात. त्यामध्ये माझ्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाचा समावेश होता. बँकेच्या 8 अधिकाऱ्यांनी 119 शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. त्या निवेदनात असे नमूद केले होते की, बँकेच्या 8 कर्मचाऱ्यांविरुध्द बँकेने कारवाई केली असून 108 शेतकऱ्यांना आम्ही नोटिसा पाठवित आहोत. त्या 119 शेतकऱ्यांचे काय झाले, शेतकऱ्यांना नोटिसा पाठविल्या किंवा नाही ? त्या 8 कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून किती पैसे घेतले त्याचे एकच उदाहरण वाचून दाखवितो. "श्री.बी.डी.पाटील, दोषी कर्मचाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. स्वत:च्या तसेच कुटुंबीयांच्या मालकीची जमीन नसताना प्रस्ताव दाखल करुन हा गैरव्यवहार केला." ही सर्व कागदपत्रे मी संबंधित अधिकाऱ्यांकडे सकाळी पाठवून दिलेली आहेत. एका कर्मचाऱ्याचा अपवाद वगळता बाकीच्या अधिकाऱ्यांबाबत असेच रिमार्क्स मारलेले आहेत. एका कर्मचाऱ्याच्या आई-वडिलांनी स्वत:ची जमीन असल्याचे दाखविलेले आहे.

श्री.पाटील यांनी 2 लाख 90 हजार रुपये उचलले होते. त्यांना शासनाने सेवेतून बडतर्फ केलेले आहे. त्यांच्याकडून 1 लाख 34 हजार 600 रुपये वसूल केले आहेत, बाकीच्या रकमेची वसुली झालेली नाही. इतर कर्मचाऱ्यांना मात्र एक पगारवाढ किंवा दीड पगारवाढ रोखून त्यांना निलंबित करुन पुन्हा कामावर घेण्यात आलेले आहे. सरकारी पैशाची अफरातफर केलेली असताना या कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जात नाही. त्यांना सन्मानाने कामावर घेतले जाते. सरकारच्या या कृतीमुळे असे दिसून येत आहे की, तुम्ही काहीही करावे, बिनव्याजी सरकारची रक्कम वापरली असली तरी अफरातफरीची रक्कम केवळ परत करावी. वसुली करीत असताना त्यांच्याकडून व्याज का घेतले नाही असा मला प्रश्न पडला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्या दोषी कर्मचा-यांची वेतनवाढ रोखून त्यांना पुन्हा कामावर घेतले. हा काय प्रकार आहे ? एका बाजूला हे कर्मचारी दोषी आढळलेले आहेत. दुस-या बाजूला शेतकरी कर्जबाजारी होत आहे, त्याला कर्ज फेडता येत नाही, तो आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतक-याच्या नावाने विम्याचे लाखो रुपये लुटणा-या कर्मचा-यांना माफी दिली जाते ही बाब गंभीर आहे. या कर्मचा-यांची वेतनवाढ रोखून त्यांना पुन्हा कामावर घेणे हा कोणता प्रकार आहे ? या कर्मचा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला गेला नाही. खरे म्हणजे आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी खात्यांतर्गत चौकशी आणि फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाते. तशी कारवाई या कर्मचा-यांच्या बाबतीत का केली नाही हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पर्यटनाच्या संदर्भात पर्यटन विभागाने एक अप्रतिम अशी पुस्तिका छापलेली आहे. त्या पुस्तिकेमध्ये निसर्ग सौदर्याने नटलेली किती तरी पर्यटन स्थळे दर्शविलेली आहेत. एक चांगल्या प्रकारची पुस्तिका काढल्या बद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. अशा प्रकारचे काम आम्हाला अपेक्षित आहे. सभापती महोदय, या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने मी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून उत्तराची अपेक्षा करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पान क्रमांक 14 वरील बाब क्रमांक 17मध्ये होमगार्ड आस्थापनेसाठी 5 कोटी रु.ची मागणी केलेली आहे. होमगार्ड या विषयावर या सदनामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे. अतिशय प्रशिक्षित असा हा वर्ग आहे. पोलीस भरतीच्या वेळी होमगार्डस्ना प्राधान्य दिले पाहिजे असाही मुद्दा या ठिकाणी अनेक वेळा उपस्थित करण्यात आलेला आहे. होमगार्ड आस्थापनेसाठी 5 कोटीची मागणी करीत असताना हा वर्ग आयडल न ठेवता त्यांना पोलीस भरतीमध्ये काही टक्के आरक्षण ठेवावे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये असलेली पोलीस स्टेशन्स आणि गाव यामधील पोलीस पाटील हा दुवा आहे. पोलीस पाटीलच्या 60 टक्के जागा रिक्त आहे. एकेका पोलीस पाटीलकडे 13-13 गावे दिलेली आहेत. तेव्हा पोलीस स्टेशन्स आणि पोलीस पाटील याबाबतीत शासनाने एक निश्चित धोरण घोषित केले पाहिजे. 60 टक्के गावामध्ये पोलीस पाटील नाहीत. गावातील अनेक विषयाच्या बाबतीत पोलीस पाटील याचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. तेव्हा ही बाब शासनाने तातडीने विचारात घ्यावी..

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये मी ज्या एका प्रकरणाचा उल्लेख केला होता ते प्रकरण म्हणजे साता-याचे डीवायएसपी श्री. सीताराम मोरे यांच्याकडे एका मुलीने एक तरुण मागे लागत असल्याची तक्रार केली. त्या डीवायएसपीने त्या मुलाचा ससेमिरा थांबवला. परंतु नंतर हाच डीवायएसपी सीताराम मोरे त्या मुलीच्या मागे लागला. या प्रकरणी माननीय सभापतींनी माननीय गृह मंत्री महोदयांशी दालनामध्ये चर्चा करुन सीताराम मोरेवर कारवाई झाली पाहिजे असे सांगितले. त्यानंतर त्याचे निलंबन झाले. निलंबनाच्या नंतर एकाच महिन्याच्या आत तो कामावर रुजू झाला. त्याची चंद्रपूर येथे बदली झाली होती. परंतु मॅटमध्ये जाऊन ती बदली रद्द करुन त्याला पुनश्च सातारा येथेच पोस्टिंग देण्यात आली. अशा प्रकारे एका गंभीर आरोप असेलेल्या पोलीस अधिका-यावर माननीय सभापतींनी माननीय गृहमंत्र्यांना कारवाई करण्यासंबंधीचे निदेश दिल्यानंतर आणि माननीय गृहमंत्र्यांनी त्याच्या निलंबनाची घोषणा केल्यानंतर देखील सीताराम मोरे हा एक महिन्याच्या आत कामावर रुजू झालेला आहे ही बाब मी या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने माननीय गृह मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, महसूल विभागाच्या पान क्रमांक 22 वरील बाब क्रमांक 23कडे मी माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधित आहे. शासकीय भूखंडांच्या संरक्षणासाठी सुरक्षा रक्षकांकरिता 28.93 लाखाची तरतूद केलेली आहे. मी या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केलेली आहे.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

कोल्हापूर पश्चिम महाराष्ट्र देवस्थानाची 15 हजार एकर जमीन आहे. ही सर्व जमीन वार्षिक भाडेपट्टयाने दिलेली आहे. आपणास ऐकून आश्चर्य वाटेल आणि आपण कोल्हापूरमध्ये शेती करण्यास याल. 100 एकर जमिनीला वार्षिक एक हजार रुपये भाडे, 10 एकर जमिनीला 63 रुपये वार्षिक भाडे आकारण्यात आले आहे. भाड्याने दिलेल्या 100 एकर जमिनीमध्ये खनिजे निघाली. खनिज उत्खनन करणारा मालक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वार्षिक 10 लाख रुपये रॉयल्टी भरतो. परंतु पश्चिम महाराष्ट्र देवस्थानास मात्र वार्षिक एक हजार रुपये वार्षिक भाडे मिळत आहे. अशी एकूण 15 हजार एकर जमीन आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थानाने ही 15 हजार एकर जमीन परत घेऊन वार्षिक भाडेपध्दती नव्याने ठरविली पाहिजे. जे पूर्वीपासून ती जमीन कसत आहेत त्यांनाच ती जमीन वार्षिक भाड्यामध्ये सुधारणा करुन दिल्यास पश्चिम महाराष्ट्र देवस्थानास वार्षिक 200 कोटी रुपये मिळू शकतील असा एक चार्ट तयार करुन मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केलेला आहे.

सभापती महोदय, शासकीय भूखंडाच्या संरक्षणासाठी सुरक्षारक्षकांसाठी 28 लाख 53 हजार रुपयांची पुरवणी मागणी मांडतो. परंतु दुसऱ्या बाजूला 15 हजार एकर जमीन अत्यंत मातीमोल किंमतीने भाड्याने देतो ही बाब मी मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या जमिनीमध्ये इनामी वर्ग तीनच्या जमिनी असल्यामुळे त्या विकता येत नाही. परंतु कोल्हापूर शहरातील मौजे मोरेवाडी, ता.करवीर जिल्हा कोल्हापूर येथील गट क्रमांक 32 व 45 या साडेसात एकरच्या जमिनी, ज्याची बाजारभावाने किंमत 50 कोटी रुपये आहे, या जमिनी विकण्याची परवानगी नसताना त्या जमिनी केवळ 4 कोटी 59 लाख रुपयांना विकण्यात आली. त्या जमिनीच्या संदर्भात जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्तांचा रिपोर्ट आहे. विभागीय आयुक्तांच्या रिपोर्टमधील शेवटचे वाक्य मी वाचून दाखवितो. "करवीर निवासीनी हे कोल्हापूरमधील प्रसिध्द देवस्थान आहे. अशा देवस्थानाच्या जमिनीची विक्री करण्यास परवानगी देणे सार्वजनिक हिताचे होणार नाही व जनतेमध्ये उद्रेक, संताप व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी शिफारशी केल्याप्रमाणे प्रस्तावित जमिनीस विक्री करण्यास परवानगी देण्यात येऊ नये." आपण एकाबाजूने शासकीय भूखंडाच्या संरक्षणासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

पुरवणी मागणी मागत आहोत. तर दुसरीकडे देवस्थानाची 15 हजार एकर जमीन मातीमोल किमतीने भाड्याने देत आहोत आणि त्यातील विकता न येणारी साडेसात एकर जमीन विकली गेली आहे. तेव्हा या प्रश्नां संबंधी माननीय महसूल मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. अशाप्रकारे वेगवेगळ्या संस्थांच्या जवळपास एक लाख एकर जमिनी आहेत. या सर्व जमिनी मातीमोल किंमतीने दिलेल्या आहेत. तेव्हा आपण या जमिनी पुन्हा ताब्यात घेतल्यास खूप गोष्टी मार्गी लागू शकतील. तेव्हा माझ या मागणीचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 27- पाणी पुरवठा विभाग - टंचाईग्रस्त भागासाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी 50 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. जत आणि आटपाडी तालुक्यातील पाण्याचे स्त्रोत आटलेले आहेत. तेव्हा आपण 50 कोटी रुपयांची तरतूद करुन देखील कोठून पाणी आणणार आहात ? एप्रिल आणि मे महिन्यात जेथून पाणी मिळेल तेथून पाणी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता तेथील पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. तसेच पुरविण्यात येणारे पाणी शुध्द आहे किंवा कसे, त्या पाण्यापासून कोणत्या प्रकारचे आजार उद्भवू शकतात याचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. तेव्हा आपण याचही गोष्टीचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी पीक विम्याचा हप्ता भरलेला आहे. परंतु शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळत नाही. विमा कंपनीचे म्हणणे आहे की, दुष्काळ घोषित झाला तरच आम्ही पीक विम्याची रक्कम देऊ शकतो. तेव्हा या बाबतीत शासनाने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 28 - वन गुन्हेगारी रोखण्यासाठी गुप्तचर यंत्रणेसाठी 50 लाख रुपयांची मागणी केलेली आहे. माझ्या भुदरगड तालुक्यामध्ये सात सलग घटना घडल्या आहेत. काही घटनेमध्ये वाघाचे कातडे सापडलेले आहे आणि आरोपींनी भुदरगडमध्ये वाघ मारल्याचे कबूल केलेले आहे. असे असताना भुदरगड तालुक्यामध्ये एकाही वाघाची नोंद नाही. मग भुदरगड तालुक्यामध्ये सात वाघ मारले कसे गेले ? भुदरगडमध्ये ज्या सलग सात घटना घडल्या त्याची माहिती मी माननीय सभापतींकडे दिलेली आहे. भुदरगडमध्ये वाघ मारल्याचे आरोपीने मान्य करुनही भुदरगड तालुक्यामध्ये वाघ आहेत अशी नोंद वन विभागामध्ये नाही.

यानंतर श्री.गिते....

अशुद्धीत प्रत / शिघ्रलेखापाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, कृषी विभाग, बाब क्रमांक 39 सुक्ष्म सिंचनासाठी 50 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. महाराष्ट्रात पाण्याचा मोठया प्रमाणात तुटवडा भासत आहे. सूक्ष्म सिंचन योजने शिवाय पर्याय नाही असे मला देखील वाटते. केंद्र सरकारने अनुदान देऊन सुक्ष्म सिंचनाची योजना केलेली आहे. त्या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतात सूक्ष्म सिंचन योजना नाही, परंतु त्या शेतकऱ्यांच्या नावे पैसे उचलण्यात आलेले आहेत. सुक्ष्म सिंचन योजनेत होत असलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी व्हावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सूक्ष्म सिंचन योजनेच्या कामासाठी एक नवीन मशीन आलेली आहे. त्या मशिनमध्ये संपूर्ण वर्षाचा कार्यक्रम सेट करुन ठेवता येतो. या मशीनच्या सहाय्याने त्या त्या दिवशी सूक्ष्म सिंचनाच्या माध्यमातून झाडांच्या मुळाशी आपल्याला पाणी देता येते. सूक्ष्म सिंचन योजना राबवितांना या मशीनचा मोठया प्रमाणात वापर केला तर पाण्याची मोठी बचत होईल आणि पीक उत्पादन वाढीस मदत होईल. म्हणून ही योजना राबविताना या मशीनचा मोठया प्रमाणात वापर करावा अशी माझी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, पंढरपूर येथे वारकरी वारी करण्यासाठी चालत जात असताना अपघात झाला. वारकरी वारीस जात असताना नेहमी अपघात होतात. आळंदी ते पंढरपूर माऊलीची दिंडी जाते, त्या रस्त्यावर 11 ठिकाणी पालखीचा मुक्काम असतो. दरवर्षी माऊलीच्या दिंडीस कुठे तरी अपघात होत असतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने 11 ठिकाणी बायपास रस्ता करावा अशा प्रकारची मागणी करतो आणि आजच्या या पुरवण्या मागण्यावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एक अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर पुरवणी मागण्यांच्या संदर्भात आपण चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, राज्यावर दुष्काळाचे भीषण संकट आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला पुरवणी मागण्यांचा आणि मूळ अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींचा टक्केवारीप्रमाणे थोडासा आढावा घेण्याचा प्रयत्न केला. राज्य कारभार चालवित असताना राज्यापुढे येत असलेली आव्हाने, वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी, ज्या योजना चालू आहेत, त्या योजना पुढें नेण्यासाठी अशा प्रकारची आर्थिक तरतूद करावयास लागणे ही अत्यावश्यक बाब समजली जाते. आकडेवारीस धरुन या विषयावर बोलणे अपेक्षित असते. परंतु आकडेवारीमध्ये न जाता, ज्या ठळक बाबींसाठी पुरवणी मागण्या सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या आहेत. त्या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने थोडीशी चर्चा या सभागृहात होते. सदर चर्चा करीत असताना बऱ्याच विभागांचे पैलू आपणा सर्वांसमोर येत असतात. जी पुरवणी मागणी मांडण्यात आलेली असते, ती कितपत प्रश्नाची सोडवणूक करण्यास उपयोगी पडेल, त्यात अधिकचे काही करण्याची आवश्यकता आहे काय, किंवा त्याचा प्राधान्यक्रम बदलण्याची आवश्यकता आहे काय, अशा पध्दतीचे विचारमंथन या पुरवणी मागण्याच्या निमित्ताने या सभागृहात होत असते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग, पृष्ठ क्रमांक 111, बाब क्रमांक 112 व 113 अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्याकरिता शासकीय वसतिगृहांसाठी व अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्यासाठी नवीन शासकीय निवास शाळा सुरु करणे यासाठी पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. अनुसूचित जातीच्या मुले आणि मुली हा महत्वाचा घटक या पुरवणी मागण्यांमध्ये आलेला आहे. वसतिगृहे अथवा निवासी शाळा यांची संख्या अपूर्ण आहे, त्यामुळे या समाजातील बऱ्याच विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागते आहे. प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार मान्य झाला असल्यामुळे सर्व घटकांना शिक्षण देण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर यंत्रणा लागते. त्यामुळे ही पुरवणी मागणी अत्यावश्यक बाब आहे. या पुरवणी मागण्यांतर्गत जेवढा निधी संकल्पित केला आहे, त्यापेक्षा जास्त निधी लागण्याची आवश्यकता आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.अजित 16:00

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षा निमित्त मुक्त वसाहत योजना असा नवीन उपक्रम शासनाने हाती घेतला आहे. खरे म्हणजे जन्मशताब्दी वर्षात याही पुढची पावले टाकली गेली पाहिजेत आणि त्या योजनेकडे अतिशय बारकाईने लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सूचित करावयाचे आहे.

सभापती महोदय, नियोजन विभाग, पृष्ठ क्रमांक 117, बाब क्रमांक 117 ही पश्चिम घाट विकासासाठी अतिरिक्त तरतुदीची मागणी केली आहे. पश्चिम घाट विकास हा येणाऱ्या काळामध्ये एक महत्वाचा आणि एक संवेदनशील विषय राज्यापुढे येणार आहे.....

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

पश्चिम घाट विकासांतर्गत किमान 40 ठिकाणांना आता वर्ल्ड हेरिटेजचा दर्जा मिळालेला आहे. त्याची जपणूक करताना साहजिकच पश्चिम घाट विकास कामांवर काही मर्यादा येण्याची शक्यता आहे. अधिक मर्यादा येत असताना सुध्दा अजूनही आपल्या राज्याने या हेरिटेजच्या दर्जाबद्दल विरोध आहे किंवा नाही याबाबतची भूमिका स्पष्ट केलेली नाही. कर्नाटक राज्याने ती स्पष्ट केलेली आहे. कर्नाटक सरकारने सांगितले की, त्यांना हे मान्य नाही. परंतु एकूणच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पश्चिम घाटाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.त्याचबरोबर पश्चिम घाट अंतर्गत येणाऱ्या सगळया भागाचा विकास पर्यावरण संतुलन न बिघडू देता कसा करता येईल याचा विचार होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 117, पृष्ठ क्रमांक 118 संदर्भात मी सांगू इच्छितो की, नक्षलग्रस्तांसाठी विशेष कृती दल आणि नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार केलेला आहे. देशामध्ये नक्षलवाद्यांच्या समस्येमुळे जी राज्ये पीडित आहेत त्याबाबत वर्तमानपत्रातून आपण नेहमी वाचतो.ज्या प्रकारच्या घटना नेहमी घडत आहेत त्या लक्षात घेता नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी या कार्यक्रमासाठी एक वेगळी यंत्रणाच असली पाहिजे. याबद्दल अनेकदा सांगितले जाते की, या कामासाठी निधी कधीही कमी पडू दिला जाणार नाही. सर्वांनी अतिशय बारकाईने पहावे अशा या दोन्ही योजना आहेत.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 118 बाब क्र.120 यामध्ये काशी विश्वेश्वर मंदिर बारामतीच्या विकासासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. पर्यटन खात्याच्या संदर्भातील ही बाब आहे. या मंदिराबरोबरच बारामतीच्या इतर ठिकाणच्या विकासासाठी बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर पुन्हा एकदा दुष्काळी परिस्थितीनंतर राज्याच्या ग्रामीण भागामध्ये जी काही आरोग्याची दुरवस्था होण्याची शक्यता आहे त्याचा विचार करुन पृष्ठ क्रमांक 123, बाब क्रमांक 121 कंत्राटी सेवेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. भविष्यकाळात ही तरतूद शासनाला वाढवावी लागेल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

सामान्य प्रशासन विभागाच्या बाबतीत पृष्ठ क्रमांक 5, बाब क्रमांक 4 वर बोलत असताना विमान देखभालीसाठी पूरक मागणी करण्यात आलेली आहे. अतिशय महत्वाचा विषय आहे. शासनाच्या विमान देखभालीसाठी जरतूद करण्यात आलेली आहे. गतीशील शासनात साधनसामुग्री अद्ययावत असणे अतिशय आवश्यक आहे. मशीनरी चांगल्या स्थितीत राखणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे. त्यादृष्टीने ही तरतूद करण्यात आलेली आहे.

गृहविभागाच्या पृष्ठ क्रमांक 13, बाब क्रमांक 14 मध्ये शस्त्र आणि दारुगोळा खरेदी याविषयी पूरक मागणी करण्यात आलेली आहे. हा विषय देखील महत्वाचा आहे. आपण वर्तमानपत्रामध्ये वाचतो की, फायरींग रेंजवर जाऊन प्रॅक्टीस करण्याला देखील पुरेसा दारुगोळा उपलब्ध नसतो. या सगळयाचा विचार करुनच ही मागणी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे महात्मा गांधी तंटामुक्त गाव या योजनेबाबत बरेच उलट-सुलट बोलले जाते. परंतु या योजनेमध्ये जेवढी गावे येतील त्यासाठीच्या निधीची सुध्दा आवश्यकता लागणार आहे.

पृष्ठ क्रमांक 16, बाब क्रमांक 14 अंतर्गत फॉरेन्सिक लॅबसाठी पुरवणी मागणी करण्यात आली आहे. लॅबची कमतरता असल्यामुळे आणि जी साधने आहेत ती लक्षात घेता सगळेच प्रश्न प्रलंबित राहतात. फार कमी आणि तोकडी व्यवस्था असल्यामुळे याकडे अधिक प्रमाणात लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 27, बाब क्रमांक 31 नैसर्गिक आपत्तीबाधित कापूस,सोयाबीन, इ.पिकांसाठी वित्तीय सहाय्य देण्यासाठी पुरवणी मागणी आहे. याबाबतीत बराच ऊहापोह झालेला आहे.

सामजिक न्याय अंतर्गत शिक्षण विभागाबाबत पान क्रमांक 41, बाब क्रमांक 52 खाली मुलींच्या वसतीगृहांची तरतूद वाढविण्याची गरज आहे.

वित्त विभागात पान क्रमांक 49, बाब क्र.57 अंतर्गत राष्ट्रीय ई-गव्हर्नस प्रकल्पासाठी पुरवणी मागणी आहे. हा अतिशय मोठा विषय याचर्चेच्या निमित्ताने सदनापुढे आलेला आहे.

नंतर श्री. खर्चे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

याचे कारण आता नुकतीच मंत्रालयाला आग लागल्याने बरीच कागदपत्रे त्यात नष्ट झाली. या सर्व फाईल्स नव्याने तयार करण्याचे शासनासमोर एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे हा राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्प जास्तीत जास्त चांगला कसा राबविता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र.61 पृ.क्र.56-रस्ते, पूल यांची दुरुस्ती करण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. या निमित्ताने रस्त्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी वेगळी यंत्रणा असते. इतर राज्यांमध्ये ही यंत्रणा वापरात आणल्यामुळे त्या राज्यांमधील रस्त्यांचा टिकण्याचा कालावधी निश्चित होतो. त्या अनुषंगाने संपूर्ण परिरक्षण करण्याच्या यंत्रणेकडे अधिकचे लक्ष देण्याची गरज आहे.

महोदय, उर्जा विभागाच्या पृ.क्र.95, बाब क्र. 95-अवर्षणग्रस्त क्षेत्रातील कृषी पंपधारकांना वीज देयकात सूट देणे यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ पुन्हा एकदा दुष्काळाचा सामना आपल्याला करावा लागतो की काय अशी शंका येते. त्याचा विचार करता ही मागणी भविष्यात वाढण्याची शक्यता आहे. हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून अधिकची तरतूद करणे गरजेचे आहे अशी माझी विनंती आहे.

महोदय, पृ.क्र. 100, बाब क्र. 99-ग्रामविकास विभागाच्या अखत्यारित समान विकास योजना आपण मागास भागासाठी राबवितो. यावरुन असे लक्षात येईल की, या योजनेच्या माध्यमातून छोट्या छोट्या गावात सुध्दा मागास वस्त्यांचे रुप बदलणे शक्य आहे. त्यासाठी निधी कमी पडू नये याची दक्षता मंत्री महोदयांनी घ्यावी अशी माझी सूचना आहे.

त्याचप्रमाणे ग्राम विकास विभाग, पृ.क्र. 101, बाब क्र. 101 - अपारंपारिक उर्जा साधने, उदा. बायोगॅस, सोलर उर्जा यासाठी ही तरतूद केली असली तरी त्यात अधिकची वाढ करुन गांभीर्याने या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर पान क्र. 154, बाब क्र. 161 निरुपयोगी जल व्यवस्थापनासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. जे पाणी दूषित होते किंवा वापरुन नदीत जाते ते निरुपयोगी समजून त्याचे व्यवस्थापन करणे हा यातील विषय आहे. हा एक नवीन प्रकारचा विभाग असून यासंदर्भात साकल्याने विचार करुन शासनाने भरीव तरतूद करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--- 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करीत असताना प्रामुख्याने बाब क्र. 22, पृ.क्र. 29 - वन विभागाच्या अनुषंगाने मला सुचवावयाचे आहे. ते म्हणजे ईको-सेन्सेटिव्ह झोनच्या बाबतीत लोकांचा गैरसमज झालेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, ईको-सेन्सेटिव्ह झोन म्हणजे काय हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. कोकणातील जवळपास सर्वच व्यवसाय, बंदरे, जेट्टी बंदरे, मच्छिमार जेट्टी अशा कोणत्याही गोष्टीसाठी पर्यावरण विभाग आता परवानगी देत नाही. म्हणून ईको-सेन्सेटिव्ह झोन स्पष्ट होणे आवश्यक आहे. यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ठराव घेण्यात आला. जिल्हा परिषद सिंधुदुर्ग ने तसा ठराव शासनाकडे पाठविला आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायती, पंचायत समित्या यांनी देखील तसे ठराव घेतले. पण शासनाची यामागील नेमकी भूमिका काय आहे हे मात्र स्पष्ट होत नसल्याने मंत्री महोदयांनी ती बाब स्पष्ट करावी अशी मी विनंती करतो.

महोदय, त्याचबरोबर वनसंज्ञा हा जो प्रकार त्याचा फटका कोकणात बसत आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संपूर्ण राज्यात 62 हजार हेक्टर क्षेत्र वन संज्ञेखाली आहे तर एकट्या कोकणातील 98 हजार हेक्टरपैकी 42 हजार क्षेत्र वन संज्ञेखाली लागले आहे. त्याचा परिणाम असा होतो की, पाटबंधारे विभागाचे प्रकल्प किंवा रस्त्यांची कामे करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्याचबरोबर बाजारपेठांवर सुध्दा वन संज्ञा लागली आहे, त्यामुळे जनतेत गैरसमज होऊ लागला आहे. ज्यावेळेस रि-सर्व्हे झाला त्यावेळेस 1800 हेक्टर एवढेच क्षेत्र वन संज्ञेखाली लागले असल्याचे निष्पन्न झाले. या गोष्टीचा उकल झाला तरच लोकांच्या मनातील संभ्रम दूर होऊ शकेल, यावर शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

महोदय, वन विभागाच्या जमिनीतून जाणारे जे विविध रस्ते आहेत, त्यात आंबोली घाटात रस्ता घेण्यासाठी सुध्दा याच कारणाने विरोध झाला.

यानंतर श्री. जुन्नरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

श्री. राजन तेली ...

ब्रिटिश काळापासून आंबोली येथे घाट होता. फॉरेस्टमधून जाऊ न दिल्यामुळे बेळगाव आणि सिंधुदुर्गला जोडणारा जो घाट रस्ता आहे त्यालाही मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. घोडगे-सोनवणे घाटाची मागणी गेल्या 12 वर्षापासून होत आहे परंतु या घाटाच्या अर्ध्या कि.मी. अंतरावरुन वन्य प्राणी जातात या कारणाने या घाटाला हरकत घेतल्यामुळे या घाटाला मान्यता मिळालेली नाही. या घाटाचे काम 6 कि.मी. पर्यंत पूर्ण झालेले आहे त्यामुळे वन विभाग प्रत्येक वेळी ज्या काही अडचणी निर्माण करीत असते त्यावर ठोस निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 117, पृष्ठ क्रमांक 117 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. 1998 मध्ये सावंतवाडी तालुक्याचे विभाजन करुन दोडा मार्ग तालुका निर्माण करण्यात आला असतांनाही त्याला डोंगरी विकासाचा निधी मिळत नाही. दोडा मार्ग तालुका डोंगरी विभागात यावा म्हणून या ठिकाणच्या जनतेची अनेक वर्षापासूनची मागणी आहे परंतु ती अजून पर्यंत पूर्ण झालेली नाही त्यामुळे शासनाने तशा प्रकारची घोषणा करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 56, पृष्ठ क्रमांक 49 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. वित्त विभागामार्फत नेहमी वेगवेगळे फतवे काढले जात असतात. पूर्वी मच्छीमारांच्या सोसायटींना डिझेलचा परतावा मिळत असे परंतु वित्त विभागाने आता असा निर्णय घेतला आहे की, मच्छीमारांचं जे काही सभासद आहेत त्यांच्या नावावर डिझेलचा परतावा करण्यात येईल. परंतु ज्या संस्था मच्छीमारांना डिझेल, जाळी पुरवण्याचे काम करीत असतात त्यांना अशा प्रकारचा परतावा आल्यानंतर त्या प्रत्येक सभासदाच्या नावाने त्याची वसुली करीत असतात. गेल्या पाच महिन्यापासून या संस्थांना डिझेलचा परतावा मिळालेला नाही. म्हणून वित्त विभागाने फेर विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 56, बाब क्रमांक 63 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. कोकण विभागात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सर्वात जास्त रस्ते आहेत. कोकणामध्ये रस्ते दुरुस्तीसाठी फार कमी प्रमाणात पैसे येतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ...

जिल्हा परिषदेकडे जवळपास 5000 कि.मी.चे रस्ते असून येणारा निधी अत्यल्प आहे. त्यामुळे जे काही जुने रस्ते झालेले आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास अधिकचे पैसे द्यावे लागणार असल्यामुळे अधिकचा निधी देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रयत्न करावेत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सागरी महामार्गाची सुरुवात स्व.अंतुले साहेबांनी 1982 मध्ये केली होती. या ठिकाणचे रस्ते व पुलासाठी 7 वर्षापूर्वी 200 कोटी रुपये खर्च येणार होता परंतु हा खर्च आता 800-900 कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. त्यामुळे सागरी मार्गाच्या निमित्ताने अपूर्ण राहिलेले रस्ते, पूल होणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 111, पृष्ठ क्रमांक 112 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. वैश्य वाणी समाज हा पूर्वी ओबीसी मध्ये होता परंतु हाय कोर्टाच्या निर्णयानुसार वैश्य वाणी समाजाला आता ओबीसी मधून काढण्यात आले आहे. कोर्टाने सांगितल्या प्रमाणे प्रत्येक जिल्हयात यासंदर्भात चाचणी केलेली आहे. आयोगाच्या अध्यक्षांचा एक महिन्यापूर्वी मृत्यू झालेला असल्यामुळे या आयोगावर अध्यक्षांची लवकरात लवकर नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 122, पृष्ठ क्रमांक 121 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने काही जिल्हे जीवनदायी योजनेत घेतलेले आहेत. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हे हे ग्रामीण भागातील जिल्हे असून हे दोन्ही जिल्हे जीवनदायी योजनेत यावेत अशी विनंतीही मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 160, पृष्ठ क्रमांक 159 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातच नाही तर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी नळ पाणी पुरवठा योजना झालेल्या आहेत. परंतु जुन्या नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्त करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध होत नाही. जीवन प्राधिकरणाने पूर्वी फार मोठया योजना केल्या होत्या व त्यातील बऱ्याच योजना आता बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत त्यामुळे बंद पडलेल्या योजनांसाठी पैसे मिळणे आवश्यक आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ...

सभापती महोदय, जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय पेय जल योजना या केंद्राच्या योजना आहेत. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हयाला 70-80 कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे वेगवेगळया योजनेद्वारे मिळत असतात परंतु यासंदर्भात चांगल्या प्रकारचे नियोजन होत नाही. योजना करतांना ग्रामीण भागातील गामपंचायतींना कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध करुन दिली जात नाही.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

असे असताना ग्राम समिती तयार करण्यात येते. या ग्राम समितीचा अध्यक्ष सरपंच असतो. त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा तांत्रिक स्टाफ नसतो. तरी देखील ग्रामपंचायती टेंडर काढतात. ती समिती पहिले पैसे काढते. त्यामुळे ती योजनाच पूर्ण होत नाही. त्यामुळे याबाबत राज्य सरकारने केंद्र सकारला विनंती केली पाहिजे की, यावर जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्या यांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. तसे केले तरच या योजना चांगल्या होतील. तेव्हा याचे नियोजन चांगले होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

सन 2009 मध्ये सार्वजनिक विहिरीचे शीर्षक होते. ते आपण डीपीडीसीमधून काढून टाकले आहे. त्यावेळी बऱ्याच ग्राम पंचायतींनी भागामध्ये विहिरी केल्या होत्या. त्या विहिरींचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, काढून टाकलेले शीर्ष डीपीडीसीमध्ये पुन्हा आणावे. एवढे बोलून मी माझी भाषण पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, 4700 कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. मी थोडक्यात 4-5 मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, मी सर्वप्रथम ऊर्जा विभागावर बोलणार आहे. आपले राज्य डिसेंबर 2012 पर्यंत भारनियमन मुक्त करणार आहोत असे शासनाने सांगितले आहे. आमच्या जळगाव जिल्ह्यामध्ये ऊर्जा विभागाचे 106 संच सुरू झालेले आहेत. मात्र, कोळसा निकृष्ट दर्जाचा असतो. त्यामुळे तांत्रिक बिघाड होतात. कोळसा निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे प्रदूषणाचा देखील मोठा प्रश्न आमच्या येथे निर्माण झाला आहे. बुस्टर पंपातून निघणारी राख पाणी पुरवठ्यामध्ये जाते. त्यामुळे लोकांना खूप त्रास होतो. शेतकऱ्यांना त्रास होतो. आमच्या महाराष्ट्राला वीज हवी आहे. पण त्याच बरोबर ऊर्जा निर्मितीपासून होणारे प्रदूषण देखील नियंत्रित केले पाहिजे. त्यासाठी आपण नियोजन केले पाहिजे. पिंपरी सेकम हे गाव वरणगावच्या जवळ आहे. तीन महिन्यापूर्वी 3 लोकांना दूषित पाण्यामुळे प्राण गमवावे लागले आहेत. हा फार गंभीर विषय आहे. याकडे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. या गावाचे पुनर्वसन झाले आहे. या गावाच्या अनेक मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत. येथील लोकांसाठी बस पुरविण्यात येईल, पाणी पुरवठा योजना मंजूर करून देतो, शाळेचा प्रश्न सोडवितो, ग्रामपंचायती प्रश्न सोडवितो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. येथील मुलांना शाळेसाठी 7 ते 8 कि.मी.पायी जावे लागत आहे. हा विषय फार गंभीर आहे. भुसावळ पासून गाव जवळ आहे. पण आरोग्यासाठी जायचे म्हटले तर फार लांब जावे लागते. तेव्हा याकडे आपण लक्ष दिले तर मी आपला फार आभारी राहीन.

सभापती महोदय, या नंतर मी कृषी विभागावर बोलणार आहे. जळगाव जिल्हा हा केळीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. भारतात 29 टक्के केळीचे उत्पादन जळगाव येथे होते. रावेर, यावल,फैजपूर, सावदा या भागात हवामान खात्याने केंद्राची उभारणी केली तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताचे ठरेल. येथे हवामान केंद्र उभारावे अशी अनेक वर्षापासून शेतकऱ्यांची मागणी आहे. हा प्रश्न शासन दरबारी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. जळगाव जिल्ह्यातील 5-6 तालुके हे केळी उत्पादनावर अवलंबून आहेत. केळी पिकावर सातत्याने किंडींचा, रोगांचा प्रादुर्भाव होतो. आम्हाला

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन....

सातत्याने फक्त दिलासा देण्याचे काम केले जाते. बाकी काही होत नाही. हिवाळ्यात थंडी मुळे करपा आणि चरका या रोगांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे वर्षभर आमच्या येथील शेतकरी एका वेगळ्या चक्रव्यूहात अडकलेला असतो. करपा रोगाला प्रतिबंध करण्यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे. आपण शेजारच्या गुजरात राज्याकडे लक्ष द्यावे. तेथे केळीचे उत्पादन चांगल्या प्रमाणात होत आहे. त्यांच्या तुलनेत आपल्या येथील उत्पादन कमी होत आहे. त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. केळी हे जळगाव जिल्ह्याचे पीक असून महाराष्ट्राचा स्वाभिमान आहे. त्याचे उत्पादन वाढले तर ते आपल्या बरोबरच राहील.

यानंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन....

सभापती महोदय, त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांची फार दिवसांपासून मागणी असून त्या बाबत कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग राज्यामध्ये फार चांगले काम करीत आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये एका कामाबाबत 1998-99 मध्ये निविदा निघाल्या होत्या. माहितीच्या अधिकाराखाली मी चार निविदांची माहिती मागविली. त्यामध्ये 1998-99 मध्ये निघालेल्या निविदांमध्ये 18 महिन्यांचा कालावधी दिला होता. त्या बाबत दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर पूलाचे काम वेळेमध्ये पूर्ण करण्यात आले असून पूलाच्या हस्तांतरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्र व्यवहार सुरु आहे". तापी खोरे महामंडळाकडून या पुलाच्या कामाला 1998-99 मध्ये सुरुवात होऊन ते पूर्ण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्याकरिता अजूनपर्यन्त पत्र व्यवहार सुरु आहे. हा पूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित न झाल्यामुळे त्याची दुरुस्ती व देखभाल व्यवस्थित होत नाही. या पुलाचे बांधकाम तापी खोरे महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आले होते. त्यांचे म्हणणे असे की, या पुलाची देखभाल करणे याच्याशी आमचा संबंध नाही. त्यामुळे लोकांचे फार नुकसान होत असल्यामुळे मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत मागे एकदा सहकार विभागाने पाच मुद्यांबाबत चौकशी सुरु केली होती. यामध्ये जे. टी. महाजन सूत गिरणी, अमळनेर येथील भूखंडाचे चुकीचे झालेले व्हॅल्यूएशन, इन्शुरन्स पॉलीसी आणि वसंत सहकारी साखर कारखान्याचा समावेश होता. या चार विषयांपैकी तीन विषयांवरील चौकशी पूर्ण् झाली असून अमळनेर येथे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एका भूखंडाचे व्हॅल्यूएशन मागील संचालक मंडळाने चुकीच्या पध्दतीने केले होते. हे 1983 चे प्रकरण असून त्या करिता एक विशेष अधिकारी देखील नियुक्त करण्यात आला होता. त्यामुळे ज्यांनी चुकीच्या पध्दतीने व्हॅल्यूएशन केले आहे त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? त्याचप्रमाणे जे.टी. महाजन सूत गिरणीमध्ये अफरातफर झाली आहे. त्यामुळे आमच्या शेतकऱ्यांच्या असलेल्या बँकेचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्या बाबत आपण सभागृहामध्ये खुलासा करावा अशी मी आपणास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन...

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निमित्ताने माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांना विनंती करावयाची आहे की, जळगाव हे विकसित झालेले शहर असून या शहरामध्ये मोठ मोठे उद्योग आहेत. या शहरामध्ये आम्हाला उड्डाण पूलाची नितांत आवश्यकता आहे. आम्हाला गावामध्ये दोन ते तीन उड्डाण पूल बांधून दिले पाहिजेत. आमच्या जळगाव जिल्ह्यामधील लहान लहान गावची लोकसंख्या देखील अडीच ते तीन लाख इतकी आहे. आमच्या जळगाव शहराची एकूण लोकसंख्या 5 लाख इतकी आहे. तरी सुध्दा गावामध्ये एकही उड्डाण पूल बांधण्यात आलेला नाही. जुन्या रेल्वे पूलाची मुदत संपून गेली आहे. ब्रिटीशकालीन 100 वर्षे जुना असलेला हा पूल कोसळला तर तेथील रहदारी बंद होऊन लोकांची फार मोठी गैरसोय होणार आहे. त्याकडे देखील आपण लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही केली तर जळगाव शहराची फार मोठी समस्या दूर होईल.

सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यामध्ये इतर जिल्ह्यांइतका पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा नाही. तरी देखील माझ्या जळगाव जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पिण्यासाठी पाणी नाही. माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी भारत निर्माण योजनेबाबत माहिती दिली. या योजनेकरिता शासनाने जिल्हा परिषदेला हजारो कोटी रुपयांचा निधी दिला आहे. जिल्हा परिषदेमार्फत 25 ते 50 लाखाची योजना गावामध्ये राबविली जाते. त्यामध्ये पाईप लाईन बरोबर टाकली जात नाही. ज्या ज्या ठिकाणी भारत निर्माण योजनेची 50 लाख ते 1 कोटींची कामे झालेली आहेत त्या ठिकाणी देखील पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. हा प्रश्न सुटला तर जळगाव जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल.

सभापती महोदय, सन 2010 मध्ये जळगाव जिल्हा परिषदेमार्फत नळ पाणी पुरवठा योजनेवर 1 कोटी 50 लाख रुपये खर्च करण्यात आले. परंतु त्या जिल्ह्यातील लोकांना अजूनही शुध्द व निर्जंतुक पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. ज्यांचे एखाद्या महापालिकेमध्ये रुपांतर होईल इतकी मोठी गावे जळगाव जिल्ह्यामध्ये असून त्या ठिकाणी देखील पिण्याचे शुध्द पाणी जनतेला मिळत नाही. त्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत पत्र / मुद्रितेसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्यावतीने ज्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत, त्या सर्व पुरवणी मागण्यांना मी सुरवातीलाच पाठिंबा देते.

सभापती महोदय, बाब क्र.21, पान क्र.21 महसूल विभागाच्या बाबतीत सांगावयाचे आहे. पिंपळटक्का येथील श्री.विक्रम दादासराव यादव यांचे वय 45 वर्षे असून या शेतकऱ्याने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली आणि त्याचे कारण असे सांगण्यात येते की, त्यांची जमीन संपादित झालेली आहे पण त्याचा मावेजा वाटप होण्यास विलंब झाला आणि कमी भावाने मावेजा दिला गेला अशा प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

सभापती महोदय, यानंतर मी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 95 वरील बाब क्रमांक 94 बाब बोलणार आहे. बीड शहरातील ग्राहकांकडे महावितरणची 29 कोटी रुपयांची थकबाकी आहे. ती वसूल करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी एक फेरी सुध्दा काढली. शहराला दरवर्षी 133 मिलियन केव्ही वीज पुरवठा करण्यात येतो. पण फक्त 86 मिलियन केव्ही विजेची वसुली होते. 36 मिलियन केव्हीची वीज गळती आहे. एकूण 34 हजार वीज ग्राहक आहेत. 6 कोटी 83 लाख रुपयांची थकबाकी आहे. नगरपालिकेकडे 23 कोटी रुपयांची थकबाकी आहे. वीज चोरीचे गुन्हे 185 लोकांवर दाखल झालेले आहेत परंतु गंभीर बाब अशी आहे की, जर एखाद्या इलाख्यामध्ये काही लोक विजेची चोरी करीत असतील, विजेचे मीटर न बसविता कनेक्शन घेत असतील, आकडे टाकत असतील पण त्याच गल्लीमध्ये किंवा त्याच प्रभागामध्ये काही लोक 100 टक्के विजेच्या बिलाचा भरणा करतात तरी सुध्दा 10 ते 11 तासांचे जे लोडशेडींग होते त्या व्यवस्थेमध्ये कोठे तरी बदल करण्याची आवश्यकता आहे. शासनाने याकडे गांभीर्याने पहावे. जे लोक बिल भरत नाहीत त्यांना शिक्षा आणि जे बिल भरतात त्यांनाही शिक्षा हा न्याय बरोबर वाटत नाही.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 124 बाबत बोलणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये वर्षभरामध्ये फक्त 14 पुरुषांनी कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करुन घेतल्या व 5 हजार महिलांनी शस्त्रक्रिया करुन घेतल्या. खरे म्हणजे पुरुषांची शस्त्रक्रिया ही अधिक कॉम्प्लीकेटेड नसते. त्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. अंमळनेर, ता. पाटोदा, जिल्हा बीड या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्या ठिकाणी फक्त सकाळी 10.00 ते दुपारी 2.00 या वेळेत कामकाज चालते त्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्यात जावे लागते. पांगरी, कोतन, हतोला, सरदवाडी, पिंपळबंडी, आंबेवाडी, भडखेल, पांढरवाडी या गावचे ग्रामस्थ या दवाखान्यात येतात. पण त्या ठिकाणी इमारत नाही. इमारतीचे बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणी कर्मचारी सुध्दा नाहीत. अशी अवस्था असल्यामुळे लोकांना खाजगी दवाखान्यात जाऊन पैसे खर्च करावे लागत आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

सभापती महोदय, चखलंबा, ता. गेवराई, जि.बीड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्मचारी कमी आहेत. परिचारकांची 4 पदे रिक्त आहेत. लॅब टेक्निशियनचे 1 पद रिक्त आहे. क्लार्कचे 1 पद रिक्त आहे. एएनएमचे 1 पद रिक्त आहे. एलएचव्हीचे 1 पद रिक्त आहे. अशा प्रकारची परिस्थिती आहे. मेळघाट, जि. अमरावती येथे तीन महिन्यात 93 बालके कुपोषणाने दगावलेली आहेत अशी माहिती आहे. या सर्व प्रकरणांमध्ये शासनाने लक्ष घालून हे सर्व विषय कसे मार्गी लागतील याकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यात नेकनूर येथील स्त्री रुग्णालय वगळता जिल्ह्यामध्ये महिलांसाठी फक्त 50 खाटांचा कक्ष आहे. जिल्हा रुग्णालयातील हा कक्ष अपुरा पडत असल्यामुळे महिला रुग्णांचे हाल होत आहेत. बीड शहरात स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सकांनी शासनाकडे पाठविलेला आहे. जिल्हा रुग्णालयात, प्रसूती, गर्भपात, कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात महिला येतात. परंतु अपुऱ्या खाटांमुळे रुग्णालय त्यांना पुरेशा सुविधा देऊ शकत नाही. जिल्ह्यात दोनच स्त्री रुग्णालये आहेत. एक नेकनूर येथे 50 खाटांचे रुग्णालय आहे आणि अंबेजोगाईला 100 खाटांचे रुग्णालय आहे. पण अंबेजोगाई येथील रुग्णालयाचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही. त्यामुळे बीड येथील स्त्री रुग्णालयाचा जो प्रस्ताव आलेला आहे तो ताबडतोबीने शासनाने मंजूर करावा.

सभापती महोदय, यानंतर मी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पृष्ठ क्रमांक 159 वरील बाब क्रमांक 160 बाबत बोलणार आहे. फेज दारुरसह 14 गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना विद्युत पंप व पॅनल बॉक्स दुरुस्त झाल्यानंतर पुन्हा जलवाहिनी फुटून बंद पडलेली आहे. या बाबतीत शासनाने लक्ष द्यावे. अंबोजागाई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जोगाईवाडी शिवारातील पंप हाऊसमधून जुने मोठे इंजिन आणि लोखंडी खांब असे जवळपास 10 लाख रुपयांचे साहित्य चोरी गेलेले आहे. या बाबतीत शासनाने लक्ष द्यावे. आष्टी तालुक्यात 45 गावांना 75 टँकरने पाणीपुरवठा होतो. त्या ठिकाणी कायमस्वरुपी पाण्याची सोय कशी करता येईल याकडे शासनाने लक्ष द्यावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या संदर्भात मी बोलणार आहे. धुळे-सोलापूर हा नॅशनल हायवे बीड जिल्ह्यातील गेवराई शहरातून येथून जातो. त्या शहराच्या बाजूला रस्त्यावर न्यू हायस्कूल, शारदा विद्यामंदिर, सेंट झेवियर्स स्कूल, जनता विद्यालय इत्यादी शाळा आहेत. ओंढा नाका आणि शिवाजी चौकामध्ये हजारो मुले ये-जा करीत असतात आणि त्यांना रस्ता ओलांडावा लागतो. परंतु पोलीस यंत्रणा त्या ठिकाणी रहदारी नियमित करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करीत नाहीत. या दृष्टीने गृह विभागाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, अफूची शेती केल्यामुळे बीड जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. कोणत्याही गुन्ह्यामध्ये शिक्षा करीत असताना मोटीव्ह आणि इंटेन्शन या दोन गोष्टींना फार महत्व दिले जाते. त्यामध्ये अफूचा व्यवसाय करण्याचे इंटेन्शन होते का, अफूची शेती करण्यामागे खसखशीची शेती करण्याचा उद्देश होता की, अफू निर्माण करण्याचा उद्देश होता हे लक्षात घेऊन या बाबीकडे गांभीर्याने बघून त्या शेतकऱ्यांना कशा पध्दतीने मदत करता येईल याचा शासनाने निश्चितपणे विचार करावा अशा प्रकारची मागणी मी करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

सभापती महोदय, पान क्र.57 वरील बाब क्रमांक 64 वर मी माझे विचार मांडू इच्छिते. भंडारवाडी-नेकनूर या रस्त्यावरील 4.50 कोटी रुपये किंमतीच्या पाईप लाईनसाठी मजबूत असलेले सिमेंटचे रस्ते खणण्यात आले. परंतु तो रस्ता पुन्हा दुरुस्त करण्यात आला नाही आणि पाईप लाईनमधून पाणी सुध्दा आले नाही.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील सेलू व जातेगाव अशा अनेक गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे रस्ताची दुरवस्था झालेली आहे. या रस्त्यावरील पुलाचे काम अर्धवट राहिलेले आहे. पर्यायी कच्चा रस्ता चिखलाने माखून जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ठाकर-आडगाव-जातेगाव या रस्त्यावरील पुलाचे बांधकाम रखडलेले आहे. पर्यायी कच्चा रस्ता चिखलाने माखून जात असल्यामुळे बससेवा बंद पडलेली आहे. यासंबंधी शासनाने ताबडतोब उपायोजना करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महसूल खात्याच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना तुकारामकृत भानुदास चरित्रामध्ये दुष्काळाच्या संदर्भात चार ओळी लिहिलेल्या आहेत त्या वाचून मी माझे भाषण संपविते.

"देवा का रे तुवा पंढरी सोडली
गोडी तुज लागली भूषणाची
पंढरीत काय दुष्काळ पडिला
म्हणून येथे आला धावुनिया
म्हणे पांडुरंग बंदी पडलो
भीमा अंतरलो चंद्रभागा"

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी आणि माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्र.63 वरील बाब क्रमांक 70 वर मी माझे विचार मांडतो. मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये या संदर्भात असे आश्वासन दिले होते की, पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जाईल. नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या उप-निबंधक कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्याचा निर्णय घ्झेण्यात आला होता. या बाबी अंतर्गत एकूण 12 कामांचा समावेश केलेला आहे. मुद्रांक शुल्क व नोंदणी कार्यालयांची आपल्याला आवश्यकता असते. कारण या विभागामार्फत हजारो कोटी रुपयांचे उत्पन्न राज्याला मिळत असते. या कार्यालयांच्या ठिकाणी लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे आवश्यक आहे. कारण हजारो लोक रजिस्ट्रेशनच्या कामासाठी येत असतात. त्यांच्या बसण्याची व्यवस्था सुध्दा होणे आवश्यक आहे. या वर्षी गोंदिया जिल्ह्यात कडक उन्हाळा होता. मी स्वत: दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात रजिस्ट्रेशनच्या कामासाठी गेलो होतो. त्यावेळी मला स्वत:ला दोन तास उन्हामध्ये बाहेर थांबावे लागले होते. अशा प्रकारच्या कार्यालयाच्या ठिकाणी लोकांना आवश्यक असलेल्या बाबींची तरतूद केली नाही तर लोकांना गैरसोयींना सामोरे जावे लागते. त्यामुळे शासनाने या बाबीचा निश्चितपणे विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 26 वरील बाब क्रमांक 29 वर माझे विचार व्यक्त करीत आहे. मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे व्यवस्थापक, छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे व सर्वसाधारण मुद्रांक कार्यालय, मुंबई या कार्यालयांच्या वेतन, भत्ते प्रवास खर्च, भाडे, दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क, जाहिरात व प्रसिध्दी, कार्यालयीन खर्च, पुरवठा व मुद्रांकाची वाहतूक इत्यादीकरिता 50 कोटी रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, ही मागणी खूप महत्वपूर्ण आहे. हा विभाग राज्याला महसूल मिळवून देतो. त्यामुळे या कामासाठी टंचाई भासण्यापूर्वीच निधीची तरतूद करुन ठेवण्याची आवश्यकता होती हे मला खेदाने बोलावे लागत आहे. या कामासाठी पुरवणी मागणीमध्ये तरतूद करण्यापेक्षा

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

या कामाच्या निधीसाठी वेळेवर नियोजन करुन अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणे आवश्यक होते. जेणे करुन या खात्याच्या अधिकाऱ्यांवर पुरवणी मागणी सादर करण्याची वेळ आली नसती. पैशाची तरतूद वेळेवर करण्यात आली नाही तर उदाहरण म्हणून मी सांगेन की, जर या कार्यालयात वीज नसेल तर पंखे चालू शकणार नाहीत. अशा अनेकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी करण्यात आलेली मागणी अयोग्य आहे असे माझे म्हणणे नाही. ज्या माध्यमाद्वारे ही मागणी सादर करण्यात आली ती योग्य नाही.

यानंतर मी बाब क्रमांक 30 वर बोलू इच्छितो. दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे वैरणीच्या तुटवड्यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी व गुरांसाठी तात्पुरत्या गोठ्यांसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

या वर्षी राज्यात पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचाही दुष्काळ होता. त्यामुळे सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली होती की, शासनाने जनावरांच्या चाऱ्यांची व्यवस्था केली पाहिजे. जेणे करुन टंचाईच्या काळात जनावरांना तरी चारा मिळू शकेल. वैरणीच्या तुटवड्यासंबंधी शासनाने किती खर्च केला आहे ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

एकूण किती चारा आला, कंत्राटदारांना किती रकमेची बिले मंजूर केली, किती चा-याचे वाटप झाले या संबंधीचे विश्लेषण माननीय मंत्री महोदयांनी करावे. चारा वाटपाच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून आलेल्या आहेत. त्या बातम्यांचे खंडन होणे आवश्यक आहे. शेतक-यांचे प्रश्न लागेल तेवढया निधीची तरतूद करुन सोडविले पाहिजेत.

कृषि विभागाच्या पृष्ठ क्रमांक 35 वरील बाब क्रमांक 37मध्ये राज्यातील कोरडवाहू शेतीला स्थिरता आणण्यासाठी 50 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. कोरडवाहू शेतीच्या बळकटीकरणासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. कोरडवाहू शेतीचे बळकटीकरण कसे करणार हा देखील प्रश्न आहे. कोरडवाहू शेतक-याची प्रमुख अडचण ही सिंचनाची आहे. कोरडवाहू शेतीच्या सिंचनाची व्यवस्था झाली तर आपले राज्य शेती उत्पादनाच्या बाबतीत अग्रेसर राहील. राज्यातील 80 टक्के कोरडवाहू शेतीचे योग्य प्रकारे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मूळ अर्थसंकल्पामध्येच भरीव तरतूद करण्याची गरज आहे. आता ही 50 कोटी रुपयाची केलेली तरतूद पूर्णपणे कशी खर्च होऊ शकेल याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

पृष्ठ क्रमांक 35 वरील बाब क्रमांक 39मध्ये सूक्ष्म सिंचन योजनेसाठी 50 कोटीची तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये ठिबक सिंचनाची मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे. ठिबक सिंचनाच्या साहित्यासाठी शेतक-याला अनुदान दिले जाते. कोणतीही योजना अनुदानावर राबवित असताना त्यामध्ये लाभार्थ्याचा सहभाग असेल तरच ती योजना यशस्वी होते. ही सूक्ष्म सिंचन योजना राज्यामध्ये व्यापक प्रमाणावर राबविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 36 वरील बाब क्रमांक 41मध्ये रोजगार हमी योजना कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती/नवबौद्ध कुटुंबीयांकरिता बांधण्यात आलेल्या विहिरीवर विद्युतपंप बसविण्यासाठी 1 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. ही योजना राबवित असताना या योजनेचा लाभ लाभार्थ्याला ख-या अर्थाने मिळतो का हे देखील पहाण्याची गरज आहे. कारण जेव्हा हे विद्युतपंप गरीब शेतक-यांना देण्यात येतात त्यावेळी बरेचसे शेतकरी ते विकतात त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट साध्य होत नाही. तेव्हा शेतक-याला विद्युत पंप दिल्या नंतर तो त्याच्या विहिरीवर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

कार्यान्वित आहे की नाही, त्यापासून तो शेतीचे उत्पादन घेत आहे की नाही याची पाहणी दर तीन-सहा महिन्यानी कृषि विभागाच्या अधिका-यांमार्फत करणे आवश्यक आहे. जर लाभार्थ्यांनी योजनेचा फायदा घेऊन विद्युतपंप विकले असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई केली गेली पाहिजे.

....नंतर श्री. अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..

बाब क्रमांक 45, पृष्ठ क्रमांक 37- पशुसंवर्धन विभाग - कुक्कट विकास योजनेसाठी 1 कोटी 54 लाख 78 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येतो. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ज्या कोंबड्यांचे वाटप करण्यात येते त्याचा उपयोग लाभार्थ्यांना होतो काय ? कारण या कोंबड्या माणसांच्या पोटात जातात असा आमचा समज आहे. पंचायत समितीमार्फत मिळणाऱ्या या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ मिळतो काय हे पाहण्याची गरज आहे. पंचायत समिती सदस्य आणि त्यांच्या अवतीभोवती असणारी मंडळी या योजनेचा लाभ घेतात. ग्रामीण भागातील गरीब लोकांना उपजीविकेचे साधन मिळावे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी, तो समृध्द व्हावा यासाठी ही योजना आणलेली आहे. परंतु या योजनेचा लाभ लाभार्थ्यांला मिळत नाही. तेव्हा शासनाने या योजने संदर्भातील निकष ठरविले पाहिजेत आणि तशा सूचना लाभार्थ्यांना दिल्या पाहिजेत. तसेच या योजनेचा लाभार्थ्यांना फायदा होतो किंवा कसे याचा देखील तपास झाला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

बाब क्रमांक 31, पृष्ठ क्रमांक 27 - महसूल व वन विभाग - नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या कापूस, सोयाबिन आणि भात यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता 400 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. परंतु सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. मागील वर्षी देखील दुष्काळ होता. या वर्षी देखील तशीच परिस्थती आहे. तेव्हा दोन्ही सभागृहाने या पुरवणी मागण्या मंजूर केल्यानंतर पंधरा दिवसात ही मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्यास त्यांना काहीतरी दिलासा मिळू शकेल. त्यांना परमेश्वर भेटल्यासारखे वाटेल. सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांना मिळत नाही असा अनुभव मला देखील आलेला आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अजून पॅकेज मिळालेले नाही. तेव्हा गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने पॅकेज द्यावे अशी मी आपल्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..

बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 27 - पाणी पुरवठा विभाग- टंचाईग्रस्त भागात पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी 50 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. आम्ही या ठिकाणी अशासकीय विधेयक मांडतो त्यावेळी माननीय मंत्री महोदय "सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची दखल घेण्यात येईल" असे आश्वासन देऊन आम्ही ते अशासकीय विधेयक मागे घ्यावे अशी आम्हाला विनंती करतात. परंतु नंतर माननीय मंत्री महोदय दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करीत नाहीत. महाराष्ट्रातील कायम स्वरुपी पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी प्रभावीपणे उपाय योजना करण्याची गरज आहे. तेव्हा या कामासाठी एकदाच जास्तीचा निधी देऊन कायम स्वरुपी पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 28 - वन विभाग- वन गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रतिबंध करण्यासाठी गुप्तचर सेवा पुरविण्यासाठी 50 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. जंगलाला लागून असलेल्या शेतीचे माकड फार मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. तेव्हा जंगलाला लागून असलेल्या शेतीला सोलर फेसिंगची व्यवस्था करु शकलो तर माकडापासून शेतीचे नुकसान होणार नाही. तसेच आपण शेतकऱ्यांना पीक नुकसानीसाठी जे अनुदान देतो त्या अनुदानाची गरज लागणार नाही. तेव्हा माझ्या मागणीचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा शासनाने निश्चितपणे विचार करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आणखी दहा-बारा सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावे.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : ज्यावेळी राज्यामध्ये वाघांची संख्या वाढली, त्यावेळी माननीय वन मंत्र्यांचे सभागृहाने अभिनंदन केले होते. आता राज्यात माकडांची संख्या वाढली आहे, त्यास जबाबदार कोण, या बाबतीत कोणाचे अभिनंदन करावयाचे ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी पुरवणी मागण्यांवर आपले मत व्यक्त करावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग, पृष्ठ क्रमांक 113,बाब क्रमांक 115 विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना यासाठी पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. आपण हे वर्ष स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. उपेक्षित समाज, दबलेला समाज, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय हा केंद्रबिंदू समजून स्व.यशवंतराव चव्हाण यांनी या राज्याचा राज्य कारभार केलेला आहे. राज्य शासनाने त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून ही क्रांतीकारी योजना अंमलात आणली आहे. मागील आठवडयांत या विषयाच्या बाबतीत माझा तारांकित प्रश्न लागला होता. परंतु सभागृहात गोंधळाची परिस्थिती होती व तो प्रश्न पुकारुन देखील मी त्या प्रश्नाच्या अनुषंगाने उप प्रश्न विचारु शकलो नाही. ही क्रांतीकारी योजना अपेक्षित समाजासाठी शासनाने आणलेली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती हा समाज महाराष्ट्राच्या घाटात, दऱ्याखोऱ्यात विखुरलेला आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक गावात या समाजातील काही लोकांना काही घरे बांधून देणार आहात. परंतु ही योजना अत्यल्प स्वरुपातातील आहे असे माझे मत आहे. महाराष्ट्रात विमुक्त जाती आणि भटक्या समाजाची 50 लाख एवढी लोकसंख्या आहे. या सर्व लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा कसा देता येईल या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

सभापती महोदय, राज्य शासनाने घरकूल योजना, दलित वस्ती सुधार योजना अनुसूचित जाती या प्रवर्गातील घटकांसाठी आखलेली आहे. या विविध योजनांचे सुमारे 500 कोटी रुपये सामाजिक न्याय विभागाकडे अखर्चित राहिले आहेत. या बाबतीत सामाजिक न्याय विभागाने भाष्यही केलेले आहे. सामाजिक न्याय विभागाकडे विविध योजना राबविण्यासाठी प्राप्त झालेला कोट्यवधी रुपयांचा निधी कोणत्याही योजनांवर खर्च न करता तसाच पडून आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. मी सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांना या निमित्ताने विनंती आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती, तसेच दबलेला आणि जो उपेक्षित समाज आहे, त्या समाजांचा विकास करण्यासाठी प्राप्त झालेला संपूर्ण निधी खर्च केला गेला पाहिजे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, वित्त विभाग, पृष्ठ क्रमांक 49, इतर खर्चासाठी अतिरिक्त पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. शताकानुशतके विठ्ठल नामाच्या प्रचारासाठी आवाज उठविणाऱ्या तीर्थक्षेत्र पंढरपुरासाठी शासनाने मंजूर केलेला 218 कोटी रुपयांचा निधी काही कारणास्तव वापर न करता तसाच पडून राहिला आहे. पूर्वी या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे होते. तो सोलापूरचे सुपूत्र आहेत. पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी 150 वर्षानंतर पांडुरंगाच्या गाभाऱ्यात शिरण्याच्या पहिला मान माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांना मिळाला. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांना पूजा करण्याच्या मान मिळाला त्यावेळी माननीय श्री.विजयसिंह मोहिते पाटील देखील उपस्थित होते. तसेच माननीय उप मुख्यमंत्रीही उपस्थित होते. त्यावेळेला त्यांनी 218 कोटीची पंढरपूर तीर्थक्षेत्र प्राधिकरण योजना घोषित केली. ही संपूर्ण रक्कम अखर्चित राहिली आहे. ती संपूर्ण रक्कम पंढरपूर तीर्थक्षेत्र प्राधिकरण योजनेवर खर्च करण्यात यावी.

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पान क्रमांक 163, बाब क्रमांक 164, साहित्य, कला इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना आर्थिक सहाय्य यासाठी पुरवणी मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. कोकण विभागामध्ये दशावतारी नाटयप्रयोग करणारे कलांवत आहेत. त्या कलावंताचे वय 80 ते 90 च्या दरम्यान आहे. दशावतारी नाटयप्रयोग करणारे ज्येष्ठ कलावंत आहेत, तसेच दशावतारी नाटयप्रयोग करणारे अतिशय सिनीयर कलावंत आहेत, त्यांच्या मानधनात देखील वाढ करण्यात यावी.

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, उद्योग,ऊर्जा आणि कामगार विभागाच्या बाबतीत पान क्र.91 आणि बाब क्रमांक 91 वर बोलत असताना देशातील असंघटित कामगारांच्या विकासासाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर राष्ट्रीय संघटित कामगार आयोगाची स्थापना करण्याची शिफारस केंद्रीय कामगार मंत्रालयाला करावी अशी मी यानिमित्ताने विनंती करीत आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 173, बाब क्रमांक 172 अंतर्गत दलितांचे कैवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र ग्रंथाचे उर्वरित खंड लवकर प्रकाशित करावेत अशी आग्रहाची विनंती करीत आहे.

धन्यवाद.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत बोलत असताना 582.86 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे. गुजरात राज्यात आणि आपल्या राज्यात ही योजना राबविण्याचे ठरविलेले आहे. आज राज्यामध्ये ऊस तोडणी कामगारांचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे कारखान्यांना ऊस पुरवठा करणे अवघड झालेले आहे. राज्य शासनाने नवीन योजना हाती घेतली आहे. ऊसतोडणीकरिता मशीन खरेदीसाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे. गुजरात राज्याने या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ऊस तोडणी मशीन खरेदीसाठी 50 टक्के अनुदान देण्याचे जाहीर केलेले आहे. आपल्या राज्यामध्ये 25 टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, पैसे केंद्र शासनाचे असल्यामुळे अनुदानात कपात करण्याची आवश्यकता नाही. राज्य शासनाने देखील मशीन खरेदीसाठी 50 टक्के अनुदान द्यावे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत 41 कोटी 48 लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर करण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्हयामध्ये गेल्या 6-7 वर्षापासून रस्त्यांची अवस्था चांगली नाही. माननीय श्री. भुजबळ साहेबांना मी आग्रहाने सांगू इच्छितो की, सोलापूर जिल्हयातील रस्त्यांच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. सोलापूर जिल्हयामध्ये तुकाराम आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या पालख्या आषाढी वारीसाठी येत असतात. त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होते आणि वारकऱ्यांना देखील त्याचा त्रास होतो. म्हणून दोन्ही पालखी मार्गावरील रस्त्यांचे चौपदरीकरण करावे अशी मी विनंती करतो. तशा प्रकारची मागणी देखील वारकऱ्यांनी केलेली आहे त्याकडे बारकाईने लक्ष द्यावे. पालखी मार्गावरील जी मोठी गावे आहेत ती प्राथम्याने पूर्ण करावीत. सोलापूर जिल्हयातील रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी 100 कोटींची तरतूद करावी अशा प्रकारची आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, सोलापूर जिल्हयामध्ये माळशिरस येथे 18.12.2004 रोजी जिल्हा न्यायालयाची स्थापना करण्यात आली. त्यावेळी जमीन उपलब्ध नव्हती. बांधकाम मंत्री याठिकाणी बसले आहेत. त्यांचा हा विषय नसला तरी मी त्यांना आग्रहाची विनंती करतो की, विधी व न्याय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना व मला बोलावून एकत्र बैठक घ्यावी. कारण याठिकाणी जिल्हासत्र न्यायालय झालेले आहे परंतु राहण्याची व्यवस्था नाही. ती करुन द्यावी अशी आग्रहाची विनंती करतो.

नंतर श्री. खर्चे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र. 99, पृ.क्र. 100-ग्रामविकास विभाग, या बाबीनुसार राष्ट्रीय समान विकास योजना आणि मागास भागासाठी अनुदान निधी योजना राबविण्यासाठी शासनाने 311 कोटीची तरतूद केली आहे. पण यात केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा हिस्सा किती प्रमाणात आहे याचा अर्थ बोध होत नाही, तो स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच 13 व्या वित्त आयोगानुसार 188 कोटीचे वितरण जिल्हा परिषदा व ग्राम पंचायतींना करण्याची तरतूद केली आहे. खरे तर स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी व अधिक लोकाभिमुखता वाढविण्यासाठी, त्यात पारदर्शकता आणण्यासाठी तसेच सत्तेचे विकेंद्रीकरण करुन प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत योजनांचे फायदे पोहचविणे असे मुख्य उद्देश या योजनांमागे असतात. पण त्यामध्ये अडथळ्यांच्या शर्यती केल्या जातात. त्यातून टक्केवारी घेतली जाते म्हणून अशा योजनांचे फायदे रुट लेव्हलपर्यंत पोहचत नाहीत. या निमित्ताने माझी विनंती आहे की, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायतींच्या माध्यमातून या योजना प्रभावीपणे कशा राबविल्या जातील आणि त्यातून भ्रष्टाचार तसेच व्हेस्टेड इंटरेस्ट कसे बाजूला करता येतील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच आवश्यक वाटल्यास या सर्व चौकशीसाठी उच्च स्तरीय समिती गठित करावी अशीही माझी सूचना आहे.

महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून बाब क्र. 112 व पृ.क्र. 112 नुसार शासनाने अनुदानित अनुसूचित जातींच्या मुलींसाठी शासकीय वसतिगृहाची सोय करण्यासाठी अतिरिक्त 12 कोटीची मागणी केली आहे. मात्र राज्यात खाजगी शिक्षण संस्थांनी चालविलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या मुला-मुलींसाठी दरडोई रक्कम देण्यासाठी आार्थिक तरतूद असली तरी या संस्थंमध्ये अल्प वेतनावर वर्षानुवर्षे काम करीत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना रितसर वेतनश्रेणी देणे यासाठी कोणतीच तरतूद केलेली दिसत नाही. या निमित्ताने मी अशी विनंती करतो की, खाजगी शिक्षण संस्थांमार्फत जी अनुसूचित जाती व जमातीच्या मुला-मुलींसाठी वसतिगृहे चालविली जातात त्यांनाही योग्य न्याय द्यावा.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

बाब क्र. 113, पृ.क्र. 113 - या बाबीनुसार अनुसूचित जाती-जमातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी आश्रमशाळांसाठी अतिरिक्त 12 कोटीची मागणी केली असून त्यातून सामुग्री आणि पुरवठा करावयाचा आहे. परंतु राज्यभर खाजगी शिक्षण संस्थांनी चालविलेल्या 288 मुला-मुलींच्या केंद्रीय आश्रमशाळांसाठी आर्थिक तरतूद करण्याचे मान्य करुनही तशी तरतूद केली नाही. या शाळांमध्ये गेली दहा वर्षे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपासमार होत आहे, त्यांना पुरेसे वेतन मिळत नाही, त्यांना न्याय दिला पाहिजे. तसेच लाभार्थी असलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या मुलांच्या केंद्रीय आश्रमशाळेसाठी तात्काळ भरीव तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सहकार विभाग, बाब क्र. 145 ते 148 या चारही प्रकारच्या तरतुदींच्या माध्यातून 70 कोटीची मागणी सहकार विभागाने केली आहे. खरे तर त्याबद्दल मी शासनाचे स्वागत करतो. पण त्याचबरोबर सहकारी संस्था दिवसेदिवस मोडीत निघत आहेत. तसेच सहकारी साखर कारखाने इ ापाट्याने बंद पडत आहेत, सहकारी सूत गिरण्या सुध्दा बंद पडत आहेत. सहकारी पत संस्था सुध्दा 50 टक्क्याच्या वर चालत नाहीत अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँका सुध्दा दिवाळखोरीत निघत आहेत. सहकारी चळवळीतील भ्रष्टाचार व भ्रष्टाचाऱ्यांना अद्दल घडावी व सहकार चळवळ सक्षम बनविण्यासाठी विशेष तरतूद आणि योजना राबविण्याची नितांत आवश्यकता आहे. या निमित्ताने मी शासनाला विनंती करु इच्छितो की, सहकार चळवळ वाचविण्यासाठी व ती अधिक मजबूत करण्यासाठी विशेष योजना राबविण्याचा शासनाने विचार करावा. अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक): सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभागाच्या बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 15 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मुंबई शहराच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरून प्रवाशी जलवाहतूक सुरु करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे मुंबई शहराच्या किनाऱ्यावरुन 50 वर्षापूर्वीच प्रवाशी जहवाहतूक सुरु करावयास पाहिजे होती परंतु उशिरा का होईना आपण हा निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता जलवाहतुकीचा जो निर्णय घेतला तो अतिशय चांगला असून हा विषय गृहविभागाकडे कसा काय आला त्याबद्दल आमच्या मनात शंका आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 20 वरील चौकशी आयोगाच्या खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आज अनेक प्रकारच्या, अनेक अधिकाऱ्यांच्या चौकशा सुरु आहेत. मी गृह राज्यमंत्र्यांकडून जाणून घेऊ इच्छितो की, किती पोलीस अधिकाऱ्यांच्या चौकशा सुरु आहेत, किती पोलीस अधिकारी चौकशीच्या नावाखाली घरी बसून पगार घेत आहेत याचीही माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 21-22, पृष्ठ क्रमांक 21 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. भूमी अभिलेख कार्यालयासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीन जमीन मोजणी हा फार महत्वाचा प्रश्न आहे. बांधाच्या भांडणावरुन खून झाल्याचे आपल्याला माहिती आहे. माननीय राधाकृष्ण विखे-पाटील हे महसूल मंत्री असतांना त्यांनी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी मोजून देऊ अशी घोषणा या सभागृहात केली होती. परंतु या घोषणेचे पुढे काय झाले त्याची आम्हाला माहिती मिळाली नाही. माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे कोणतेही खाते आले की, ते चांगल्या प्रकारचे काम करीत असतात. (अडथळा)

सभापती महोदय, दुष्काळावर मात करण्यासाठी गुरांसाठी गोठा बांधणे, चारा उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आज सुध्दा महाराष्ट्रातील 75 टक्के भागात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

पाऊस पडलेला नाही. टँकरने पाणी पुरवठयाची जी काही मुदत दिलेली आहे त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत पाऊस पडत नाही, नळ पाणी पुरवठा योजनेत जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत टँकरची मुदत वाढवून दिली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 38 वर राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना स्थिरता आणण्यासाठी कार्यक्रम हाती घेतला आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांचा विचार शासन करीत असल्यामुळे मी शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सुक्ष्म सिंचन योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजना उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे व त्यासाठी सूक्ष्म सिंचनासाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील घरामागील जागेत कुकुट विकास करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. कुक्कुट विकास म्हणजे काय या योजनेचा आम्हाला बोध झालेला नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 51, पृष्ठ क्रमांक 38 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र राज्य मेंढया व लोकर विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आमचे सहकारी श्री. शेंडगे साहेब शेळी मेंढी विकासासाठी सातत्याने पैशांची मागणी करीत असतात परंतु शासनाने उशिरा का होईना मदत केल्यामुळे मी शासनाचा आभारी आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. नवीन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर जनतेसाठी काही तरी केले पाहिजे असे प्रत्येकाला वाटत असते. माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांनी महाराष्ट्र सदनाचे काम हातामध्ये घेतले व ते पूर्ण केले. आता त्याचे उद्घाटन होणार आहे. सेव्हन स्टार हॉटेल सारखे महाराष्ट्र सदन बांधण्यात आले आहे. एवढ्या चांगल्या सुविधा पुरविण्याचे काम माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब यांच्या मुळे झाले आहे. त्यामुळे त्यांचे मनापासून अभिनंदन करावे लागेल.

सभापती महोदय, माननीय सामाजिक न्याय मंत्री देखील सभागृहात बसले आहेत. समाजाला न्याय देण्यासाठी त्यांचा सातत्याने प्रयत्ने सुरू असतो. आश्रमशाळांसंबंधी वर्तमानपत्रातमध्ये एकना एक बातमी असते. या निमित्ताने मी शासनाकडे मागणी करणार आहे. समाजकल्याण विभागांतर्गत अनेक योजना राबविण्यात येतात. त्यामुळे शाळेकडे बघण्यासाठी त्यांना वेळच उपलब्ध होत नाही. त्यामुळे समाजकल्याण विभागाकडे असलेल्या आश्रमशाळा वेगळ्या केल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे. तसेच इतर योजना देखील वेगळ्या केल्या पाहिजेत. यासाठी स्वतंत्र योजना तयार केली पाहिजे अशी मागणी या निमित्ताने करतो आणि वेळे अभावी माझे चार मुद्दे बाजूला ठेवून येथेच थांबतो.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पाणी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 160, पान क्र.159 वर मी बोलण्यासाठी उभा आहे.

ग्रामीण भागामध्ये अनेक पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येतात. ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्यासाठी विहिरीच्या माध्यमातून किंवा अन्य स्रोतामार्फत पाणी घेतले जाते. हे पाणी अत्यंत खराब असते. त्यात कचरा असतो. ते पिण्यायोग्य नसते. ते पाणी नळपाणी योजनेद्वारे दिले जाते. आपण ग्रामपंचायतीच्या स्तरावर पाणी पुरवठा योजना घेतो. आपल्या राज्यात 27000 ग्रामपंचायती आहेत. यापैकी काही ग्रामपंचातींनी अशा प्रकारच्या योजना सुरू केलेल्या आहेत. 27000 ग्रामपंचायतीमध्ये पुढच्या पाच वर्षात फिल्टरेशन प्लांट किंवा वॉटर सॉफ्टनिंग प्लांट बसविणे शक्य आहे. अत्यंत कमी खर्चामध्ये हे प्लांट बसू शकतात. ग्रामपंचायतीसाठी आपण दहा हजार पाण्याचे टार्गेट ठेवले तर पाच ते सहा लाख रूपयापर्यंत प्लांट उपलब्ध होऊ शकतात. ते प्लांट आमदार फंडातून बसविण्यासाठी नियोजन विभागाच्या माध्यमातून परवानगी दिली तर अनेक ग्रामपंचायती मध्ये वॉटर फिल्टरेशन प्लांट बसविता येतील. वॉटर बोर्न डिसिसच्या माध्यमातून आपला खर्च वाढतो. वॉटर बोर्न डिसिसमुळे रोगराई निर्माण होते ती सुद्धा कमी होईल. अशाने लोकांचे आरोग्य चांगले राहील हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर मी ऊर्जा विभागावरील बाब क्र.94, पान क्र.95 वर बोलणार आहे. आपण वीज निर्मितीच्या अनेक योजना करतो. वीज वितरणामध्ये अनेक त्रुटी दिसतात. ग्रामीण भागातून ओव्हर हेड वायर्स जातात. त्या झाडावरून जातात. दरवर्षी ही झाडे ट्रीम केली जातात. पहिला पाऊस आला की, सुरूवातीचे 8 ते 10 दिवस वीजच नसते. वर्षभरात आठवड्यातून दोन दिवस वीज शटडाऊन घेतले जाते. त्या शटडाऊन मध्ये ते काय करतात हेच कळत नाही. त्याची कुठेतरी माहिती मंत्रिमहोदयांनी घेतली पाहिजे की,कोणकोणत्या विभागामध्ये किती वेळा शटडाऊन घेतले आहे. आपल्या लाईन्स जुन्या झालेल्या आहेत. त्या

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे .....

बदलण्याचा कार्यक्रम आपण मोठ्या प्रमाणावर हाती घेतला पाहिजे. अनेक गावे ही एकाच फिडरवर जात आहेत. एका गावामध्ये विजेचा प्रश्न निर्माण झाला तर 25 गावांची वीज बंद केली जाते. यामध्ये सुधारणा केली पाहिजे. अंडरग्राऊंड वायर्स घालून फिडर द्याव्या व त्याचे सर्किट वेगवेगळे करण्याचा कार्यक्रम केला तर ज्या जागावामध्ये वीज गेली त्याच गावामधील वीज बंद करण्याची सुविधा होईल आणि इतर गावांना त्याचा त्रास होणार नाही अशी उपाययोजना केली तर त्यातून चांगला लाभ होईल व विजेचा अपव्यय देखील टाळता येईल.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 102 व पृष्ठ क्रमांक 101 बाबत मी अनेक योजनांची माहिती घेतली. ग्रामपंचायतीच्या पातळीवर खुल्या गटाराच्या योजना हाती घेतल्या जातात. परंतु त्या ठिकाणी कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे ती गटारे कचऱ्याच्या माध्यमातून पुन्हा भरली जातात. अशा ठिकाणी गटार योजनांचा काहीही उपयोग होत नाही. या करिता ग्रामपंचायतीच्या स्तरावर आपण घन कचऱ्याचे व्यवस्थापन केले पाहिजे. त्या ठिकाणी ओला कचरा व सुका कचरा वेगळया पध्दतीने गोळा करण्यात आला पाहिजे. ओल्या कचऱ्याच्या माध्यमातून खताची निर्मिती केली पाहिजे. या करिता ग्रामपंचायतीला प्रोत्साहनपर आर्थिक बळ दिले पाहिजे. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने या गोष्टी करणे अत्यंत आवश्यक आहेत असे मला वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 64 आणि पृष्ठ क्रमांक 57 मध्ये मंत्रालयाच्या इमारतीला लागलेल्या आगीनंतर मोठया प्रमाणात दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्या संदर्भात माझी माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांना विनंती आहे की, मंत्रालयामध्ये दुरुस्तीची कामे करीत असतांना त्यामध्ये नवीन प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. आज बाजारामध्ये अनेक प्रकारची केमिकल्स आलेली आहेत. जेणेकरुन त्यांचा वापर करुन गनायटींग,प्लॅस्टरींगची कामे वेगवेगळया पध्दतीने केली जातात. अशाप्रकारे केमिकल्सचा वापर केल्यानंतर त्या इमारतीचे आयुष्य देखील वाढते. त्यामुळे मंत्रालय दुरुस्तीच्या कामामध्ये केमिकल्सचा वापर आपण केला तर त्याचा फायदा होईल.

त्याचप्रमाणे आज राज्यामध्ये ठिकठिकाणी पुलांचे बांधकाम केले जात आहे. त्या बांधकामामध्ये सुध्दा केमिकल्सचा वापर केला तर पाण्याचा एक थेंब देखील कॉंक्रिटमध्ये झिरपणार नाही. त्यामुळे त्या बांधकामाचे, कॉंक्रिटचे आयुष्य 25 ते 30 वर्षे वाढू शकते. अशाप्रकारे ओव्हर पुटींगची कल्पना आपण स्वीकारली तर त्या बांधकामाचे आयुष्य निश्चितपणे वाढेल. त्याचा वापर आपण बांधकामामध्ये करावा अशी विनंती करुन आणि पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता आपण मला संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो.

सभापती महोदय, मी सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 111, 112 आणि 113 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. बाब क्रमांक 111 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनासाठी फर्निचर पुरविण्यासाठी त्याशिवाय अधिकाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक खर्चासाठी एकूण 2 कोटी 14 लाख 96 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये अधिकाऱ्यांचे वेतन व अनुषंगिक खर्चासाठी 1 कोटी 14 लाख 96 हजारांची तरतूद करण्यात आली आहे तर मग या तरतुदीपैकी 1 कोटींची तरतूद कशासाठी करण्यात आली आहे ? या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे. या मागणीमध्ये फर्निचरचा उल्लेख झाला असल्यामुळे आपण 1 कोटी रुपयांचे फर्निचर खरेदी करणार आहात काय याची माहिती मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 112 आणि 113 मध्ये वसतिगृहांच्या सक्षमीकरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील अनेक वसतिगृहांचे सक्षमीकरण व्हावयास पाहिजे. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी आवश्यक तो खर्च व्हावयास पाहिजे. राज्यामध्ये दोन प्रकारची वसतिगृहे आहेत. यापैकी एक शासकीय वसतिगृह असून दुसरी वसतिगृहे अनुदानित संस्थामार्फत चालविली जातात. संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहांना 100 टक्के अनुदान मिळते. त्या मधून विद्यार्थ्यांचा खर्च आणि त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च भागविला जातो. त्याचप्रमाणे शासकीय वसतिगृहांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे नियमितपणे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन इत्यादी सुविधा मिळतात. परंतु त्याचबरोबर त्या वसतिगृहांमध्ये अधीक्षक, स्वयंपाकी व अन्य कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणत्याही प्रकारचे नियमित वेतन मिळत नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना पेन्शनची सोय नाही. तसेच भविष्यनिर्वाह निधीचा फायदा मिळत नाही. त्यांना अत्यंत अल्पशा मानधनावर राबवून घेतले जात आहे. याबाबतीत आम्ही सामाजिक न्याय विभागाच्या माननीय मंत्री महोदयांकडे हा विषय मांडला आहे. याबाबत अनेक वेळा संघटनांकडून आंदोलने करण्यात आली, चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा यामध्ये लक्ष घातलेले आहे.

सभापती महोदय, आपण सुध्दा याबाबतीत पुढाकार घेऊन दोन वेळा बैठक आयोजित केली होती परंतु ती बैठक होऊ शकली नाही. आता सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी आपल्याला पुन्हा एकदा पत्राव्दारे अशी विनंती केलेली आहे की, आपणच याबाबतीत पुढाकार घेऊन अनुदानित संस्थांच्या वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून एक बैठक घ्यावी आणि त्यांचा प्रश्न मार्गी लावावा. पण यासंदर्भात पुढे काय झाले ते समजले नाही. सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांकडून या विषयाच्या बाबतीत पुढे काय कार्यवाही झाली? तर कार्यवाही झाली नसेल तर लवकरात लवकर या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून कोणती उपाय योजना करण्यात येणार आहे याची माहिती यानिमित्ताने मिळावी अशी विनंती करतो.धन्यवाद.

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्र.163 पान क्र.163 आणि बाब क्र.164 व सपान क्रमांक 163 पर्यटन व सांस्कृतिक विभागाबाबत बोलावयाचे आहे.

सभापती महोदय, पर्यटनाचा विषय आल्यानंतर आपण सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाचा दर्जा दिलेला आहे. पण तेथील ज्या सोयी-सुविधा आहेत त्याबाबत सांगावयाचे तर रस्ते आणि इतर बाबींसाठी सदनामध्ये वारंवार सांगितले जात आहे. परंतु त्यातील ज्या उणीवा आहेत, त्या अजूनही तशाच शिल्लक आहेत. अंबोली येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी आराखडे तयार करुन तीन वर्षे झालेली आहेत. पण सर्व काम "जैसे थे"आहे. अजूनही अंबोलीच्या घाटातील रस्त्याचे काम होत नाही अशा प्रकारच्या वेगवेगळ्या बातम्या पेपरमधून वाचावयास मिळत आहेत. यामध्ये कदाचित सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी सीआरझेड कायदा किंवा पुरातत्व विभागाच्या अडचणीमुळे काही प्रकल्प रखडलेले असतील. पण माझी माननीय श्री.छगन भुजबळ साहेबांना विनंती आहे की, भुजबळसाहेब, कोकणातील पर्यटनाच्या विकासासाठी सी-वर्ल्ड सारखे मोठे प्रकल्प खाजगी सहभागातून उभरण्याचा शासनाचा विचार आहे आणि आपणही तसे सांगितले आहे. याबाबतीत पुढे काही कृती झालेली आहे काय ? तसेच हे प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी किती काळ लागणार आहे हा प्रश्न आहे. कारण पर्यटनामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकास होईल पण त्याही पेक्षा तेथे रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

सभापती महोदय, आपण वारंवार या सभागृहामध्ये गोवा आणि केरळचे उदाहरण देतो. तेथील राज्याचा कारभार यावरच चलत आहे. पण आपल्याकडे एका जिल्ह्याचा विकास होण्यासाठी, रोजगार निर्मिती होण्यासाठी जर आपण लक्ष दिले तर पुष्कळशा गोष्टी होण्यासारख्या आहेत. म्हणून राज्यातील विविध सर्कीट विकसित करण्याचे काम सुरु आहे. त्यात कोस्टल लाईन सर्कीट जसे समुद्र किनाऱ्याच्या ठिकाणी असलेली ठिकाणी तसेच फोर्ट सर्कीट म्हणजे राज्यात विविध ठिकाणी असलेले किल्ले, बुद्धीस्ट सर्कीट तसेच गौमत बुध्दांचा सहवास तसेच संपर्क असलेली ठिकाणे, इको टुरिझम सर्कीट, पर्यावरण स्नेही विकास करण्यासाठी असलेली ठिकाणे आणि वर्ल्ड लाईफ सर्कीट म्हणजे विदर्भात असलेले ताडोबा सारखे म्हणजे वन्य जीवनाचे सर्कीट अशा प्रकारच्या बाबींचा विकास करावयास पाहिजे.

सभापती महोदय, आपण पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र राज पर्यटन विकास महामंडळाची स्थापना केली. पण ही खेदाची गोष्ट आहे की, पर्यटन विकास महामंडळाला ॲम्बेसेडर म्हणून एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चेहेरा देण्याच्या बाबतीत सगळीकडे बातम्या आल्या आणि आपल्यावर श्री.सचिन तेंडूलकर किंवा सौ.माधुरी दिक्षित नेने यांच्यासारखा चेहेरा शोधण्याची परिस्थिती आली आणि त्या विषयी भरपूर बातम्याही आल्या. पण मला असे वाटते की, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाला मुंबई सारख्या शहरामध्ये किंवा राज्यामध्ये एक चेहेरा मिळू नये ही वाईट गोष्ट आहे. मार्केटींग करताना जर एखादा अलंकार चांगला असेल तर त्यासाठी आकर्षक अशी पेटी किंवा डबी घेणे गरजेचे आहे. पण त्यासाठी मूळामध्ये तो अलंकार चांगला असण्याची गरज असल्यामुळे महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाला आणखी काही ठिकाणी लक्ष देण्यासारखे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक किल्ले आहेत, लेणी आहेत, मंदिरे आहेत, चांगले समुद्र किनारे आहेत.

सभापती महोदय, आताच "मातृभूमी यात्रा" या केरळच्या प्रसिध्द पर्यटन मासिकाचे अधिकारी महिन्याभरापूर्वी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी सिंहगड, प्रतापगड, अष्टविनायक पाहिले. नंतर त्यांनी असे सांगितले की, त्यावेळी आम्हाला त्या-त्या भागाची माहिती देणारे किंवा विचारपूस करणारे कोणीही भेटले नाहीत.त्यामुळे याठिकाणी बाहेरुन येणाऱ्या लोकांना
शास्त्रशुध्द माहिती देणारे पथक किंवा त्यापध्दतीने अभ्यासक्रम आखला तर आपण कोकणचा जास्त विकास करु शकतो.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

ज्याला आपण गाईड म्हणतो ते तयार होतील. त्याचबरोबर रत्नागिरी, अलिबाग या दोन ठिकाणी तरंगती हॉटेल्स उभारण्याचा प्रस्ताव एमटीडीसीने दिलेला आहे. पण तरंगत्या हॉटेलचा पुढचा अभ्यास किंवा ते करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, त्यासाठी कोणत्या परवानग्या घेतल्या गेल्या आहेत ? अलिबाग आणि रत्नागिरी या ठिकाणी इतर राज्यांसारखी तरंगती हॉटेल्स करणार आहोत का ? अशा पध्दतीचा उद्योग त्या ठिकाणी आणण्यासाठी आपण काही खाजगी उद्योजकांना निमंत्रित केले आहे का ? जर खाजगी उद्योजकांना निमंत्रित केले तरच त्यातून इतर राज्यांसारखी तरंगती हॉटेल्स होण्यासारखी आहेत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे (उद्योग,बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पूरक मागण्यांवर चर्चा होत असताना उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार या विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, अरुण गुजराथी या तीन सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतलेल्या अन्य सन्माननीय सदस्यांचे या तीनही खात्यांसंबंधी मार्गदर्शन लाभले नाही, ते या खात्यांवर बोलले नाहीत त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मुख्यत: मला या वेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून अपेक्षा होती पण त्यांनी उद्योग विभागाचा उल्लेखही केला नाही. ते बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल सभागृहात उपस्थित नव्हते. आता सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल सभागृहात उपस्थित आहेत पण माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे उपस्थित नाहीत. त्यावरही मला थोडे बोलता आले असते. पण वेळेअभावी मी ते टाळतो. आता माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित झाले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी नवीन औद्योगिक धोरणासंबंधीचा उल्लेख केला. महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक व्हावी, या राज्यात सर्व प्रकारचे उद्योग यावेत आणि उद्योग व्यवसायांच्या माध्यमातून राज्य प्रगतीकडे जावे, विकसित व्हावे या दृष्टीने या राज्याच्या सर्व विभागांमध्ये उद्योगधंदे येण्यासाठी आम्ही नवीन औद्योगिक धोरण तयार केलेले आहे. कोणत्याही क्षणी ते धोरण येईल. विभागाने धोरण तयार केलेले आहे. ते मंत्रिमंडळासमोर यावयाचे आहे. मंत्रिमंडळासमोर आल्यानंतर ते धोरण जाहीर होईल. महाराष्ट्र नेहमी उद्योग व्यवसायामध्ये प्रगतिशील राहील अशा स्वरुपाचे ते औद्योगिक धोरण आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी जो उल्लेख केला त्याला उत्तर म्हणून सांगू इच्छितो की, लवकरच ते धोरण येऊ शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उल्लेख केला की, बंदराच्या बाजूची जमीन विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून कूळ कायद्याखालील जमिनीची अट शिथिल करुन मिळावी. ही मागणी महसूल खात्याकडे प्रलंबित आहे. ती परवानगी मिळताच ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

जमीन सुध्दा विकसित करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करील असे मी त्यांना सांगू इच्छितो. त्याचप्रमाणे नवीन बंदरांसबंधी मेरीटाईम बोर्डाकडून नवीन धोरण आणण्याचा आम्ही प्रयत्न करु. या महाराष्ट्राला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. या विभागात म्हणावा तसा विकास झालेला नाही. त्या ठिकाणी अधिकचा विकास व्हावा, पर्याटनाला त्याचप्रमाणे व्यवसायाला प्रोत्साहन मिळावे अशा प्रकारची यंत्रणा या बंदर आणि जेटींच्या माध्यमातून उपलब्ध व्हावी असे आमचे प्रयत्न आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी एक प्रश्न उपस्थित केला. एमआयडीसी बोर्डाने आताच एक निर्णय घेतलेला आहे की, भूखंड मिळाल्यानंतर त्या क्षेत्रापैकी 20 टक्के बांधकाम केल्यास त्याला डीसीसी सर्टिफिकेट दिले जाते. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, पूर्वी 10 टक्क्याची अट होती. पूर्वी ज्यांना परवानगी दिलेली आहे त्यांना 10 टक्क्याची अट घातलेली आहे. 20 टक्क्याचा नियम होण्याच्या अगोदर जी 10 टक्क्याची अट होती ती चालू ठेवावी असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. हा विषय बोर्डासमोर आणून त्या संबंधी फेर चर्चा करण्यात येईल. व्यावसायिकांच्या दृष्टीने जे सोयीचे आहे आणि उद्योगाच्या प्रगतीला चालना मिळू शकेल या दृष्टीने जे योग्य आहे अशा प्रकारचा निर्णय त्या संदर्भात घेतला जाईल असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

सर्व सन्माननीय सदस्यांनी जे सहकार्य दाखविले आहे त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो आणि उद्योग विभागाच्या मागण्यांना सभागृहाने एकमताने मंजुरी द्यावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री): सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 61 ते 80 वरील पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केलेल्या आहेत. या मागण्यांची एकूण किंमत 739 कोटी 52 लाख रुपये इतकी आहे. या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या विभागासाठी पुरेसा निधी दिली जावा अशी मागणी केलेली आहे आणि काही सूचना सुध्दा केलेल्या आहेत. प्लॅन अंतर्गत स्टेट हाय-वे, एम.डी.आर., नाबार्ड, सी.आर.एफ. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात सन 2011-2012 या वर्षासाठी 61.30 कोटी रुपये देण्यात आले होते. रस्ते दुरुस्ती व नुतनीकरण यासाठी नॉन प्लॅन अंतर्गत याच काळामध्ये 43.13 कोटी रुपये देण्यात आले. तसेच स्थानिक क्षेत्र म्हणजे जिल्हा परिषदेमार्फत सुध्दा 7.96 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी चोपडा नगरपालिकेच्या इमारतीचे बांधकाम सुरु झालेले नाही असे म्हटले होते. या इमारतीचे काम अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट केलेले आहे. परंतु या इमारतीसाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध झालेली नसल्यामुळे ते काम सुरु होऊ शकलेले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी रिंग रोड व ब्रिजच्या कामासाठी आपले विचार मांडले होते. त्यासंबंधी माहिती घेऊन उचित कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली बऱ्याच सूचना केलेल्या आहेत. घोटवडे-सोनवणे या घाटासंबंधी त्यांनी सूचना केली आहे. चढ घाटातील 8 कि.मी.पैकी 2 कि.मी.रस्त्याचे काम मंजूर झालेले आहे. बाकीचा 6 कि.मी.इतका रस्ता वन क्षेत्रात असल्यामुळे वन विभागाच्या मान्यतेनंतर व वन विभागाने जमीन उपलब्ध करुन दिल्यानंतर या कामासाठी निधी उपलब्ध करुन ते काम करण्यात येईल.

आंबोली घाटामध्ये वन खात्याच्या हद्दीत बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासंबंधी परवानगी देण्याची त्यांनी सूचना केली आहे. आंबोली घाटामध्ये एका बाजूला खोल दरी व दुसऱ्या बाजूला उंच डोंगर आहे. डोंगराच्या बाजूला वन खात्याच्या हद्दीत कॅच वॉटर स्ट्रेंच करणे आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी मी स्वत: लक्ष घातले होते आणि वन विभागाने सुध्दा सहकार्य

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.छगन भुजबळ....

केल्यामुळे वन विभागाच्या हद्दीत देखभाल व दुरुस्ती करण्याची परवानगी मिळाली होती. त्यामुळे कॅच वॉटर स्ट्रेंचचे काम पूर्ण केलेले आहे. त्यामुळे या वर्षीच्या पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या नाहीत.

सागरी महामार्गाची एकूण 787 कि.मी.इतकी लांबी आहे. त्यापैकी 759 कि.मी.लांबी पर्यंतचे काम पूर्ण झालेले आहे. या महामार्गावर 51 पुलांची आवश्यकता असून त्यापैकी 41 पुलांचे काम पूर्ण झालेले आहे. 7 पुलांची कामे मंजूर झालेली आहेत, उर्वरित 3 पुलांची कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे नियोजन केलेले आहे. मंजूर असलेल्या 7 पुलांपैकी 4 पूल अर्थसंकल्पातून आणि 3 पूल नाबार्ड योजनेतून मंजूर झालेले आहेत. नाबार्डमधून मंजूर झालेल्या पुलांची एकूण किंमत 568 कोटी रुपये इतकी आहे.

जिल्हा परिषदांच्या जुन्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध करुन द्यावा अशी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सूचना केली आहे. सन 2011-2012 या वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी स्थानिक विकास क्षेत्रासाठी 8.8 कोटी रुपयांचा निधी वितरित केलेला आहे. सन 2012-2013 या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत स्थानिक क्षेत्रातील रस्त्यांचे परिरक्षण व दुरुस्तीसाठी ग्रामविकास विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात आहे.

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी गुणवत्ता तपास यंत्रणेकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता नमूद केली आहे. राज्यामध्ये 6 प्रादेशिक विभागांमध्ये दक्षता व गुण नियंत्रण मंडळे कार्यरत आहेत. राज्यातील शासकीय कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी या मंडळांकडे आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी तापी खोरे अंतर्गत पाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेल्या पूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करावेत असे म्हटले होते. या पुलांचे काम पूर्ण झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलांची पाहणी केली असून त्यामध्ये काही दुरुस्त्या व तरतुदी करण्याबाबत पाटबंधारे विभागाला कळविलेले आहे. त्या बाबींची पूर्तता झाल्यानंतर ते पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात घेण्यात येतील.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीरहित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी आळंदी-पंढरपूर रस्त्यावर 11 ठिकाणी वळणरस्ते करण्याची गरज आहे असे सांगितले. रस्ते विकास योजना 2001-2021 अंतर्गत सर्व जिल्ह्यामध्ये रिंगरोड, तालुक्याच्या ठिकाणी वळण रस्ते करण्यासाठी तरतूद आहे. या 11 ठिकाणांची तपासणी करुन जागेची उपलब्धता विचारात घेऊन वळण रस्ते करण्याचे नियोजन केले जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी कोकणातील पर्यटनाच्या संदर्भात अनेक सूचना केलेल्या आहेत. काही सूचनांच्या बाबतीत कार्यवाही सुरु झालेली आहे. एमटीडीसी मार्फत नवीन प्रकल्प हाती घेण्याचे प्रयत्न केले जातील. सन्माननीय सदस्यांनी पर्यटनाच्या संदर्भात केलेल्या सूचनांची नोंद मी घेतलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी मंत्रालयाचे नूतनीकरण करताना बाजारात आलेल्या नवीन केमिकलचा वापर करावा अशी सूचना केली. मंत्रालयाच्या नूतनीकरणाच्या संदर्भात मुंबईतील अनेक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन काम केले जात आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या गोष्टीचा निश्चित विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यासाठी 100 कोटीची तरतूद करावी अशी मागणी केली. सन 2011-12मध्ये सोलापूर जिल्ह्यात राज्यक्षेत्रासाठी 86.93 कोटी रुपये आणि स्थानिक क्षेत्रासाठी 17.71 कोटी रुपयाचा निधी रस्ते परिरक्षण व दुरुस्तीसाठी वितरित करण्यात आलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सर्व सूचनांची नोंद मी घेतलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे मी आभार मानतो. खात्याने केलेल्या काही गोष्टी बाबत त्यांनी आनंद व्यक्त करुन शासनाचे अभिनंदन केले. पर्यटन विभागाच्या माध्यमातून आम्ही एक मॅगझीन काढलेले आहे. त्यामध्ये थोड्याशा त्रुटी राहिलेल्या आहेत. त्याबाबतीत आणखी सफाईदारपणे काम होण्याची आवश्यकता आहे. आम्ही केलेला उपक्रम स्तुत्य असल्याचे उद्गार सन्माननीय सदस्यांनी काढल्या बद्दल आणि प्रोत्साहन दिल्याबद्दल माझ्या खात्याच्या वतीने आणि शासनाच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी महाराष्ट्र सदनाचा उल्लेख करुन शासनाचे कौतुक केले. त्या इमारतीच्या उद्घाटनासाठी माननीय राष्ट्रपतींना आमंत्रित केलेले आहे. उद्घाटनाच्या वेळी ज्या ज्या मान्यवरांनी महाराष्ट्र सदन व्हावे यासाठी प्रयत्न केले ते सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांचा उल्लेख उद्घाटनाच्या वेळी मी माझ्या भाषणामध्ये केल्या शिवाय राहाणार नाही. अनेक मान्यवरांच्या प्रयत्नामुळे सोन्यासारखी जागा महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आली. एक उत्तम अशी वास्तू निर्माण झालेली आहे. माननीय राष्ट्रपतींचा होकार आल्यानंतर उद्घाटनाचा कार्यक्रम केला जाईल. सार्वजनिक बांधकाम आणि पर्यटन विभागाच्या मागण्या संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करुन माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह विभाग व ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाच्या एकूण 208 कोटी 73 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या या ठिकाणी मांडण्यात आलेल्या आहेत. या मागण्यांना मंजुरी द्यावी अशी मी सुरुवातीलाच सभागृहाला विनंती करीत आहे.

ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 98 ते 102 या मागण्यांना देखील सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे तंटा मुक्त अभियानाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण सर्व्हेक्षण झाल्यानंतर तरतूद करतो त्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांची निश्चितपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना सांगू इच्छितो की, आपण एफेसिअल लॅबसाठी, डी.एन.ए.टेस्टसाठी 6 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. आपल्याकडे डी.एन.ए.टेस्टची तरतूद नव्हती. त्यासाठी ही तरतूद करीत आहोत. तसेच काही ठिकाणी नव्याने लॅब करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

ग्राम विकासाच्या संदर्भात घन कचरा आणि इतर बाबतीत ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा निश्चितपणे शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अलिबाग येथील थळ ग्रामपंचायत विभाजनाचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, हा कायदेशीर प्रस्ताव असल्यामुळे तो मंजूर करण्यात कोणतीही अडचण येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव केव्हा मंजूर करण्यात येईल ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हा कायदेशीर प्रस्ताव असल्यामुळे तो मंजूर करण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझ्याकडे जे पत्र दिले ते पत्र मी वाचले आहे. आपण पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे संबंधित घटनांची माहिती घेऊन एक महिन्याच्या आत संबंधितांवर कारवाई केली जाईल अशी ग्वाही मी या निमित्ताने देतो.

गृह विभाग आणि ग्राम विकास विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 111 ते 116 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो.

या विभागाच्या मागण्यांवर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, भगवान साळुंखे, विक्रम काळे, रामनाथ मोते व इतर सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. या सूचना करताना त्यांनी चुका देखील दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

स्व.यशवंतराव चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे आणि त्या निमित्ताने शासन विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी एक अनोखी योजना आणत आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील जे लोक पालामध्ये राहतात त्यांना या योजनेमध्ये प्राधान्य दिलेले आहे. ही योजना 33 जिल्ह्यांमध्ये राबविणार आहोत. या योजनेमध्ये कमीत कमी 20 चा एक प्रोजेक्ट राहील. एका जिल्ह्यामध्ये तीन प्रोजेक्ट करण्याचा शासनाचा मानस आहे. जमीन संपादन करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर टाकलेली आहे.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, "आश्रमशाळा 10 किलोमीटरच्या आत स्थलांतरित झाली पाहिजे. त्या ठिकाणी भूकंप झाला नव्हता किंवा नैसर्गिक आपत्ती नव्हती" त्याबाबत सांगू इच्छितो की, ते स्थलांतर नव्हते. त्या शाळा बंद पडल्या होत्या. त्या आश्रमशाळांवर पूर्वी प्रशासक नेमले होते. पण काही फरक पडला नाही म्हणून आयुक्तांनी त्या शाळा बंद केल्या होत्या. नंतर हे प्रकरण अपिलात गेले. त्यानंतर आम्ही आश्रमशाळा रद्द केल्या होत्या. या रद्द केलेल्या आश्रमशाळा संबंधी काही नियम आहेत. त्या नियमा प्रमाणे त्या शाळा राज्यात कुठेही स्थलांतरित करता येतात. तेव्हा त्यामध्ये नियमबाह्य असे काही नाही.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगण्यास आनंद वाटतो की, आपल्या राज्यात 2388 वसतिगृहे आहेत. विमुक्त भटक्या जातीच्या चार-पाच हजारांपेक्षा जास्त अनुदानित आश्रमशाळा आहेत. त्या शाळांचे अनुदान 630 रुपये होते. ते आता 900 रुपयांवर करण्यात आलेले आहे. संस्थाचालकांनी आश्रमशाळा चांगल्या प्रकारे चालविल्या पाहिजेत. या आश्रमशाळांची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी एक आश्वासन दिले होते त्याची पूर्तता करु शकलो नाही याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. सन्माननीय सदस्यांनी ज्यांच्या बद्दल तक्रार केली त्या संदर्भात चौकशी सुरु आहे. त्या अधिकाऱ्या विरुध्द पुरावे गोळा करणे आवश्यक आहे. एक महिन्याच्या आत निश्चितपणे कारवाई करण्यात येईल हे मी या निमित्ताने सांगतो.

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सभापती महोदय, एका गोष्टीचे कन्फ्यूजन आहे, त्या बाबतीत मी या ठिकाणी खुलासा करु इच्छितो. मध्यंतरी आम्ही वसतिगृहातील प्रवेशामध्ये 80 टक्के प्रवेश अनुसूचित जातीसाठी व 20 टक्के प्रवेश बाकीच्या इतर समाजासाठी द्यावयाचा असा जी.आर.काढला होता. पण त्या जी.आर.ला आम्ही स्टे दिला. त्याचे कारण असे आहे की, कारण पूर्वी समाजकल्याण खाते एकत्र होते. त्यामध्ये आदिवासी विकास, विमुक्त व भटक्या जमाती या सर्व कॅटेगरीजचा समावेश होता. ते नॉन प्लॅन झाले. त्यामुळे त्यांना 80:20 चे सूत्र लावता येत नाही. आता आपल्याला विशेष घटक योजनेचे पैसे मिळालेले आहेत. यानंतर 1 हजार मुलांचे वसतिगृह असो, निवासी शाळा असो, त्याला आपण 80:20 चे सूत्र लावले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आनंद वाटेल अशा एक दोन गोष्टी मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने स्मारक नव्हते. मुंबई शहरात जे प्रसिध्द नाट्यगृह आहे त्या संदर्भात दरम्यानच्या काळात पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले होते. ते सगळे प्रश्न दूर झालेले आहेत. आपण त्यासाठी पैसे दिले आहेत. वर्षभरामध्ये मुंबई शहरात अतिशय सुंदर अशा प्रकारचे बंद नाट्यगृह निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, आम्ही दोन चांगल्या योजना केल्या आहेत. या राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत, ज्यांच्याकडे बी.पी.एल.चे कार्ड आहे, परंतु त्यांच्याकडे पक्के घर नाही. मग तो कोणत्याही जातीधर्माचा असो, ज्याला पक्के घर नाही, त्याला घर देणार आहोत. 10 लाख घरे तीन वर्षात पूर्ण करणार होतो. आपणाला माहिती आहे की, अनुसूचित जातीचे मोठया प्रमाणात लाभार्थी असतात. आम्ही ही योजना घेतली त्यामध्ये 2010-2011 आणि 2011-2012 मध्ये 1 लाखापेक्षा जास्त घरे बांधण्याचे काम आमच्या विभागाने केलेले आहे ही गोष्ट सांगण्यास मला आनंद वाटतो.

सभापती महोदय, आपल्याकडे तांडा वस्ती सुधार योजना तीन-चार वर्षापासून होती. आता आम्ही असा निर्णय घेतला आहे की, तांडा वस्ती शिवाय इतर जेवढया वस्त्या आहेत, त्या वस्त्या देखील सुधारण्याचा आमचा प्रयत्न आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, राज्यात व्यसनमुक्तीचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. त्यासाठी थोडया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा आणि दुर्लक्षित विषय या राज्यातील ज्येष्ठ नागरिक हा आहे. मंत्रिमंडळासमोर एका महिन्यात हा विषय येणार आहे. या विषयाची व्याप्ती खूप मोठी असणार आहे. त्यासाठी आपण सर्वांचा लोकसहभाग लागणार आहे. आपण सहकार्य कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. माझ्या विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त " विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना" सुरु केली. ही गोष्ट स्वागतार्ह आहे. आपण तांड्यांच्या बाबतीत उल्लेख केला. आपण विदर्भातील कॉंग्रेस पक्षाचे नेते आहात. स्व.वसंतराव नाईक यांचे देखील जन्मशताब्दी वर्ष सुरु झालेले आहे. ही गोष्ट आपण कदाचित विसरत आहात. त्या निमित्ताने आपण काही तरी करावे. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या संदर्भात तर केलेच पाहिजे परंतु म्हणून स्व.वसंतराव नाईक यांची जन्मशताब्दी आपण विसरत आहोत असे व्हावयास नको. स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने काही योजना सुरु केल्या तर ते चांगले होईल. याबाबत मंत्री महोदयांनी विचार करावा.

श्री.शिवाजीराव मोघे : माझ्या माहिती प्रमाणे स्व.वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष पुढील वर्षी सुरु होणार आहे. शासनाने या संदर्भात बैठकही घेतलेली आहे. तो कार्यक्रम शासनातर्फे नंतर जाहीर करण्यात येईल. परंतु आता आम्ही तांडा सोडून इतर वस्त्यांना स्व.वसंतराव नाईक असे नाव दिलेले आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (वने,पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, वन विभागाची अतिशय छोटी मागणी आहे. 50 लाख रुपयांचा सिक्रेट फंड वन विभागाने मागितला आहे. उर्वरित वन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (राज्यमंत्री महसूल, मदत व पुनर्वसन): सभापती महोदय, मदत आणि पुनर्वसन विभाग बाब क्रमांक 81 ते 84 अनुसार 506 कोटी 25 लाख रुपयांच्या योजनेतर पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे महसूल विभागाच्या बाब क्रमांक 21 ते 29 व 37 अन्वये 107 कोटी 37 लाख 15 हजार रुपयांच्या लाक्षणिक पुरवणी मागण्या सदनासमोर मांडण्यात आलेल्या आहेत. सहकार विभागाच्या बाब क्रमांक 145, 146 अंतर्गत एकूण 6 कोटी 88 लाख 34 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत.

या सर्व विभागांच्या मागण्यावरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुरेश नवले, अरुण गुजराथी, दिवाकर रावते, चंद्रकांत पाटील, मनीष जैन, भगवान साळुंके, विक्रम काळे आणि श्रीमती उषाताई दराडे यांनी भाग घेतला आणि काही मौलिक सूचनाही केल्या. या सर्व माननीय सदस्यांचे मी आभार मानतो आणि त्यांना धन्यवाद देतो.

विरोधी पक्षेनते श्री. विनोद तावडे यांनी याठिकाणी काही प्रश्न उपस्थित केले. नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाचा प्रशासकीय खर्च एक हजार कोटीवरुन दोन हजार कोटी रुपयांवर गेला आहे असे त्यांनी सांगितले. मला याबाबतीत हे स्पष्ट करावयाचे आहे की, सर्वात कमी प्रशासकीय खर्च करणारा विभाग म्हणून नोंदणी आणि मुद्रांक विभागाचे उदाहरण देता येईल. 2008-9 मध्ये या विभागाचा प्रशासकीय खर्च हा केवळ 1.04 टक्के एवढा होता. 2009-10 मध्ये हा खर्च .86 टक्के इतका होता. 2010-11 मध्ये हा खर्च 0.94 टक्के इतका होता. या विभागाचा प्रशासकीय खर्च 122.38 कोटी इतका आहे. याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अधिक माहिती दिल्यास निश्चितच त्याबाबतीत मी खुलासा करीन.

सभापती महोदय, 2007 पर्यंत या नोंदणी विभागाच्या कामासाठी बीओटी तत्वावरील ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आली होती. हा कालावधी संपल्याने नवीन ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यासाठी एकूण 7 वेळा निविदा काढण्यात आल्या. परंतु तांत्रिक कारणांमुळे आणि अल्प प्रतिसादामुळे तो यशस्वी झाला नाही. नव्याने 2011 मध्ये 8 व्या वेळी टेंडर प्रक्रिया करण्यात आली व ती यशस्वी झाली. त्यानंतर 9 एप्रिल आणि 12 एप्रिल 2012 रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली. नागपूर आणि अमरावती विभागाकरिता वक्रांगी सॉफ्टवेअर लिमिटेड या एजन्सीला आणि औरंगाबाद,पुणे,नाशिक,ठाणेआणिमुंबईकरिताएम.एस.कॉम्प्युटर्स,अभिषेकएन्टरप्रायझेस,जे.के.कॉम्प्युटर यांना काम देण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-07-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3Y-2

SSK/ पूर्वी श्री.गिते 17:55

श्री. प्रकाश सोळंके.....

माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी काही मुद्दे उपस्थित केले. त्यांनी प्रामुख्याने अहमदपूर,जि.लातूर याठिकाणी पीक विमा योजनेअंतर्गत गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आणून दिले. त्याठिकाणच्या एम.एस.क्षीरसागर या तलाठयाने गैरप्रकार केल्यानंतर सुध्दा त्याला बढती देण्यात आली असे सांगितले. श्री. क्षीरसागर यांच्याबाबतीत मी माहिती घेतली. या तलाठयास 3.12.11 च्या आदेशान्वये मंडल अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. पदोन्नती समितीने पात्रता तपासल्यानंतर त्याच्याविरुध्द कोणतेही आरोप किंवा चौकशी नसल्याचे आढळून आले. त्यामुळे ही पदोन्नती देण्यात आलेली आहे. आता माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे त्याची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत 15 दिवसात चौकशी करण्यात येईल आणि चौकशी पूर्ण करुन सकृतदर्शनी त्यात तथ्य आढळून आले तर त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल. या गैरप्रकारात बँक कर्मचारी सामील झालेले आहेत त्यांच्या बाबतीत सुध्दा सहनिबंधक यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपेपर्यंत सभागृहाच्या सभागृहाच्या अनुमतीने कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, बँक कर्मचाऱ्यांवर गुन्हा सिध्द झाला परंतु ज्यांनी अपहार केला त्यासंबंधीची कागदपत्रेच मी दिली आहेत. अद्यापही या लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल झालेला नाही, केवळ एक वेतनवाढी इतकीच शिक्षा त्यांना दिली आहे. तसेच तलाठ्यांनी स्वत:च्या नावाने खोटे शिक्के वापरले आहेत.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, या दोन्ही प्रकरणांची चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी पुनर्वसनाबाबतची सूचना केली असून त्यासंदर्भात एक बैठक आयोजित करुन त्या बैठकीत हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्य प्रा. चंद्रकांत पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांबाबतचा मुद्दा मांडला आहे. याबाबतीत देखील आपल्याबरोबर बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. एवढे बोलून माझ्या तिन्ही विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री) : महोदय, कृषी विभागाच्या पृ.क्र. 35 व 36 वरील बाब क्र. 38 ते 43 साठी प्रस्तावित एकूण 685 कोटी 48 लाख रुपये खर्चाच्या पुरवणी मागण्या सभागृहात सादर करण्यात आल्या. या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्य मंत्री) : वित्त विभागाच्या बाब क्र. 56 ते 60 नुसार 6.75 कोटीच्या मागण्या, नियोजन विभागाच्या बाब क्र. 117 ते 121 नुसार 86.25 कोटीच्या मागण्या आणि उर्जा विभागाच्या बाब क्र. 94 व 95 प्रमाणे 302.02 कोटीच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो. तसेच या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केल्या त्यासंबंधीची माहिती लेखी स्वरुपात सन्माननीय सदस्यांना देणार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, घटनेने किती पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात याला बंधन घातले आहे. त्यामुळे आपण लेखी उत्तर न पाठविता सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे सांगितले पाहिजे.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, याबाबत सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांवर उचित कार्यवाही करुन सभागृहात सादर केली जाईल. एवढे बोलून माझ्या तीन विभागांच्या मागण्यांना मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्य मंत्री) : महोदय, बाब क्र. 160 ते 162 प्रमाणे जवळपास 40.02 कोटीच्य पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी अनेक मौलिक सूचना देखील केल्या त्यातील सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात पुढील आठवड्यात बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन देतो व पुन्हा या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागणी क्र. 122 ते 128 या 130.54 कोटीच्या पुरक मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या असून त्या मागण्या सदनाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते. त्याचबरोबर मागील वर्षीपेक्षा चालू वर्षात अधिकचा निधी या विभागासाठी दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात ज्या सूचना केल्या त्यांचा निश्चितपणे शासनाच्या स्तरावर विचार करण्यात येईल अशी मागणी करुन पुन्हा सभागृहाने मागण्यांना मंजुरी द्यावी अशी विनंती करते.

....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : महोदय, कामगार विभागाच्या बाब क्र. 91, 92, 93 व 97 या 51.36 कोटीच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती : सन 2012-13 च्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रावरील चर्चा आता संपली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती श्री. विनायक मेटे : आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शवण्यात आलेल्या दोन्ही अर्धा तास चर्चा माननीय सभापतींच्या निदेशानुसार पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 17 जुलै, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 5 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 17 जुलै, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही